सोलापूर तरुण भारत
आसमंत



# भारतीय प्रजासत्ताक वय अवघे...

**भारताचे प्रजासत्ताक ७६ वर्षे पूर्ण करत असताना सिंहावलोकन करणे क्रमप्राप्त ठरते. हा महत्त्वपूर्ण टप्पा अनेक अनुभव घेत पार झाला असून तो भविष्यातील आव्हानांची जाणीव करून देणाराही आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जगाने कधीच आपल्याकडे कोणत्या अपेक्षेने पाहिले नव्हते, मात्र आज अनेकांच्या अपेक्षांची परिपूर्ती करणारा अशी त्याची ख्याती होत आहे. हा प्रवास नक्कीच रोचक म्हणायला हवा.**

निमित्त

कर्नल (नि.) अनिल आठल्ये
ज्येष्ठ अभ्यासक

आपण २१ व्या शतकात भारताचे अस्तित्व गृहीत धरतो. पण ७६ वर्षांपूर्वी भारतीय प्रजासत्ताक अस्तित्वात आले तेव्हा आपल्या भविष्यबद्दल जगभर साशंकता होती. दुसऱ्या महायुद्धाप्रसंगी इंग्लंडचे पंतप्रधान तसेच जगातील एक प्रमुख नेते असणाऱ्या चर्चिल यांनी म्हटले होते की, भारतातून ब्रिटिश सत्ता निघाल्यानंतर इथली संरक्षण, प्रशासनिक-आर्थिक व्यवस्था, रेल्वे- सिंचन व्यवस्था आदी सर्व कोलमडून पडेल. देशामध्ये परत दुष्काळ पडेल. त्यांच्या भाकितानुसार स्वतंत्र भारतावर पुन्हा वायव्येतून मुस्लिम टोळीवाले आक्रमण करून आधी उत्तर आणि नंतर दक्षिण हिंदुस्थानावर पुन्हा एकदा मुसलमानांचे राज्य येणे शक्य होते.

चर्चिल केवळ इंग्लंडचेच नेते नव्हते तर एकूण पाश्चिमात्य जगावर त्यांचा जबरदस्त प्रभाव होता. त्यामुळे तेव्हा इंग्लंडबरोबरच अमेरिकेमध्येदेखील भारताच्या भवितव्याबद्दल निराशेचा सूर होता. याला एक मुख्य कारण म्हणजे गेल्या अनेक शतकांपासून भारतीय इतिहासात मराठ्यांनी मुघलांचा पराभव केल्याचा उल्लेख जाणीवपूर्वक नष्ट केला गेला होता. १८०२ मध्ये गव्हर्नर जनरल वेलस्लीच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी संपूर्ण भारत आपल्या अधिपत्याखाली आणला तेव्हा त्यांना मराठ्यांशीच लढावे लागले होते. इंग्रजांनी भारताचे साम्राज्य मुघलांकडून नव्हे तर मराठ्यांकडून हिसकावून घेतले होते, हे वास्तव आहे. थोडक्यात, भारत हा बहुभाषी, बहुधर्मी आणि खंडप्राय देश एकत्र राहील असे कोणालाच वाटत नव्हते. भारतीय ऐक्य केवळ इंग्रजविरोधामुळे आणि स्वातंत्र्य चळवळीतल्या महान नेतृत्वामुळे अस्तित्वात आहे, असेच समजले जात होते. एकदा इंग्रज गेल्यानंतर तसेच स्वातंत्र्यसमरातील नेतृत्व काळाच्या पडद्याआड झाल्यानंतर भारताची अनेक शकले होतील, असेच जागतिक मत होते. अशा स्थितीत एकधर्मीय आणि आक्रमक पाकिस्तान दक्षिण आशियातील सगळ्यात मोठा देश म्हणून गणला जाईल, असा विचारप्रवाह पाश्चिमात्य देशांमध्ये होता. १९६१ मध्ये अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना तत्कालीन पाकिस्तानी अध्यक्ष अयुब खान यांनी प्रेसिडेंट केनडी यांना सांगितले होते की, पुढील काही वर्षांमध्ये भारताचे विघटन होईल. अर्थात ही सर्व भाकिते चुकली आणि १९७१ मध्ये पाकिस्तानचीच दोन शकले झाली, हा इतिहास आहे.

भारतीय गणराज्याबद्दल अशा प्रकारची भाकिते होण्याचे कारण म्हणजे या देशाचे सांस्कृतिक ऐक्य पाश्चिमात्यांना समजलेच नाही. हजारो वर्षांच्या इतिहासामध्ये भारत राजकीयदृष्ट्या केवळ सम्राट अशोकाच्या काळात एक झाला होता. परंतु, सांस्कृतिक ऐक्य त्याआधी आणि त्यानंतरही टिकून होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या १५ वर्षांच्या काळात देशाला जवाहरलाल नेहरूंचे सक्षम नेतृत्व लाभले होते. त्यांनी जागतिक परिस्थितीचे चांगल्या प्रकारे आकलन करून घेत गुटनिरपेक्ष धोरणाचा अवलंब केला. त्यात त्यांनी अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांच्या विरोधात सोव्हिएत संघाची लष्करी शक्ती वापरली आणि भारतीय स्वातंत्र्य अबाधित ठेवले. यात फक्त १९६२ मध्ये चीनसंदर्भात त्यांचे आडाखे चुकले. कारण चीनने त्या वेळच्या क्युबा पेचप्रसंगाचा फायदा घेत भारतावर लष्करी आक्रमण केले. हा अपवाद वगळता नेहरुंचे परराष्ट्र धोरण यशस्वीच ठरले होते. त्यानंतर इंदिरा गांधी यांनी सोव्हिएत संघाच्या पाठिंब्याचा वापर करून १९७१ मध्ये पाकिस्तानची दोन शकले केली. त्यावेळी सोव्हिएत संघाच्या हस्तक्षेपामुळे अमेरिका आणि चीन हे दोघेही पाकिस्तानच्या मदतीला येऊ शकले नाहीत.

१९९२ मध्ये सोव्हिएत संघाचे विघटन झाले आणि भारताला मिळणारे हे सुरक्षा कवच नाहीसे झाले. त्याच कारणामुळे भारताने अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली १९९८ मध्ये अण्वस्त्र चाचण्या घेऊन भारताला अण्वस्त्र सज्ज देश बनवले. योग्य वेळी घेतलेल्या या निर्णयामुळे जगात इराक, युगोल्साव्हिया वा युक्रेन या देशांसारखी स्थिती होण्यापासून भारत वाचला. २०१४ पासून बदलता जागतिक संदर्भ लक्षात घेऊन पंतप्रधान मोदी यांनी देशाला संरक्षण क्षेत्रामध्ये आत्मनिर्भरतेच्या मार्गावर पुढे नेले. आज ७६ वर्षांनंतर भारत परकीय आक्रमणाच्या धोक्यापासून सुरक्षित आहे, असे खात्रीने म्हणता येईल. स्वातंत्र्याच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये भारताच्या लष्करी क्षमतेबद्दलच नव्हे तर, आर्थिक प्रगतीबद्दल अनेक भ्रामक कल्पना होत्या.

१९६० च्या दशकात अमेरिकेमध्ये भविष्यकाळाबद्दल आडाखा बांधताना २१ व्या शतकात भारत कंगाल देश असेल, असे भाकीत वर्तवले गेले होते. प्रत्यक्षात आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे. आपण जगात सर्वात मोठा तांदूळ पिकवणारा तसेच निर्यात करणारा देश आहोत. गव्हाच्या बाबतीत जगात आपण दुसऱ्या क्रमांकावर आहोत तर दुग्ध उत्पादनामध्ये प्रथम क्रमांकावर असून जगातील ३१ टक्के दूध भारतात संकलित केले जाते. असे असूनही वेळोवेळी भारतातली निम्मी लोकसंख्या भुकेली आहे किंवा ३० टक्के बालके कुपोषित असल्याच्या वावड्या सतत उठवल्या जातात. यामागील मुख्य कारण म्हणजे भारतीय बालकांची तुलना आफ्रिका किंवा युरोपियन बालकांशी केली जाते. अगदी पूर्णपणे निरोगी आणि सुदृढ भारतीय मूलही कुपोषित आणि आजारी आफ्रिकन मुलापेक्षा वजनाने कमीच भरेल. याचे मुख्य कारण म्हणजे जगामध्ये भारत हा एकमेव देश बहुतांश शाकाहारी आहे. भारताच्या पूर्व, पश्चिमेला सर्व देश मांसाहारी आहेत. या मूलभूत फरकामुळे भारतीयांची एकंदर जडणघडण इतरांपेक्षा वेगळी आहे. त्याला सरसकट कुपोषण म्हणणे चुकीचे आहे. जागतिक स्तरावर भारतासारखी मोठी लोकसंख्या शाकाहारी असल्यामुळे मांसाहारामुळे जागतिक स्तरावर पर्यावरणाची होणारी नासाडी कमी झाली आहे. अशा जमेच्या अनेक बाजू असल्या तरी येत्या २५ वर्षांमध्ये भारतीय प्रजासत्ताकापुढे नवी आव्हाने उभी ठाकली आहेत. भारताची आर्थिक आणि लष्करी सत्ता वाढत जाईल तशी जगातील इतर देशांना भारताच्या हेतूबद्दल संशय वाटू लागेल. त्यामुळे हे देश भारताच्या प्रगतीमध्ये खीळ घालण्याचा नक्कीच प्रयत्न करतील. गेल्या काही वर्षांमध्ये सोशल मीडियाचा वापर करून भारतात काही अंशी अराजक पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे, ते भविष्यकाळातील संकटाच्या दृष्टीने वानगीदाखल आहे.

भारतामध्ये गेली अनेक दशके लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आहे. परंतु, या व्यवस्थेमध्ये ५१ टक्के मते मिळाल्यानंतर १०० टक्के सत्ता मिळते. त्यामुळे लोकांचा पाठिंबा आणि राजकीय सत्ता याचे प्रमाण व्यस्त आहे. जगातील अनेक देशांमध्ये हा प्रश्न उद्भवत आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेतील निवडणूक पद्धतीमध्ये कमी मते मिळूनदेखील व्यक्ती राष्ट्राध्यक्ष बनते. भविष्यात राजकीय स्थैर्य ठेवण्याच्या दृष्टीने या निवडणूक प्रक्रियेमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यामध्ये जर्मनीप्रमाणे मतांच्या टक्केवारीच्या प्रमाणात लोकसभेत जागा देणे हा एक उपाय आहे. परंतु, तसे केल्यास देशात कायमच आघाडी सरकारे बनवली जातील. त्यांना कठीण आणि अप्रिय निर्णय घेणे अशक्यप्राय होईल. तेव्हा या दोन्हीमध्ये सुवर्णमध्य साधून येत्या काळात भारताला नवीन लोकशाही प्रणाली विकसित करावी लागेल. भारताला कठीण समस्या वादविवादाद्वारे सोडवण्याचा एक मोठा वारसा लाभला आहे. आठव्या शतकात आदी शंकराचार्य आणि मंडन मिश्रा यांच्यात झालेला शास्त्रार्थ प्रसिद्ध आहे. यात आदिशंकराचार्यांनी रूढ तत्त्वज्ञान खोडून काढले आणि भारतामध्ये सनातन धर्माची पुनर्स्थापना केली. वादविवाद करून जटिल प्रश्न सोडविण्याची ही परंपरा पुनरुज्जीवित करण्याची गरज आहे.

आज भारतातील विधायक मंडळे वादविवादाच्या स्थानाऐवजी कुस्तीचे आखाडे बनले आहेत. भविष्यकाळात न्यायिक प्रक्रिया आणि त्यात होणारी दिरंगाई संपविण्याचे मोठे आव्हानही आपल्यापुढे आहे. खेरीज जनहित याचिकेद्वारे चंचुप्रवेश करून न्यायव्यवस्थेने विधायक मंडळांवर आक्रमण केल्याचेही दिसत आहे. प्रत्यक्षात अशा याचिकांमागे दडून राजकीय वा आर्थिक स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला जात हे. यावर चाप बसवण्यासाठी प्रत्येक जनहित याचिकेसाठी १० लाख लोकांच्या सह्या वा अनुमोदन असण्याची गरज अनिवार्य केली जायला हवी. सांस्कृतिक राष्ट्रवादामुळे देश एक राहिला हे खरे, परंतु ही भारतीय संस्कृती एकाधिकारवादी नसून नेहमीच केंद्रित राहिली आहे. ती एका मुशीत घालण्याचा प्रयत्न केला गेला तर ते विघटनाला आमंत्रण ठरेल. त्याचप्रमाणे इतिहासामध्ये झालेल्या घटनांचे योग्य आकलन करून देशाची संस्कृती पुनरुज्जीवित करणे योग्य असले, तरी आपला इतिहास नाकारता येत नाही. काळाचे काटे मागे फिरवता येत नाहीत, ही जाण ठेवण्याची अत्यंत गरज आहे. गेल्या ७५ वर्षांमध्ये अनेक उपलब्धी असून त्यांचा सार्थ अभिमान त्येकाला असायला हवा. परंतु, केवळ त्यावर समाधान मानण्याऐवजी भविष्यकाळातील अनेक आव्हानांना तोंड देण्यासाठी आपण कार्यरत होणे गरजेचे आहे.



# दावोसमध्ये महाराष्ट्राचाच डंका

**महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस आहे, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या पहिल्याच दिवशी प्रत्यक्षात उतरले. तब्बल १४ लाख ५० हजार कोटी रुपयांचे १९ सामंजस्य करार झाल्याने राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली असून, यामधून १५ लाखांहून अधिक रोजगार संधी निर्माण होणार आहेत. ही गुंतवणूक थेट सर्वसामान्य जनतेच्या रोजगार, उत्पन्न आणि जीवनमानाशी जोडलेली आहे.**

लक्ष्यवेध

गायत्री श्रीगोंदेकर

राज्य शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या नेतृत्वाखाली हे करार झाले. आयटी, डेटा सेंटर, हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद उद्योग, ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाज बांधणी आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर यांसारख्या क्षेत्रांतील गुंतवणुकीमुळे तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे ही गुंतवणूक केवळ मुंबईपुरती मर्यादित न राहता रत्नागिरी, पालघर, गडचिरोली आणि अहिल्यानगर यांसारख्या भागांमध्ये पोहोचणार आहे. त्यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होऊन ग्रामीण व आदिवासी भागांच्या विकासाला चालना मिळणार आहे. उद्योग वाढीसोबतच स्थानिक पातळीवर रोजगार, पायाभूत सुविधा आणि आर्थिक स्थैर्य निर्माण होणार आहे. महाराष्ट्र पॅव्हेलियनच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्य शासन गुंतवणूकदारांचा विश्वास सार्थ ठरविण्यास कटिबद्ध आहे. करारांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वॉर रूमच्या माध्यमातून सतत देखरेख केली जाणार असून उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत व दर्जेदार पद्धतीने दिल्या जातील. 'मैत्री' या एकल खिडकी व्यवस्थेमुळे गुंतवणूक सुलभ झाली असून, कोका-कोला, आयकिया, स्कोडा ऑटो यांसारख्या जागतिक कंपन्यांनी विस्ताराची तयारी दर्शवली आहे. कार्लसबर्गसारख्या कंपन्यांनीही राज्याच्या उद्योगधोरणाचे कौतुक केले आहे. एकूणच, ही ऐतिहासिक गुंतवणूक राज्य सरकारच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे फलित असून, जनतेसाठी रोजगार, राज्यासाठी विकास आणि महाराष्ट्रासाठी उज्ज्वल भविष्य घडवणारी ठरणार आहे. तसेच दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक परिषदेत महाराष्ट्राने शहरी आणि औद्योगिक विकासाच्या दिशेने मोठे पाऊल टाकले असून तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी ही घोषणा करताना सांगितले की, हा प्रकल्प महाराष्ट्राच्या भविष्यातील नागरी विस्ताराचा आणि आर्थिक क्षमतेचा नवा केंद्रबिंदू ठरणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून अवघ्या १५ ते २० किलोमीटर अंतरावर हे ग्रोथ सेंटर विकसित करण्यात येणार असून, गेल्या तीन-चार वर्षांपासून सुरू असलेल्या परवानगी प्रक्रियेनंतर आता हा प्रकल्प प्रत्यक्षात येत आहे. रायगड-पेण परिसरात उभारले जाणारे हे ग्रोथ सेंटर म्हणजे तिसऱ्या मुंबईतील पहिले नियोजित शहर ठरणार आहे. या ग्रोथ सेंटरची संकल्पना 'प्लग अँड प्ले' आणि 'रेडी टू स्टार्ट' अशी असून, उद्योग, स्टार्टअप्स आणि सेवा क्षेत्रातील घटकांना तात्काळ कामकाज सुरू करता येईल अशी संपूर्ण पायाभूत सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हा देशातील पहिल्या प्रकारचा सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर आधारित प्रकल्प असून, शासन, एमएमआरडीए आणि खासगी गुंतवणूकदार एकत्रितपणे या शहराचा विकास करणार आहेत. रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये बीकेसीच्या धर्तीवर एक नवीन बिझनेस डिस्ट्रिक्ट उभारण्यात येणार आहे. येथे ग्लोबल कॅपॅसिटी सेंटर्स, फिनटेक इकोसिस्टम, आधुनिक कार्यालयीन संकुले, उच्च पगाराच्या नोकऱ्या आणि 'वॉक टू वर्क' संकल्पनेवर आधारित शहरी सुविधा विकसित होतील. या घोषणेनंतरच सुमारे एक लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. कोरिया, स्वित्झर्लंड, अमेरिका, फिनलंड, दुबई आणि सिंगापूरमधील आघाडीच्या उद्योग समूहांनी या प्रकल्पात गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली आहे. या परकीय गुंतवणुकीतून रायगड-पेण परिसरात एक आधुनिक, टिकाऊ आणि जागतिक दर्जाचे शहर उभे राहणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, रायगड-पेण ग्रोथ सेंटर ही केवळ एक औद्योगिक संकल्पना नसून, ती तिसऱ्या मुंबईच्या विकासाचा पाया आहे. या माध्यमातून महाराष्ट्राचा जागतिक गुंतवणूक नकाशावरचा दर्जा उंचावणार असून, भविष्यातील शहरी भारताचे हे एक महत्त्वाचे मॉडेल ठरणार आहे.




समाजभान

## डॉ. शुभांगी पारकर

# तणाव व्यवस्थापनासाठी समग्र दृष्टिकोन...

**मन व शरीरावर होणारे तणावाचे परिणाम कमी करण्यासाठी आतापर्यंत विविध उपाययोजना केल्या गेल्या. वेळेचे नियोजन, संघर्ष निवारण, प्रभावी संवादकौशल्ये, सामाजिक आधार, विनोदबुद्धी, लवचिकता, अध्यात्म, ध्यान, व्यायाम आणि योग यांचा त्यात समावेश आहे. मात्र, या सर्व उपायांकडे स्वतंत्र तंत्र म्हणून न पाहता, परस्परपूरक आणि एकत्रित दृष्टिकोनातून पाहिले असता, त्यांचा खरा व्यापक लाभ जाणवतो. म्हणूनच तणाव व्यवस्थापनाचा सर्वांगीण-समग्र ( होलिस्टिक ) दृष्टिकोन मन, शरीर आणि आत्मा या तिन्ही पातळ्यांवर एकाचवेळी नियोजन करून अंतर्गत समतोल आणि दीर्घकालीन मानसिक स्वास्थ्य निर्माण करण्यावर भर देतो.**



समग्र तणाव व्यवस्थापनात शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक आरोग्य यांचे परस्परसंबंध लक्षात घेतले जातात. तणाव वेगवेगळ्या स्वरूपांत प्रकट होतो आणि जीवनाच्या अनेक पातळ्यांवर परिणाम करतो, ही जाणीव या पद्धतींच्या केंद्रस्थानी असते. तणावाची मूळ कारणे ओळखून, व्यक्तीच्या अंतर्गत सुसंवाद व संतुलन निर्माण करणे, हा या दृष्टिकोनाचा उद्देश असतो. मन-शरीर यांचा संबंध (माईंड- बॉडी कनेक्शन) समग्र तणाव व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्त्वांपैकी एक म्हणजे, मन आणि शरीर यांचा अतूट संबंध. आपली मानसिक अवस्था शारीरिक आरोग्यावर परिणाम करते आणि शरीरातील बदल मनावर प्रभाव टाकतात. हा संबंध बळकट करणाऱ्या काही प्रभावी पद्धती पुढीलप्रमाणे -

**१. माईंडफुलनेस ध्यान (सजग ध्यान)**

केवळ ऐहिक लाभ, अप्रिय कामे आणि सततची जीवघेणी स्पर्धा एवढेच जीवन आहे, असे वाटू लागले की निराशा व तणाव वाढतो. ध्यान हे तणाव कमी करण्यासाठी आणि मानसिक स्पष्टता वाढवण्यासाठी एक शक्तिशाली पद्धत आहे. या पद्धतीमध्ये कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय वर्तमान क्षणाकडे लक्ष देणे समाविष्ट आहे.

आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करून आपले विचार व भावनांचे निरीक्षण केले जाते. निरीक्षक भावनेने पाहिल्यामुळे मन शांत होते आणि तणावाचा प्रभाव कमी होतो.

**२. योगाभ्यास**

योग ही एक सर्वांगीण पद्धत आहे, जी शारीरिक मुद्रा, श्वासोच्छ्वास व्यायाम आणि ध्यान यांचा संगम आहे. योगाच्या नियमित सरावाने तणावाचे व्यवस्थापन करण्याची तुमची क्षमता वाढू शकते.

भगवद्गीतेमध्ये, भगवान श्रीकृष्ण योगाची व्याख्या 'समत्वं योग उच्यते' अशी करतात. 'समत्व' म्हणजे यश आणि अपयश, लाभ आणि हानी, सुख आणि दु:ख या सर्व परिस्थितीमध्ये मनाचा समभाव राखण्यास सक्षम असले पाहिजे. तेच समत्व आहे, समभावाचा, शांततेचा आणि संयमाचा योग.

**३. संतुलित आहार**

बहुतेकांना हे लक्षात येत नाही की, तणाव शरीरातील आवश्यक पोषक तत्त्वे झपाट्याने खर्च करतो.

स्नायूंना शिथिल ठेवणारे व अस्वस्थ मन शांत करणारे मॅग्नेशियम, ऊर्जा- एकाग्रता- मन:स्थिती संतुलनासाठी आवश्यक बी-जीवनसत्त्व आणि रोगप्रतिकारशक्ती व मज्जासंस्थेसाठी महत्त्वाचे झिंक, हे सर्व ताणाच्या काळात शरीराची वाढत्या मागणीची पूर्तता करू शकत नाही. म्हणूनच तणावाशी लढण्यासाठी प्रक्रिया न केलेले, नैसर्गिक अवस्थेतील संपूर्ण अन्न हेच खरे 'कम्फर्ट फूड' ठरते.

**४. नियमित व्यायाम**

व्यायाम हा नैसर्गिक तणावनाशक आहे. नियमित व्यायाम तणावाच्या नकारात्मक भावनिक परिणामांपासून संरक्षण करतो. शारीरिक हालचालीमुळे मेंदूत 'एंडोर्फिन' या आनंददायी रसायनाचे उत्पादन वाढते, जे मेंदूतील नैसर्गिक वेदनाशामक आणि मन:स्थिती उंचावणारे घटक म्हणून कार्य करते.

चालणे, पोहणे किंवा नृत्य करणे यांसारख्या तुम्हाला आवडणाऱ्या कामांमध्ये व्यस्त राहिल्याने तणाव कमी होण्यास आणि एकूण आरोग्य सुधारण्यास मदत होते.

**५. पुरेशी झोप**

झोप हा आपल्या एकूण आरोग्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. झोपेचे फायदे केवळ विश्रांतीपुरते मर्यादित नसून, भावनिक नियमन आणि तणाव व्यवस्थापनासाठी पुरेशी झोप अत्यंत महत्त्वाची आहे.

योग्य आणि गुणवत्तापूर्ण झोप मन:स्थितीची स्थिरता आणि भावनिक लवचिकतेला प्रोत्साहन देते, ज्यामुळे व्यक्ती दैनंदिन तणावांना अधिक सहजतेने सामोरे जाऊ शकतात. याउलट, झोपेच्या समस्यांमुळे भावनिक प्रतिक्रियाशीलता, मन:स्थितीतील बदल आणि चिडचिडेपणा वाढतो, ज्यामुळे तणावाची पातळी आणखी वाढू शकते.

**६. सामाजिक आधार**

कुटुंबीय आणि मित्रांचा आधार भावनिक दिलासा देतो. मन मोकळे केल्याने ओझे हलके होते आणि नवीन दृष्टिकोन मिळतो. सामाजिक आधार आणि ज्या न्यूरोबायोलॉजिकल मार्गांद्वारे लवचिकता वाढवण्यासाठी आणि मानसिक आजार होण्याचा धोका कमी करण्यासाठी कार्य करतो, यावर नवीन संशोधन पुढे येत आहे. एकूणच, असे दिसून येते की उच्च दर्जाचा सकारात्मक सामाजिक आधार तणावाचा सामना करण्याची लोकांची क्षमता वाढवू शकतो. गंभीर आघाताशी संबंधित मानसिक विकृती विकसित होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करू शकतो आणि वैद्यकीय आजारपण व मृत्यूचे प्रमाण कमी करू शकतो.

**७. भावनांची अभिव्यक्ती**

डायरी लेखन, कला- चिकित्सा, समुपदेशन यांसारख्या माध्यमांतून भावना प्रभावीपणे व्यक्त करणे, हे मानसिक आरोग्य व सामान्य कल्याणासाठी अत्यावश्यक आहे. भावना मोकळेपणाने व्यक्त झाल्या की, त्या स्वीकारल्या व समजल्या जातात, एकाकीपण कमी होते आणि नातेसंबंध अधिक घट्ट होतात. त्यातून वाईट अनुभव पचवण्यास, स्वत:च्या गरजा व प्राधान्ये स्पष्ट होण्यास मदत होते. म्हणूनच भावना व्यक्त करणे, हे तणाव नियोजनात स्वत:ची काळजी घेण्याचे एक प्रभावी साधन बनते.

**८. निसर्गाशी नाते**

निसर्गात वेळ घालवणे केवळ आनंददायी नसून वैज्ञानिकदृष्ट्याही उपयुक्त आहे. संशोधनानुसार नैसर्गिक वातावरण तणाव कमी करते, रोगप्रतिकारशक्ती बळकट करते आणि कोर्टिसोलसारखे तणावसूचक रसायने कमी करते. निसर्गाच्या सान्निध्यात मनाला डिजिटल जीवनाच्या सततच्या ताणतणावांपासून विश्रांती मिळते, ज्यामुळे आत्मचिंतन, भावनिक संतुलन आणि सर्जनशीलता वाढते.

निसर्गाशी नाते जोडल्याने शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक सुसंवाद साधता येतो, जो आधुनिक जीवनाच्या दबावांना समर्थपणे तोंड देण्यास मदत करतो. समग्र तणाव व्यवस्थापन हे तणावाच्या सर्व पैलूंना एकत्रितपणे हाताळणारे प्रभावी साधन आहे. मन- शरीर संबंध, योग्य पोषण, भावनिक-सामाजिक संतुलन आणि आध्यात्मिक साधना यांवर लक्ष केंद्रित केल्यास जीवनात सुसंवाद आणि आरोग्य निर्माण होते. तणाव व्यवस्थापन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. स्वत:शी संयम आणि करुणा ठेवत, या पद्धती जीवनात समाविष्ट केल्यास अधिक निरोगी, संतुलित आणि अर्थपूर्ण जीवन जगता येते.

---

सुखात्म

## डॉ. अविनाश मोहरील




ऑफिसमध्ये दिवाळीच्या दरम्यान वेगवेगळ्या दुकानांमध्ये मिळणाऱ्या डिस्काऊंटसंबंधी चर्चा रंगली होती. लंच लवकर आटोपल्यामुळे सर्वांना जरा गप्पा मारण्याची संधी मिळाली होती. या सर्व गप्पांमध्ये आनंद मात्र नव्हता. तो आपल्या डेस्कवर बसून काम करीत होता. हे कुणाच्या तरी लक्षात आल्यावर त्याला त्याने हाक मारली, 'अहो आनंदजी या जरा इकडे, इतके जास्त काम केल्यामुळे आपला बॉस पगार वाढविणार नाही.' तेवढ्यात दुसरे कुणीतरी ओरडले, 'या हो आनंदराव, जरा मौलिक ज्ञान मिळतंय ते घ्या.' त्यापाठोपाठ सर्वांनीच हाका मारल्यामुळे आनंदला आपले काम बाजूला ठेवून त्या समूहाच्या गप्पांमध्ये सामील व्हावेच लागले. आनंदला मात्र यात रस नव्हता. कारण त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या महिन्याच्या पगाराची विल्हेवाट येत होती. मंडळींच्या चर्चा रंगल्या आणि आनंद मात्र अलगद त्याच्या गेल्या २० वर्षांच्या आयुष्याच्या आलेखात शिरला. महानगर पालिकेत लिपीक म्हणून लागलेला आनंद अचानक २५ हजार रुपये पगार मिळायला लागल्यामुळे फार खुश झाला होता. त्यानंतर त्याचे आयुष्य सुरळीत सुरू झाले. लग्न झाले, मुलगा झाला. घरी आई-वडील सोबत होते. परंतु साधारण पाच वर्षांनंतर कालचक्र फिरले. आनंदच्या आयुष्यात कठीण काळ सुरू झाला. वडिलांना अर्धांगवायू झाला व ते अंथरुणाला खिळले. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळू लागली व त्याकरिता दवाखान्याचा मोठा खर्च सुरू झाला. त्यातच आनंदच्या लहान भावाच्या व्यवसायामध्ये घोटाळा झाला. त्याच्यावर सुमारे २० लाखांवर कर्ज झाले. त्याचा परिणाम म्हणजे त्याचा लहान भाऊ व्यसनाधीन झाला. त्याचे सारे कर्जदार त्याच्या भावाच्या मागे लागले. भावाच्या मागचा ससेमीरा आनंदला बघवेना. लोक पैसे वसूल करायला घरी यायला लागले व त्यांच्या घाणेरड्या शिव्या ऐकाव्या लागायच्या. शेवटी आनंदला यासाठी पुढाकार घ्यावा लागला. कर्जाचा मोठा हप्ता त्याला पुढील २५ वर्षे पगारातून फेडायचा होता. भावाने काहीही करणे बंद केले व तो घरीच बसायला लागला. पुढे त्यालाही काही आजार झाले व त्याचाही खर्च आनंदलाच करावा लागायचा. संपूर्ण परिवाराचा खर्च एकट्या आनंदलाच करावा लागायचा. त्याची पत्नी फार शिकलेली नसल्याने मोठी नोकरी करू शकत नव्हती.

मुलगा मोठा झाल्याने त्याच्या शिक्षणाचा खर्च वाढू लागला होता. या सर्व प्रकारांमुळे आनंदला व त्याच्या पत्नीला इच्छा असूनही दुसऱ्या अपत्याला जन्म न देण्याचा कटू निर्णय घ्यावा लागला. फार दु:ख झाले होते आनंदला त्या दिवशी. पती-पत्नी एकमेकाला आधार देत होते, परंतु स्थिती दोघांचीही सारखीच होती. एकमेकांच्या डोळ्यातील अश्रू एकमेकांना दिसणार नाहीत, याची पुरेपुर काळजी ते दोघेही घेत होते. स्वत:च्या सर्व स्वप्नांना गुंडाळून ठेवून त्याने व त्याच्या पत्नीने जगण्याची सवय करून घेतली. त्यामुळे मोठमोठ्या दुकानांमध्ये मिळणारे डिस्काऊंट त्यांना कधीच दिसत नव्हते, मोठमोठ्या खरेदी आपल्याकरिता नाहीच हे त्यांनी ठरवून टाकले होते. म्हणूनच कार्यालयात सुरू असलेल्या चर्चेमध्ये आनंदला रस वाटत नव्हता. अचानक कुणीतरी बुटांच्या एका ब्रॅन्डेड कंपनीच्या महासेलबद्दल बोलत होते. आनंद आपल्या भूतकाळातून वर्तमानात आला. त्याचा मित्र त्याला सांगत होता, 'अरे आनंद, तुला नवा बुट घ्यायचा होता ना? बघ आता संधी आहे. तुला ५० टक्के डिस्काऊंटवर ब्रॅन्डेड कंपनीचा बुट मिळू शकतो.' आनंदला खरोखरीच एक चांगला बुट घ्यायचा होता, अनेक दिवसांपासून. त्याचा जुना बुट आता पार फाटून गेला होता. काही ना काही कारणांमुळे नवा बुट घेणे मागेच पडायचे. परंतु आता १५०० रुपयांमध्ये हा तीन हजाराचा बुट मिळणार होता, त्यामुळे घ्यावा का असा विचार त्याच्या मनात आला.

त्याच विचारात आनंद घरी आला. रात्री जेवणे झाल्यावर नेहमीप्रमाणे पत्नीसोबत एक फेरी मारायला तो निघाला. त्या दिवशी तो काहीच बोलत नाही हे बघून त्याच्या पत्नीने ओळखले की काहीतरी गडबड आहे. तिने बरेच वेळा विचारल्यावर त्याने तिला त्या डिस्काऊंटमध्ये मिळणाऱ्या बुटांबद्दल सांगितले. खरे तर त्यांना इतका मोजून मापून घर खर्च चालवावा लागायचा की त्यांच्यासाठी ती चैनच होती. कधी नव्हे ते आपल्या नवऱ्याला काही चांगले खरेदी करण्याची इच्छा झालीय म्हणून तिने त्याला तो बुट घेऊनच टाका असे सांगितले. त्या घराकरिता तो स्वत:च्या आवडी-निवडीही त्याने पूर्णपणे गुंडाळून ठेवल्यात, हे तिला चांगलेच ठाऊक होते. आठवड्यातून एकदा त्याला कधीतरी पान खायची हुक्की यायची; त्याने ते देखील बंद केले, हे ती जाणून होती. ती म्हणाली, 'मागच्या महिन्यात विजेचे बिल जरा कमी आले. त्यामुळे काही पैसे उरलेत. त्यात माझ्या जवळचे काही टाकूयात आणि तुम्ही उद्या तो १५०० रुपयांचा ब्रॅन्डेड बुट घ्याच. त्याने पण ठरविले, यावेळी हिंमत करून घेऊयात.

दुसऱ्या दिवशी ऑफिसला जाताना आनंदच्या बायकोने त्याला १५०० रुपये दिले. संध्याकाळी नवे बुट घालूनच घरी या आणि हे जुने तेथेच सोडून या. किती खराब झालेत ते आणि समोरून फाटले देखील आहेत. त्या दिवशी ऑफिसमध्ये आनंद आनंदातच होता. लंचमध्ये मुद्दाम त्या मित्राकडून बुटांवर डिस्काऊंट देणाऱ्या दुकानाचा पत्ता त्याने लिहून घेतला. आनंद सहस्त्रबुद्धे खरेदी करण्यासाठी दुकानाचा पत्ता मागताहेत हा एक आश्चर्याचा आणि त्यानंतर आनंदला चिडविण्याचा प्रसंग ठरला. आनंदनेदेखील ते चिडविणे एन्जॉय केले. सायंकाळी उत्साहातच तो त्या दुकानापाशी गेला. एकदम दुकानात शिरण्याची हिंमत झाली नाही; बाहेर शोकेसमध्ये लावलेले बुट त्याने न्याहाळले. सहजच त्याला वाटून गेले की, बऱ्याच दिवसांनी बुट घेतोय, तो देखील ब्रॅन्डेड तर मग बायको सोबत हवी. सेल सुरू आहे, सोबत तिला पण एखादी चप्पल घेऊन देऊयात. त्याने ठरविले की, घरी जायचे आणि बायकोला सोबत घेऊनच बुटाची खरेदी करायची. घरी आल्यावर बायकोला पटापट तयार व्हायला त्याने सांगितले. तिलाही बरे वाटले. ती तयार झाली. ५०० रुपये त्यानेदेखील त्याच्या जवळचे सोबत घेतले होते. कारण बुटांसोबत बायकोकरिता चप्पल घेण्याचा त्याचा विचार होता. ती दोघे बाहेर पडणार तेवढ्यात त्यांचा दहाव्या वर्गातील मुलगा शिकवणीवरून घरी आला. 'बाबा, मी दोन मिनिटात फ्रेश होऊन येतो. मला तुमच्याशी एक काम आहे. तुम्ही जरासे नंतर जाल का बाहेर?' अत्यंत लाडाचे पोर होते ते त्यामुळे त्याचे मायबाप थांबले. फ्रेश होऊन आल्यावर मुलगा म्हणाला, 'बाबा, माझ्या शाळेची ट्रीप जाते आहे परवा. मी नाव नोंदविले आहे. उद्या मला शाळेत सकाळी दोन हजार रुपये भरायचे आहेत. माझे सर्वच मित्र जाणार आहेत. मला पैसे द्या ना!' एकुलता एक मुलगा आहे आपला. त्याला काहीच कमी पडायला नको असे आनंदने आधीच ठरविले होते. क्षणाचाही वेळ न लावता आनंदने शर्टच्या खिशातून दोन हजार रुपये काढून मुलाच्या हातावर ठेवले. मुलाने, 'बाबा आय लव्ह यू' म्हणत त्याला मिठी मारली व पैसे घेऊन तो त्याच्या खोलीत निघून गेला. आनंदच्या मागे उभे राहून त्याच्या बायकोने हा प्रकार बघितला व तिने हलकेच त्याच्या खांद्यावर हात ठेवला. टचकन पाणी आले आनंदच्या डोळ्यात. पण बायकोला ते अश्रू दिसू न देता हसून तो म्हणाला, 'माझा जुना बुट उद्या शिवून घेतो, म्हणजे अजून एक वर्ष तर चिंता नाही.' आनंदचा मुलगा मात्र आनंदात निघून गेला होता. त्याला ते अश्रू दिसलेच नाहीत. मला असे वाटते, प्रत्येकच पिढीतील आईबापाच्या डोळ्यात हे असले मन मारल्याच्या प्रसंगांमुळे अश्रू येत असावे. परंतु त्या अश्रूंची किंमत मुलांच्या पिढीला बरेच वेळा कळत नाही; ती त्यांना आई- वडिलांच्या भूमिकेत गेल्यावरच कळते. ही असल्या अश्रूंची किंमत आधीच जर मुलांना कळली तर? सहसंवेदनांचा एक घट्ट अनुबंध तयार होईल.. दोन्हीही पिढ्यांमध्ये!

---

संस्कारांच्या देशा

## रमा गोळवलकर

गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म हे चार संस्कारजि/ज्याच्यावर झालेले आहेत ती/तो जन्मजात सनातनी असतो. अशाला 'अभिजात' म्हटल्यास वावगं ठरू नये. हेसगळे संस्कार म्हणजे ति/त्याला एक उत्तम व्यक्ती, सुसंस्कृत सुदृढसुघड कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्वाची/चा करण्याचा केलेला संकल्प. तेव्यक्तिमत्त्व पुढे या समाजाचा घटक म्हणून वावरणार आहे.त्याच्यामुळे हा समाज घडणार आहे, याची जाणीव ठेवून केलेलाप्रयत्न सफल झाला की, एक सनातनी बाळ जन्माला येतं. ती/तोसमाजाचाच एक भाग असला, तरीही ति/त्याचं म्हणून काही स्वतंत्रअस्तित्व असणार आहे. कुटुंबात, समाजात त्याची स्वतंत्र ओळखनिर्माण होणार. ती देण्याची पहिली पायरी म्हणजे ति/त्याचं नाव! या सगळ्याचा विचार करूनच त्या व्यक्तीला नाव देण्याची प्रथा अनादि कालापासून सुरू आहे. भारतीय परंपरेनुसार बाळाचं बारसं बाराव्या दिवशी करण्यात येतं. दहा दिवस वृद्धी-सोयाराचे असतात. त्या काळात आई आणि बाळ दोघेही स्थिर स्थावर होण्याच्या प्रयत्नात असतात. तेवढा वेळ त्यांचा म्हणून त्यांना द्यायलाच हवा. त्यानंतरचा म्हणजे अकरावा दिवस शुद्धिकरणादि कामात जातो. त्यानंतर लगेचचा दिवस म्हणून बाराव्या दिवशी कोणताही मुहूर्त न बघता पाळण्यात घालण्याची पद्धत आहे. आई, तेलपाणी करणारी बाई, आजी वगैरेच्या हातांवर,कुशीत, मांडीवर वाढणाऱ्या बाळाची स्वत:चं असं स्थान म्हणजे पाळणा. त्यात घालून मग त्याच्या कानात त्याचं नाव सांगायचं हीप्रथा आपण पाळतो.




नाव हे विशेषनाम असावं असा सनातनी प्रघात आहे. आजकाल तो पाळला जातोच असं नाही. कारण सध्याच्या इंटरनेटच्या युगात सर्च इंजिनच्या माध्यमातून चित्रविचित्र आणि निरर्थक प्रसंगी अनर्थक नावं शोधून ठेवण्याचा सपाटाच नवीन आई बापांनी लावलेला आहे. तरीही अर्थ गर्भ, सार्थ आणि विशेषत: देवी- देवतांची नावं मुला-मुलींना ठेवण्यात येतात. त्याचं कारण म्हणजे बाळात त्या त्या नावा प्रमाणे गुणधर्म उत्पन्न व्हावेत आणि त्याचं व्यक्तिमत्त्व दैवी अंश असलेला व्हावा. शिवाय, मुलांना जो कोणी हाक मारेल त्याच्या तोंडी आपसूकच देवाचं नाव येईल. विशेष नाव म्हणजे काय ते समजावून घेऊ. कृष्ण म्हणजे काळा हा झाला सर्वसामान्यांना माहीत असलेला एक अर्थ. पण 'कृष्ण' म्हणजे ओढणे/ आकर्षून घेणे या धातूपासून सिद्ध झालेला असल्यामुळे जो सर्वांना आपल्याकडे आकर्षून घेतो तो 'कृष्ण' असाया शब्दाचा अर्थ होतो. तर, शंकर (शं करोति) म्हणजे कल्याण करणारा असा होतो. वसुंधरा हे नाव पृथ्वीचं आहे. कारण वसु म्हणजे सोन्यासह इतर सगळी संसाधनं आणि मौल्यवान रत्नं- धातू इत्यादी जी धरून ठेवते ती. दुर्गतीचा नाश करणारी ती 'दुर्गा.' अशा व्याकरणदृष्ट्या अचूक आणि आशय समृद्ध नावांची सूचीच आपल्या पूर्वजांनी तयार करून ठेवलेली आहेत. देवी- देवतांची सहस्रनामावली! आजकाल त्यातही भेसळ होऊन विविध बाबा, साधू, माता, अम्मा इत्यादींच्या नावाच्या व्याकरणदृष्ट्या सदोष असलेल्या शत किंवा सहस्रनामावळ्याही प्रसिद्ध होत आहेत. भारतीय संस्कृतीत नाद म्हणजे ध्वनी (नादब्रह्म), शब्द म्हणजे सार्थ उच्चार (शब्दब्रह्म) आणि भाषिक शुद्धते (वैखरी)ला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आलेलं आहे. साहजिकच बाळाचं नाव हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचं अभिन्न अंग असतं, ज्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आभा अर्थात झळाळी प्राप्त होईल असंच सार्थक नाव निवडावं, असं धर्मशास्त्रकार सुचवतात. बाळाच्या नावांची यादीप्रसिद्ध करणारी पुस्तकं असोत की वेबसाईट्स त्यातली बहुतांश नावं व्याकरणदृष्ट्या चूक आणि अर्थ विपर्यास करणारी असतात, हे एक प्रमाणित सत्य आहे. त्यामुळे अशा याद्यांच्या आहारी न जाता संस्कृत विद्वान/विदुषीचं मार्गदर्शन घेऊन मगच बाळाचं नाव निश्चित करावं, असं नव्या पिढीच्या आई वडिलांना सुचवावंसं वाटतं. नामकरण विधीत बाळाला एकूण चार नावं ठेवावीत, असं'धर्मसिंधू' या ग्रंथात सांगण्यात आलेलं आहे. त्यातलं पहिलं नाव देवतासंबंधी नाम, दुसरं मासनाम, तिसरं नक्षत्रनाम आणि चौथं व्यवहारनाम. सर्वसाधारणपणे माता पित्याच्या किंवा कुटुंबाच्या आराध्य देवतेचं नाव आणि त्या पुढे भक्त किंवा दास या सारखंउप पद लावून ठेवलेलं नाव ते देवता संबंधी नाव. मासनाम म्हणजे ज्या सनातनी कालगणनेच्या ज्या महिन्यात बाळाचा जन्म झाला त्यानुसार ठेवलेलं नाव ते मास नाम. चैत्रापासून फाल्गुनापर्यंत अनुक्रमे ही नावं आहेत- वैकुंठ, जनार्दन, उपेंद्र, यज्ञपुरुष, वासुदेव, हरी, योगीश पुंडरीकाक्ष, कृष्ण, अनंत, अच्युत आणि चक्री. त्यानंतर ज्या नक्षत्रावर जन्म झाला त्यानुसार ठेवलेलं नाव ते नक्षत्र नाम. हे नाव बाळाच्या आई वडिलांना माहीत असावं. कारण याच नावाचा उपयोग करून जारण-मारणासारखे वामाचारी तंत्रविद्येचे प्रयोग केले जातात. मौंजीबंधनाच्या वेळी हे नाव बालकाच्या कानात सांगावं, असं शास्त्रकार सांगतात. माता-पिता आणि गुरूला नमस्कार करताना याच नक्षत्रसंबंधी नामाचा मनातल्या मनात उल्लेख करावा. चौथे नाव व्यवहारात वापरायचं असल्यामुळे ते कसं असावं, याचेही काही ठोकताळे देण्यात आलेले आहेत. त्यातले काही व्याकरणाशी संबद्ध आणि काहीसे क्लिष्ट आहेत. जिज्ञासूंनी'धर्मसिंधू' हा ग्रंथ मुळातून वाचावा. त्यातले दोन नियम मात्र सुगमआहेत. ते असे- पुरुष नावं सम संख्येच्या अक्षरांची आणि स्त्री नावं विषम संख्येच्या अक्षरांची असावी. प्रतिष्ठेची इच्छा असेल तर दोन अक्षरी नाव ठेवावं आणि ब्रह्म तेजाची अपेक्षा असेल तर चार अक्षरी असावे. नावाच्या शेवटी रे फ किंवा लकार नसावा. पुरुषाच्या वर्णाप्रमाणे नावाच्या शेवटी पदान्त असावं- शर्म किंवा देव ब्राह्मणांसाठी, वर्म किंवा राज क्षत्रियांसाठी, गुप्त किंवा दत्त वैश्यांसाठी आणि दास शूद्रांसाठी अशी विभागणी करण्यात येते. नावावरून व्यवसायाची ओळख पटणे ही पद्धत अन्य देशांतही आढळते. उदाहरणार्थ 'स्मिथ' म्हणजे धातूचे काम करणारा-गोल्डस्मिथ, ब्लॅकस्मिथ इत्यादी. नामकरण संस्कारांविषयी जाणून घेऊ या, पुढच्याभागात...

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# सौदी अरेबियात बर्फवृष्टी; चिंता भारताला



**उष्ण वारे आणि वाळवंटी हवामानासाठी ओळखल्या जाणाऱ्या सौदी अरेबियातील हवामान झपाट्याने बदलत आहे. आता वाळवंटी भागात पाऊस पडत आहे. शिवाय, बर्फवृष्टी झाली. सौदी अरेबियाच्या अनेक भागात बर्फवृष्टी, मुसळधार पाऊस आणि तापमानात घसरण यामुळे लोकांना आश्चर्य वाटले. हवामान बदल आता त्यासाठी तयार नसलेल्यांवरही परिणाम करीत आहे. त्याचा भारतावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.**

अलिकडच्या काळात सौदी अरेबियाच्या अनेक भागांमध्ये हिमवृष्टी दिसून आली आहे. सौदी अरेबियाच्या उत्तरेकडील ताबुक प्रांताच्या पर्वतांमध्ये मुसळधार हिमवृष्टी झाली. अनेक भागात बर्फाची पांढरी चादर दिसते. जेबेल अल- लॉजमधील २,६०० मीटर उंचीवर असलेल्या ट्रोजनामध्ये पावसासह हलकी हिमवृष्टी झाली. हेल प्रांतात अनेक ठिकाणी हिमवर्षाव झाला. येथे हिमवर्षाव दुर्मिळ आणि असामान्य मानला जातो. बर्फवृष्टी आणि पावसामुळे येथील अनेक भागांमध्ये तापमान गोठणबिंदूपेक्षा खाली गेले होते. उंचावरील अनेक भाग बर्फाच्या चादरीने झाकले आहेत. थंडीची लाट आली.

हिमवर्षावा व्यतिरिक्त पाऊसदेखील आश्चर्यकारक आहे. बीर बिन हरमास, अल-ऐना, अम्मर, अल-उला आणि शकरा येथे हलका पाऊस पडला, तर रियाध, कासिम आणि पूर्वेकडील भागात मुसळधार पाऊस पडला. पूर्वी वाळवंटात व्यापलेला सौदी अरेबिया अलिकडे बर्फाच्या चादरीने झाकला गेला. सौदी अरेबियाच्या राष्ट्रीय हवामान केंद्राच्या (एनसीएम) मते, रियाधच्या उत्तरेकडील अल-मजमाह आणि अलघाट येथे हिमवर्षाव झाला. तिथे मोकळे भाग आणि उंचावरील भाग बर्फाने झाकलेले होते. थंड हवेचा मोठा भाग मध्य आणि उत्तरेकडील भागात स्थलांतरित होऊन पाऊस पडणाऱ्या ढगांमध्ये मिसळल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. अल-मजमाह आणि अल- घाट येथे हिमवर्षाव पाहण्यासाठी लोकांची गर्दी जमली होती. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे चिंता निर्माण झाली. केवळ सौदी अरेबियामध्येच नाही, तर संयुक्त अरब अमिराती (यूएई) मध्येही हवामान बदलत आहे. अलिकडच्या काळात दक्षिण आशियामध्ये उष्णतेच्या लाटा विक्रम मोडत आहेत. मध्य पूर्वेमध्ये अचानक आलेला पूर आणि युरोप आणि उत्तर आफ्रिकेच्या काही भागात झालेल्या बर्फवृष्टीमुळे हे दिसून आले आहे की, हवामान बदलामुळे जगभरात हवामान अधिकाधिक अनपेक्षित बनत आहे. सौदी अरेबियासारख्या वाळवंटी देशात बर्फवृष्टी ही एक दुर्मिळ घटना मानली जाते; परंतु या हिवाळ्यात देशाच्या उत्तरेकडील भागात घडले, ते असामान्य आणि चिंताजनक होते. ताबुक आणि आसपासच्या पर्वतीय भागात तापमान अचानक घसरले. पर्वत आणि वाळवंट बर्फाच्या चादरीने झाकले गेले. त्यामुळे अधिकाऱ्यांना हवामानविषयक इशारा देणे भाग पडले. अशी परिस्थिती सामान्यतः थंड देशांमध्ये दिसते; मध्य पूर्वेतील वाळवंटांमध्ये नाही. वाळवंटातील बर्फवृष्टीचे व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर झपाट्याने व्हायरल झाले. लोक त्याकडे फक्त सुंदर दृश्ये म्हणून पाहत होते; परंतु त्यामागील संदेश अधिक गंभीर होता. वाळवंटातील बर्फवृष्टी दर्शवते की, पृथ्वीच्या हवामान प्रणालीमध्ये मूलभूत बदल होत असून त्याचे परिणाम आता स्पष्टपणे दिसत आहेत. या घटनेवरून हे स्पष्ट होते की, हवामान बदल आता दूरची किंवा काल्पनिक समस्या नाही. हा बदल आपल्या डोळ्यांसमोर आणि कधी कधी इतिहासात कधीही न पाहिलेल्या पद्धतीने घडत आहे. हवामान बदल फक्त तापमानवाढ नाही.

हवामान बदल म्हणजे तापमानात वाढ होणे असा अर्थ होतो. शास्त्रज्ञांच्या मते, वास्तव उलट आहे. पृथ्वी गरम होते, तेव्हा वातावरणात जास्त आर्द्रता आणि ऊर्जा साठवली जाते. यामुळे दीर्घकालीन हवामान पद्धतींमध्ये व्यत्यय येतो आणि अचानक, तीव्र आणि असामान्य हवामान घटना घडतात. म्हणूनच आपण आज जगभरात, विशेषतः भारतात आपण तीव्र उष्णतेच्या लाटा, अचानक मुसळधार पाऊस किंवा थंडीचा अनुभव घेत आहोत. अगदी अशा ठिकाणीही हे घडते जिथे असे काही घडण्याची अपेक्षा नसते. या वर्षी भारताने हवामान बदलाचे धोकादायक संकेत प्रत्यक्ष अनुभवले. उत्तर आणि मध्य भारतात उष्णतेच्या विक्रमी लाटा आल्या. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. त्यानंतर उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि सिक्कीममध्ये विनाशकारी ढगफुटी झाली. त्यामुळे व्यापक विनाश झाला.

दरम्यान, काही राज्यांमध्ये तोच मान्सून उशिरा आणि अनियमितपणे आला, तर इतर भागांमध्ये प्राणघातक पूर आला. या घटना केवळ योगायोग नाहीत, तर तणावाखाली असलेल्या हवामान प्रणालीची स्पष्ट चिन्हे आहेत.

भारतासाठी हा इशारा हिमवृष्टीसारख्या असामान्य घटनांपुरता मर्यादित नाही, तर संपूर्ण परिसंस्था अस्थिर होत असल्याचे संकेत देतो. भारतात, कृषी चक्र, पाणी व्यवस्थापन, शहरी नियोजन आणि विजेची मागणी हे सर्व निश्चित हवामान पद्धतींवर आधारित आहे. हे नियम मोडतात, तेव्हा नुकसान वाढते. पिकांचे नुकसान, शहरी पूर, अतिउष्णतेमुळे होणारे मृत्यू आणि आर्थिक नुकसान अशा परिणामांना सामोरे जावे लागते. उष्णतेला अनुकूल शहरांचे नियोजन, मजबूत पूर्वसूचना प्रणाली, पूर-सुरक्षित पायाभूत सुविधा, हवामान बदल रोखण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत; परंतु अनुकूलन आता अपरिहार्य आहे. सौदी अरेबियातील हिमवर्षाव केवळ व्हायरल बातम्या म्हणून नाकारता कामा नये. हे अशा जगाचे आणखी एक लक्षण आहे, जिथे हवामान अधिकाधिक अस्थिर आणि धोकादायक होत चालले आहे.

पृथ्वी गरम होत जाईल, तसतशा अशा तीव्र हवामान घटना वारंवार घडतील. संकट आता दाराशी नाही, ते आधीच आत आहे. संदेश केवळ भारतासाठी नाही, तर संपूर्ण जगासाठी स्पष्ट आहे.

हवामान संकट आता एक भयानक धोका नाही, तर सध्याचे वास्तव आहे. ते आता आपले दार ठोठावत नाही, तर आपल्या जीवनात आधीच प्रवेशले आहे. सौदी अरेबियातील ही घटना जागतिक दक्षिणमध्ये उदयास येणाऱ्या एका मोठ्या पॅटर्नचा भाग आहे. आग्नेय आशियामध्ये वारंवार येणाऱ्या पुरामुळे लाखो लोक विस्थापित झाले आहेत.

आफ्रिकेतील अनेक भाग दुष्काळ आणि मुसळधार पाऊस झेलत आहेत. त्यामुळे शेती उद्ध्वस्त झाली आहे. दक्षिण अमेरिकेतील असामान्य तापमानाचा परिणाम परिसंस्था आणि वीज पुरवठ्यावर झाला आहे. हे स्पष्ट होत आहे की, विकसनशील देशांना सर्वात जास्त त्रास सहन करावा लागत आहे. कारण लोकसंख्या दाट झाली आहे. पायाभूत सुविधा कमकुवत झाल्या आहेत. उपजीविका हवामानावर अधिक अवलंबून आहे.

अल्पकालीन हवामानातील अडथळेदेखील मानवीय आणि आर्थिक संकटात बदलू शकतात. या वर्षी ब्राझीलमधील बेलेम येथे झालेल्या कोप ३० हवामान शिखर परिषदेतही हा मुद्दा चर्चेचा केंद्रबिंदू होता. जगभर हवामान बदलाचे गंभीर परिणाम पाहायला मिळत आहेत. कुठे दुष्काळाची परिस्थिती आहे, कुठे पूरस्थिती आहे तर अनेक भागांमध्ये अनैसर्गिक घटना घडताना दिसत आहेत. सौदी अरेबियामध्ये हिमवृष्टी होणे, ही तशी दुर्मिळ बाब आहे; परंतु या हिवाळ्यात देशाच्या उत्तर भागात विलक्षण आणि चिंताजनक दृश्य पाहायला मिळाले. अशा घटना सहसा थंड हवामान असलेल्या देशांमध्येच पाहायला मिळतात. सौदी अरेबियातील बर्फवृष्टी हा भारतासाठीही एक गंभीर इशारा मानला जात आहे. वाळवंटातील या हिमवृष्टीने जगाला संकेत दिला आहे की, पृथ्वीच्या हवामान प्रणालीमध्ये काही तरी मूलभूत बदल होत आहेत. त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. हवामान बदल ही केवळ भविष्यातील किंवा काल्पनिक भीती राहिलेली नाही, हे या घटनेने स्पष्ट केले आहे. पृथ्वी तापत आहे, तसतशी वातावरणात आर्द्रता आणि ऊर्जा साठवण्याची क्षमता वाढत आहे. त्यामुळे हवामान चक्रांचा समतोल बिघडत आहे. याच कारणामुळे भारतासह संपूर्ण जगाला तीव्र उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी आणि अनपेक्षित ठिकाणी अचानक येणाऱ्या थंडीच्या लाटांचा सामना करावा लागत आहे. भारतासाठी हा इशारा बर्फाच्या वादळांबाबत नसून ढासळत चाललेल्या परिसंस्थेबाबत (इको सिस्टिम) आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करणे जितके गरजेचे आहे, तितकेच बदलत्या हवामानाशी स्वतःला जुळवून घेणे गरजेचे झाले आहे. सौदी अरेबियातील हिमवृष्टीकडे केवळ एक कुतूहल म्हणून पाहून दुर्लक्ष करता येणार नाही. उष्णता वाढत जाईल, तसतशा अशा विचित्र घटना वारंवार घडतील. त्यासाठी आता तयार राहावे लागेल. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)



## मौन झाली भाषा । एकांताची ।।

बरे माझे मज । गरिबीचे धन ।।
तुझे विस्मरण । होत नाही ।।१।।

नको देऊ मज । संपदा संपत्ती ।।
नसती आपत्ती । भजनात ।।२।।

कष्टाने मिळे ती । कुबेराची रास ।।
होता तुझा दास । इंद्र झालो ।।३।।

नामाचा परीस । गावला कृपेने ।।
आयुष्याचे सोने । झाले देवा ।।४।।

आता सुखावलो । उरली न आशा ।।
मौन झाली भाषा । एकांताची ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## भारतमातेची आम्ही लेकरं

भारतमातेची आम्ही लेकरं सदैव तिचा आदर करूया
परस्त्रियांना सन्मान देऊनी भारत देशाचा मान वाढवूया
आम्ही आहोत भाग्यवान जन्म मिळाला या पावन भू ीत
थोर संत-महात्मे जन्मले इथे अमृताचे बोल होते त्यांच्या वाणीत
एकमेकांना साह्य करूया गोरगरिबांचे आधार बनूया मतभेद
सारे जाऊया विसरून माणसासारखे जगून दाखवुया भारतम
ातेची आम्ही लेकरं गुणगान करूया, या निसर्गाचे बळीर-
ाजाला मदत करूनी सार्थक करूया मानवी जीवनाचे वीर
जवान लढले देशासाठी हसत हसत फासावर चढले वंदन
करूया सर्व महाविभूतींना ते जगी अजरामर होऊन गेले
भारतमातेची आम्ही लेकरं सदैव राहुया जागर सत्याचा साथ
धरूनी करूया भारतमातेचा जयजयकार

संगीता ठलाल

## प्रजासत्ताक दिन...

मित्रा, तुला कसं छान जमलंय
प्रजासत्ताक दिनावर भाषण देणं मी मात्र,
प्रजासत्ताकाचा अर्थच शोधत बसलोय गेले पंचाहत्तर
वर्षांपासून माझ्या घरातील डिक्शनरीत अजूनपर्यन्त....

दादाराव अवचार





# लावणी मध्ययुगाची सावली

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

लावणी' या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. लावणी या शब्दाची लवण म्हणजे मीठ किंवा चवीपासून उत्पत्ती झाली. त्यामुळेच लावणी म्हणजे शृंगारिक गीत असाही एक अर्थ काढला गेला आहे. पण केवळ शृंगारिक स्वरूपाची वर्णने म्हणजे लावणी ही लावणीची व्याख्या खरी नाही. मराठ्यांच्या १७ व्या शतकातील उत्तरेकडील स्वाऱ्यांमुळे मराठी घरांमध्ये पूर्वीपेक्षा जास्त चैनीची राहणी आली. घराण्यातील स्त्रिया अंगावर दागिने मढवून बाजारहाटीला जाऊ लागल्या. त्यामुळे शाहिरी लेखणीत पराक्रमाप्रमाणेच साजशृंगारही अभिव्यक्त होऊ लागला. याही काळात अनेक शाहिरांनी हिंदू देवदेवतांवर, तीर्थक्षेत्रांवर, सामाजिक परिस्थितीवर लावणी रचली आणि ही लावणी पुढील काळात इतिहासाचे महत्त्वाचे साधन बनली.

लावणीचा उगम १४ व्या शतकात मानला जातो. या लावण्यमयी लोकगंगेचा हा खळाळता प्रवाह जनसामान्यांपर्यंत पोहोचला तो पेशवाईच्या काळातच. सवाई माधवराव पेशवा (इ. स. १७७४- १७९५) आणि दुसरा बाजीराव पेशवा (इ. स. १७९५ ते १८१८) या दोघांनीही लावणीला राजदरबारी सन्मानाने वागवले. पेशव्यांच्या सांगण्यावरूनच होनाजीबाळाने लावणीला रागतालाचे मोतीहार घातले. कथा रूपातली लावणी आता घुंगरांच्या तालावर थिरकू लागली. होनाजी बाळा (इ.स. १७५४-१८४४), राम जोशी (इ. स. १७६२-१८१२), अनंत फंदी (इ. स. १७७४- १८१९), सगनभाऊ (इ. स. १७७८-१८४०), प्रभाकर (इ. स. १७६९-१८४३) हे सर्व समकालीन शाहीर पेशवाई काळातलेच. त्यांच्या प्रतिभेला दाद द्यायला हवीच; विशेष म्हणजे या सर्व शाहिरांनी त्या काळच्या समाजाचा आरसपानी तळही लावणीतून दाखविला आहे. काही लावण्यांमधील वर्णने आणि पेशवे दफ्तर नोंदी यात खूप साम्य आहे. म्हणूनच लावणी प्रकाराकडे इतिहासाचे एक साधन म्हणून बघणे अतिशय उद्बोधक ठरते.

होळी, दसरा, दिवाळी कोणताही सण असो, पेशवा दरबारात अनेक शाहीर हजर होत. त्यांना १० ते १५ रुपये एवढी बिदागी मिळायची. उत्तरेकडे अनेक राजकीय स्वाऱ्या पहिल्या बाजीराव पेशव्याच्या काळापासून झाल्या आहेत. छत्रसाल बुंदेला राजाला बाजीरावाने लष्करी संरक्षण दिले. त्या बदल्यात छत्रसालाने आपल्या राज्यातील काही प्रदेश तर दिलेच; पण बाजीरावाला बुंदेलखंडमधील काही हिऱ्यांच्या खाणींचेही अधिकार दिले. गोविंदपंत या बुंदेलखंडी प्रांताचे सुभेदार होते. हिऱ्याची वसुलीही तेच करायचे.

मध्यप्रदेशाहूनदेखील नानासाहेब पेशव्यांनी अनेकदा सोन्या-चांदीचे दागिने, रत्न, मोती तेथील आपल्या सरदारांकडून मागवले आहेत. मध्यप्रदेशातून उंची तलम वस्त्रे, वाळ्याचे पडदे, हस्तिदंत मागवण्याची रीत नानासाहेब पेशव्यांनी पाडली. सर्व मुघल राजे फळबागा आणि फुलबागांचे चाहते होते. जेव्हा औरंगजेब आपला मुलगा अकबर (दुसरा) याचा माग काढत दक्षिणेत आला तेव्हा उत्तरेतील डाळिंबे, मोसंबी, संत्री, फळाफुलांच्या बागा बऱ्हाणपूरमध्ये निर्माण केल्या गेल्या. पेशव्यांनाही फळाफुलांच्या बागांचा मोह आवरला नाही आणि त्यांनी अनेक रोपे तेथून मागितली. या सर्व समृद्ध ऐतिहासिक गोष्टींची झलक त्यावेळच्या लावण्यांमध्ये दिसते त्यामुळे लावण्यांकडे इतिहासाचे एक साधन म्हणून बघितले गेले पाहिजे. उदाहरणच द्यायचे झाले तर प्रभाकर या शाहिराच्या एका लावणीत फळाफुलांची उधळण झालेली दिसते. अननस, बदाम, डाळिंबे, खजूर, सीताफळ इत्यादी फळे तर गुलाब, मोगरा, गुलदावरी, सुवर्णचंपक, गुलछबू, शेवंती अशी वेगवेगळी सुगंधित फुले प्रभाकरच्या लावणीत येतात आणि त्यांचे समकालीन सगनभाऊंच्याही लावण्यांमध्ये फळाफुलांची रसदार आणि सुगंधित वर्णने येतात. गंमत म्हणजे १८१३ च्या दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दीमधील कागदपत्रात असलेल्या फळाफुलांच्या नोंदींशी लावणीतील फळाफुलांची नावे जुळतात. या ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये उल्लेख आहेत की, संत्री, डाळिंबे, द्राक्षे, खजूर आणि मोतिया, गुलाब, वेलीया, मदनबाण ही सर्व झाडे बाजीरावांच्या बगीच्यात होती. शाहिरांच्या लावण्यांमध्ये सुवर्णालंकारांनी वाकलेल्या ललनांची रसाळ वर्णने आहेत. त्यांच्या दागदागिन्यांमध्ये 'होरमुजी' मोत्याचा उल्लेख हमखास सापडतो. मध्यपूर्वेमधील 'होरमुझ' या बंदराजवळील आखाती प्रदेशात तयार होणारा हा पिवळसर तेजाळ मोती सुरतेला बाजारात आणला जाई. तो गुळाच्या रंगाचा म्हणून 'गुळधवा' असेही म्हटले जाई. पेशवे आपल्या मुकुटासाठी आणि त्यांच्या स्त्रिया गळ्यातील सरींसाठी किंवा नथीसाठी 'गुळधवा मोती' मागवायचे.

लावणीत होरमुजी मोतियांचे वर्णन असले तर समजायचे की उच्च प्रतीचे मोती आहेत. हे मोती सुरतहून यायचे त्यामुळे त्यांना 'सुरती मोती' म्हटले जायचे. पोवळी, माणिक, पाचू, इंद्रनील यांच्या नोंदी पेशव्यांच्या रोजनिशीत सापडतातच; पण लावण्यांमध्येदेखील स्त्रियांच्या दागिन्यांच्या वर्णनात या सर्व रत्नांची वर्णने केली आहेत. मध्ययुगीन काळात बऱ्हाणपूरला आणि पैठणला कापडाची मोठी व्यापारपेठ होती. आजही बऱ्हाणपुरात फिरताना अनेक घरांमध्ये हातमाग यंत्रांचा धडधड आवाज येत असतो. महमुद्या, गजनी हे कपडे बऱ्हाणपूरहून मागवले जात. गजनी प्रकारात एक धागा सुताचा आणि एक जरीचा वापरला जात असे. 'अंगावाणी' म्हणजे फुलांचा कशिदा काढलेले अंगरख्याचे सुती कापड होते. हा कपडा बऱ्हाणपुरहूनच यायचा. शाहीर विश्वनाथ यांच्या लावणीतील शब्दांमध्ये पेशवेकालीन कपड्यांचा तलमपणा उतरलेला दिसतो. **'बराणपुर पैठण थेट पोशाख आणिले तेथून। अंगावाणी चंदेरी महमद्या सांगितल्या म्या आतून।'** महादजी शिंदे यांच्या काळात इ. स. १७९३ च्या चैत्र महिन्यात रंगोत्सव सुरू झाला. होळीचा सण महाराष्ट्रात सुरू झाला, ही ऐतिहासिक नोंद अनेक लावण्यांमध्ये आलेली आहे. **'शके सत्राशेपंधरा चैत्रनामप्रमादीसंवत्सरे। अती आदरे पहा रंग खेळले।'** होळीचे रंग शृंगाररसात मिसळले आणि होनाजी बाळा, कवी मार्तंड या शाहिरांनी होळीच्या रंगात रंगुनी शृंगारिक लावण्या लिहिल्या. १६ व्या शतकाच्या पूर्वार्धात विजयनगरच्या साम्राज्यानंतर तंजावरचे 'नायक' राजे तेथील राजे झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे पिता शहाजीराजे तेव्हा विजापूर दरबारात होते. नंतर त्यांची नेमणूक दक्षिणेला झाली. पुढे शहाजीपुत्र व्यंकोजीने 'नायक'चा दारुण पराभव करून तंजावर जिंकले आणि कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा या प्रांतात आपली मऱ्हाठी संस्कृतीही पोचली. व्यंकोजीराजाने साहित्याला तसेच मराठी लोककलांना उत्तेजन दिले. शहाजीराजे (दुसरे), एकोजी (दुसरे), राजे प्रतापसिंह, राजे शरफोजी उर्फ सरफोजीराजे भोसले या राजांनी अनेक मराठी नाटके आणि लावण्या तामिळ लिपीत लिहिल्या आणि तेथील दक्षिणात्य जनतेला आपलेसे केले. या तंजावरी लावण्या शृंगारिक आणि आध्यात्मिकही आहेत. सरफोजी राजे भोसले यांनी तीर्थयात्रेची लावणी लिहिली. श्रीकृष्ण गोपीच्या थट्टामस्करीचे वर्णनही तंजावरी लावणीत येते. 'सोडी रे, सोडी रे, पदर श्रीकृष्णा कसं नाही मनाची चाड....' दूर लष्करात असणाऱ्या पतिविरहाचे वर्णन तंजावरी लावणीत सापडते. त्यांच्या स्त्रियांची विरहाची तगमग लावण्यांमध्ये उमटली. **'पतिराज गेले लष्करा गं। मला विसर पडेना जरा गं।। झाले महिने बारा तेरा गं। एक खबर धाडेना घरा जी।। माझ्या सौभाग्याचा दोरा गं। नाकी नत मोत्याचा हीरा गं।।'** चांदा जिल्ह्यात 'कुरुमार' नावाचे मेंढ्यांची लोकर कापून घोंगडी विकणारे आदिवासी लोक राहतात. त्यांनी सणासुदीच्या दिवशी सादर केलेल्या दंडारमध्ये लावणीला मोठे स्थान आहे. शृंगारिक लावणीचे पाखंडी, लस्करी, सिनगारी असे तीन भाग दंडारमध्ये आपण बघतो. लस्करी लावणीमध्ये- **'पती गेले लस्करात माझे परदेशा बाई। रात्र जाते वैऱ्याशीन मला झोप येत नाही।।'** अशा अर्थाचे पत्नीचे विरहगीत येते. दंडारी लावणीत रामायणी, ऐतिहासिक, गतकालीन लावणी असेही प्रकार येतात. ऐतिहासिक लावणीत प्रामुख्याने महाभारताचे वर्णन असते आणि 'गतकालीन' लावणीत पेशवाईतील घटना, शिवाजी महाराज, टिळकांना झालेली शिक्षा, गांधीजींची 'चले जाव' चळवळ अशा स्वातंत्र्यपूर्व काळातील ऐतिहासिक नोंदी गुंफलेल्या असतात. 'बर्डीवरूनी तोफ डागली, इंग्रज हो आला, तोफ काढुनी सलामी दिली, बत्ती दिली तोफेला।' काही लावण्यांमध्ये इंग्रजांनी केलेल्या सुधारणांचेही वर्णन येते. विशेषकरून इंग्रजांनी निर्माण केलेल्या आगगाडीचे कोडकौतुक गतकालीन दंडारी लावण्यांमध्ये झालेले दिसून येते. १८ व्या शतकाच्या सुरुवातीला दक्षिणेकडे मोठा दुष्काळ पडला होता. त्याबद्दलच्या दुष्काळी लावण्या राम जोशी आणि अनंत फंदी यांनी लिहिल्या आहेत. नर्मदेच्या पुराचे विदारक वर्णन दंडार लावणीत आले आहे.

**'मनी आनंदली नर्मदा, हासे खदखदा। मग आली उल्लासात, दनादना खेळे फुगड्या। ठोके मग उड्या, थडीच्या वर्त...।।'** शाहिरांना ऐतिहासिक सत्याचे भान निश्चितच होते आणि त्याचे प्रतिबिंब लावणीत उतरले आहे. अनेक राजांनी पदरी नाटकशाळा बाळगल्या होत्या. अनेक पेशव्यांच्या नाटकशाळा होत्या. या वास्तविकतेचे पडसाद लावण्यांमध्ये पडले आहेत. अनेक गावांना ऐतिहासिक महापुरुष लाभलेला असतो. गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांधला 'कोलू पाटील' हा कर्तृत्ववान महापुरुष लाभला होता. त्याबद्दलची लावणी नवेगावबांधची लावणी म्हणून प्रसिद्ध आहे. **'नवेगाव बांध आहे गुलजार की रस्ता वाहे, गावाच्या बाहेर राहे केवड्याचा बन। कोलू चिमन पाटील डोंगरवार, बांध बांधिले कवडी कवडीन।।'** मराठ्यांनी लावणीचे रोपटे दक्षिणेकडे रुजवले. दक्षिणेप्रमाणे ग्वाल्हेर, बडोदा, इंदूर, धार ही देखील काही काळ मराठी राज्याची केंद्रे होती. येथील राजे मराठी भाषिक असल्याने राजभाषा मराठी होती. त्यामुळे महाराष्ट्राबाहेर लावणी 'मराठ्यांची खरी गाणी' म्हणून ओळखली जात असे.


भरतमुनी म्हणतात, **'रसा भावा ह्याभिनया धर्मीवृत्तीप्रवृत्तय:। सिद्धि: स्वरास्तथातोद्यं गानं रंगश्च संग्रह:।।'** प्रयोगसिद्धीकरिता आठ रस, एकोणपन्नास भाव, चतुर्विध अभिनय, द्विविध धर्मी, चार वृत्ती, चार प्रवृत्ती, द्विविध सिद्धी, स्वर, आतोद्य, गान नाट्यसंगीत आणि त्रिविधरंग म्हणजे रंगभूमी हा नाट्यसंग्रहाचा पूर्णानुभव आहे आणि लावणी या प्रकारात हा पूर्णानुभव रसिकाला अनुभवायला मिळतो. या परिपूर्ण लावणीला मध्ययुगीन इतिहासाचे प्रभावी साधन म्हणून बघितले तर भूतकाळातील अनेक गुपिते आपल्याशी हितगुज करू लागतात.

रंजक आठवणी

**प्रशांत करमरकर**

# ३५ हजार संघस्वयंसेवकांना अशा पुरवल्या गुळ पोळ्या!

## तळजाईतील शिबिराला ४३ वर्षपूर्ण



**पुण्यातील तळजाई टेकडीच्या पठारावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भरवलेल्या 'प्रांतिक शिबिरा'ला नुकतीच १४ जानेवारी ४३ वर्षे पूर्ण झाली. तळजाईच्या पठारावर दोनशे एकर जागेवर हे शिबिर उभारण्यात आले होते. आणि १४, १५ ,१६ जानेवारी १९८३ असे तीन दिवस चाललेल्या या शिबिरात तब्बल ३५ हजार संघस्वयंसेवकांची उपस्थिती होती. शिबिराला ४३ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने या शिबिराच्या जागवलेल्या आठवणी...**

तळजाई येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रांतिक शिबिराची तयारी सुरू होती. मकरसंक्रांत आहे, तर येणार्या तीस-पस्तीस हजार स्वयंसेवकांना जेवणात गुळाच्या पोळ्या गोळा देऊया, असा विचार झाला. या निमित्तानं घरोघरी संपर्कही होणार होता.

तत्कालीन प्रांत संघचालक आणि शिबिराचे संयोजक बाबा भिडे हे मात्र त्याला राजी नव्हते. शिबिर संघाचं, मग लोकांकडून पोळ्या कशासाठी गोळा करायच्या? असं त्यांचं म्हणणं होतं. कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर गुळाच्या पोळ्या गोळा करण्याच्या उपक्रमाला त्यांनी मान्यता दिली. नंतर मात्र बाबांनी लगोलग पुणेकरांना आवाहन करणारं एक पत्रही लिहून दिलं. ते पत्र मोडीतील होतं. त्याचं आम्ही लगेच भाषांतर करून घेतलं. बाबांची मोडी स्वाक्षरी पत्रात तशीच ठेवली. या पत्राचं शहरात घरोघरी वाटप करण्यात आलं.

'प्रांतात हिंदुत्वाचा विषय पुढे नेण्यासाठी शिबिर ठरलं आहे. शिबिराला येणारे आपले पाहुणे समजून त्यांचं तोंड गोड करण्यासाठी गुळाच्या पोळ्या आपल्या घराजवळच्या संकलन केंद्रावर द्याव्यात,' असं आवाहन या पत्रात होतं. शिबिराच्या तयारीत मग खातेवाटप झालं आणि गुळाच्या पोळ्या गोळा करण्याचं खातं माझ्याकडे आलं. मला सहाय्यक म्हणून वासुदेवराव कुंटे होते. काम सुरू करताना 'मोतीबागे'त पहिली नगर कार्यवाहांची बैठक झाली. घरोघरी पत्र गेल्यामुळे प्रतिसाद यायला सुरुवात झाली. मात्र अनेक ठिकाणाहून असे निरोप आले की, गुळाच्या पोळ्या देण्याची इच्छा आहे; पण त्या कशा करायच्या याची माहिती नाही. मग त्यावर उपाय म्हणून गुळाच्या पोळ्या कशा तयार करायच्या याची माहिती सांगायची आणि त्याचं प्रात्यक्षिकही करून दाखवायचं, असा कार्यक्रम सुरू केला.

श्रीमती हेर्लेकर यांचा स्वयंपाक वगैरे करून देण्याचा उद्योग होता. गुळाच्या पोळ्या करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या प्रात्यक्षिकांचे कार्यक्रम अक्षरः आयोजित केले. पोळ्या गोळा करून प्रत्यक्ष द्यायच्या कुठे, असा विचार पुढच्या टप्प्यात आला. मग त्यासाठी मुख्य पोळी संकलन केंद्र आणि उपकेंद्र अशी योजना तयार केली. आठ-दहा उपकेंद्रातील पोळ्या मुख्य केंद्रावर येतील आणि तेथून त्या शिबिरस्थानी पाठवल्या जातील, अशी संपूर्ण शहराची रचना उभी राहिली. प्रत्येक नगराला एक प्रमुख नियुक्त झाला. गुळाच्या पोळ्या संकलनासंबंधी सातत्यानं बैठका सुरू झाल्या. किती पोळ्या गोळा होणार याचे आकडे येऊ लागले. नगरांमध्ये निकोप स्पर्धाही सुरू झाली.

शिबिर पठारावर आहे. कदाचित पोळ्यांना मुंग्या लागतील, हे लक्षात घेऊन गुळाच्या पोळ्या पुठ्ठ्याच्या खोक्यांमधून न्यायच्या असं ठरलं. एवढी खोकी आणायची कुठून? मग पुण्यातील औषध विक्रेत्यांच्या बैठका सुरू झाल्या. त्यांना आवाहन केलं की, तुम्ही तुमच्याकडील खोकी द्या. ते अगदी लगेच तयार झाले आणि त्यांच्याकडून खूप मोठा प्रतिसाद मिळाला.

प्रत्येक घरातून पाच पोळ्या याव्यात आणि ज्यांना शक्य आहे त्यांनी अधिक द्याव्यात, अशी योजना होती. किती पोळ्या गोळा झाल्या याची अचूक माहिती मिळण्यासाठी प्रत्येक केंद्राला तक्ताही करून देण्यात आला होता. त्यात गुळाच्या पोळ्या किती, साध्या किती आणि भाकरी किती याची नोंद केंद्रप्रमुखांनी केली.

खडीवाले वैद्य एक हजार गुळाच्या पोळ्या देणार आहेत, असं आम्हाला समजलं. म्हणून मी आणि वासुदेवराव कुंटे त्यांना भेटायला गेलो. तर तातडीनं त्यांनी आमच्या पुढ्यात गुळाच्या पोळ्या आणल्या आणि म्हणाले, 'खाऊन बघा, अशा पोळ्या चालतील नां.' शिवाय हेही सांगितलं की, पोळ्या टोपल्यांमध्ये भरून त्या टेम्पोतून पाठवण्याची व्यवस्थाही मीच करणार आहे. असा प्रतिसाद सर्वत्र मिळत होता.

शिबिर ज्या भागात होतं, त्या भागाचे नगरसेवक शिवाजीराव ढुमे हेही एक हजार गुळाच्या पोळ्या देणार आहेत असं समजलं. म्हणून आम्ही त्यांनाही भेटायला गेलो. ते काँग्रेसचे नगरसेवक. त्यांना म्हटलं, 'तुम्ही शिबिराला पोळ्या देत आहात म्हणून आम्ही मुद्दाम तुम्हाला भेटायला आलोयं.' तर ते म्हणाले, 'अहो, शिबिर माझ्या वॉर्डमध्ये आहे. म्हणजे मी यजमान आहे शिबिराचा. माझ्याकडे लोक येणार, मग मी गुळाच्या पोळ्या द्यायला नकोत का? म्हणून मी पोळ्या देतोय.' असा प्रतिसाद होता सर्वत्र.

शहरात जिथे साध्या पोळ्यांची विक्री केली जायची तिथे शिबिराच्या आधीचे पाच-सात दिवस 'तुम्ही गुळाच्या पोळ्या करून द्याल का' अशी विचारणा सातत्यानं केली जात होती. या शिबिरावर लोकांनी अलोट माया केली. टेम्पो चालक असोत वा रिक्षा चालक कोणीही कोणत्याही वाहतुकीसाठी पैसे घेतले नाहीत.

### असा होता प्रतिसादः-

प्रत्यक्ष १३ जानेवारी १९८३ रोजी गुळाच्या पोळ्यांचं संकलन संपूर्ण शहरातील केंद्रांवर सुरु झालं. मात्र अनेक घरांमधून १२ जानेवारी पासूनच पोळ्या यायला सुरुवात झाली होती. दिवसभर संकलन सुरू होतं. अनेक केंद्रांवर छान सजावट करण्यात आली होती. कमानी उभारण्यात आल्या होत्या.

तळजाई शिबिर गूळपोळी संकलन केंद्र असे कापडी फलकही लावण्यात आले होते. छोट्या केंद्रांवर जमा झालेल्या पोळ्या मुख्य केंद्रांवर येत होत्या आणि तेथून त्या टेम्पोतून शिबिरस्थानी पाठवल्या जात होत्या. शहरात शिबिरमय वातावरण झालं होतं. नागरिक उत्साहानं पोळ्या आणून देत होते. ज्यांना शक्य झालं नाही त्यांनी केंद्रावर येऊन पैसे दिले. रिक्षाचालकांनी त्यांच्या रिक्षांवर भगवे ध्वज लावले होते. शिबिरस्थान बघण्यासाठी आठ-दहा दिवस आधीपासूनच नागरिक मोठ्या संख्येनं येत होते. गुळाच्या पोळ्या हे शिबिर घरोघरी पोहोचण्याचं माध्यम झालं होतं. पोळी नुसती द्यायची नाही, हा संस्कार. त्यामुळे गुळाच्या पोळ्यांबरोबरही चटणी, साखर किंवा साध्या पोळ्यांबरोबर गुळाचा खडाही दिला जात होता. पुण्यातील सर्व पेठा, सोसायट्या, बंगले, सर्व भाग आणि सर्व वस्त्यांमध्ये या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

अगदी गोखलेनगरमधील चाळी, काशेवाडी, सोनावणे चाळ, वैदूवाडी, वडारवाडी येथील केंद्रांवरही पोळ्या मोठ्या संख्येत गोळा झाल्या. गोखलेनगर चाळींमधील कार्यकर्त्यांनी तर पोळ्यांच्या संख्येचा विक्रम करायचा असं पहिल्यापासूनच ठरवलं होतं. चंदू शेट्टी, अरविंद देवकर, सुरेश कुर्हाडे असे काही कार्यकर्ते त्यात अग्रणी होते.

### समाजाचं अलोट प्रेमः-

हा विषय सुरू होता, तेव्हा संघाचे वरिष्ठ अधिकारी आम्हाला म्हणायचे, एक लाख गुळाच्या पोळ्या गोळा झाल्या तरी तुम्ही जिंकलात.

प्रत्यक्षात शहरातून पावणेदोन लाख पोळ्या गोळा झाल्या आणि काही हजार गुळाच्या पोळ्या नागरिकांनी थेट शिबिरात आणून दिल्या.

समाजाचं जे अलोट प्रेम संघाच्या कामावर आहे, त्याचीच तर ही प्रचिती होती. शिबिराला आलेल्या सर्वांना पुणेकरांनी आपलं मानलं आणि 'हिंदू सारा एक...' ही अनुभूती मिळाली.

(राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. श्रीधरपंत फडके यांनी सांगितलेल्या आठवणींचे शब्दांकन.)



# औंध संस्थांनचे अधिपती श्रीमंत भवानरावांचे सूर्यनमस्कार प्रसारातील योगदान

निमीत्त...

**प्रा. डॉ. अमिता जावळे**

**भ्र. ९६८९२७२७१६**

सूर्यापासून प्रकाशाबरोबरच ऊर्जा व शक्ती देखील मिळते. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी सूर्यप्रकाश फार महत्त्वाचा आहे. सूर्यामुळेच संपूर्ण पृथ्वीवरील जीव निरोगी आणि आरोग्यपूर्ण जीवन जगू शकतात. २५ जानेवारी रोजी असणाऱ्या जागतिक सूर्यनमस्कार दिनाच्यानिमीत्ताने...

सूर्यनमस्कारात वापरल्या जाणाऱ्या अनेक आसनांचा उल्लेख प्राचीन ग्रंथात आढळतो. साष्टांग नमस्कार हे सूर्यनमस्कारातील महत्त्वाचे आसन प्राचीन काळापासून सूर्याला प्रणाम करण्याकरता वापरले जाते. अशा प्रकारच्या अनेक आसनांना एकत्र बांधून शास्त्रोक्त पद्धतीने संशोधन करण्याचे काम औंध संस्थांनचे पंतप्रतिनिधी श्रीमंत बाळासाहेब उर्फ भवानराव यांनी केले. ते स्वतः दररोज ३०० सूर्यनमस्कार घालत. त्यांच्या या सूर्यनमस्काराच्या वेडावर आचार्य अत्रे यांनी 'साष्टांग नमस्कार' नावाचे विनोदी नाटक देखिल लिहिले. त्यामुळे सूर्यनमस्कार या व्यायाम प्रकारला सार्वत्रिक स्वरूप प्राप्त झाले.

**पंतप्रतिनिधी भवानराव श्रीनिवास (बाळासाहेब):-** छत्रपती राजाराम महाराजांनी इ. स १६९८ मध्ये परशुराम पंतांना कराड, आटपाडी व औंध हे परगणे जहागीर देऊन प्रतिनिधी पद दिले होते. मात्र ब्रिटिश कालखंडात दळणवळणाच्या सोयीसाठी कराड परगना काढून घेतला आणि त्या बदल्यात प्रतिनिधींना ७२ गावे व ३९ वाड्यांचे औंध संस्थान दिले. त्यानंतर गादीवर आलेले भवानराव पंतप्रतिनिधी यांनी औंध ही संस्थांची राजधानी बनवली. १९०९ मध्ये संस्थांच्या गादीवर आलेले औंध संस्थांनचे पंतप्रतिनिधी भवानराव उर्फ बाळासाहेब श्रीनिवास कायद्याचा अभ्यास असलेले एक उत्तम चित्रकार, कीर्तनकार, वाचक, लेखक, वक्ता तसेच समाज सुधारक ही होते. आहार व व्यायामशास्त्रावर त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले होते. व्यायामांमध्ये विशेष करून सूर्यनमस्कार या जुन्या व्यायाम प्रकाराचे त्यांनी शास्त्रशुद्ध संशोधन करून पुनर्जीवन केले ते स्वतः दररोज सूर्यनमस्कार घालत होते. महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानापासून प्रेरणा घेऊन १९३९ मध्ये आपल्या संस्थानात विकेंद्रीत ग्रामराज्यावर आधारित अशी लोकशाही त्यांनी आणली आणि १९४८ साली औंध संस्थान स्वतंत्र भारतात विलीन होईपर्यंत त्यांनी ती टिकवून ठेवली. आपल्या संस्थानाचा कारभार लोकशाही पद्धतीने चालवताना त्यांनी अस्पृश्यता निवारण आणि पंक्तीभेद नष्ट केला. आपल्या संस्थानातील शाळांमध्ये सूर्यनमस्कार घालणे सक्तीचे केले होते. सूर्यनमस्कार घाला म्हणजे त्याच्या योगाने तुमच्या अंगी तडफ, धडाडी, साहस इत्यादी छात्र गुण उत्पन्न होऊन तुम्ही आरोग्यवान व्हाल असे भवानराव म्हणत. व्यायाम आणि मुख्यतः सूर्यनमस्कार याचा प्रचार पुरस्काराबद्दल त्यांचे नाव महाराष्ट्रात सामान्यांपर्यंत पोहोचले होते. नेत्रबलसंवर्धन, आहार आणि व्यायामशास्त्र या विषयावर त्यांनी ग्रंथ लेखन केले होते.

**भवानरावांची साष्टांग नमस्काराची पद्धत :-**

**साष्टांग नमस्कार श्लोक -**

उरसा शिरसा द्रष्ट्या वचसा मनसा तथा।पदाभ्यां कराभ्यां जानुभ्यां प्रणामः अष्टांग उच्यते।।

**अर्थ -** दृष्टी, मन आणि वाणी संयमीत करून (एक) छाती, (एक) मस्तक, (दोन) पाय, (दोन) हात, (दोन) गुडघे, या आठांनी जो नमस्कार करायचा त्याला 'साष्टांग नमस्कार' म्हणतात.

तालीम, जोर, बैठका, कुस्ती, सूर्यनमस्कार घालणे हा भवानरावांचा छंदच होता. व्यायाम आणि सूर्यनमस्कारामुळे त्यांनी शरीर व मन इतके कमावले होते की वयाच्या सत्तरीतही ते अगदी ताठ चालायचे. मिरज संस्थानचे समवयस्क राजे बाळासाहेब पटवर्धन यांच्या सांगण्यावरून भवानरावांनी वयाच्या ४५ नंतर सूर्यनमस्कार घालण्यास सुरुवात केली होती. दररोज पहाटे तीन वाजता उठून आंघोळ करून मोठ्याने सूर्यनमस्कार मंत्र म्हणून प्राणायामाबरोबर शास्त्रोक्त पद्धतीने ते सूर्यनमस्कार घालत.सतत वीस वर्ष सूर्यनमस्कार घातल्यानंतर त्यांनी सूर्यनमस्कारच्या प्रचार व प्रसाराला सुरुवात केली. भवानीरावांच्या मते, 'सूर्यनमस्कार घालण्यासाठी सात फूट लांब व अडीच फूट रुंद सपाट जमीन किंवा शहाबादी कडप्पा फरशी असावी. त्यावर एक आसन टाकावे. आंघोळ करून सूर्योदयापूर्वी सूर्यनमस्कार घालणे अतिउत्तम किंवा सूर्योदय होताना कोवळे ऊन अंगावर पडेल अशावेळी व स्थळी (जागेवर) मंत्रासहित सूर्यनमस्कार घालावेत.' भवानीरावांनी सूर्यनमस्काराला जी शास्त्रशुद्ध बैठक दिली त्यानुसार त्यांनी सूर्यनमस्कारामध्ये दहा आसने सांगितलेली आहेत ती १० आसने खालीलप्रमाणे:-

**१ : नमस्कारासन :-**

छातीमध्ये पूर्ण श्वास भरून घेत सूर्याभिमुख होऊन, दोन्ही पाय जुळवून आसनाच्या कडेला ताठ उभे राहावे, दोन्ही हातांची नमस्कार अवस्था करून हाताचे अंगठे छातीच्या खोबणीत जातील असे ठेवावेत, पाठीचा कणा ताठ, खांदे मागे खेचून, नजर आपल्या उंचीवर समोर स्थिर करावी, **(पान ६ वर)**

## शहाणी आजी



थोडं काही शिका मित्र हो
शहाणी आहे माझी आजी
ग्राहकांची करते रोज सेवा
ताजी ताजी विकते भाजी...
स्टीलच्या कपात पिते चहा
स्वतःची पण करते काळजी
शहर ठेवते सहज स्वच्छ
अशी माझी शहाणी आजी
काय फायदा घेऊन डिग्री
डोळे तु चे नाही उघडत
स्वतःच्या जिवाशी खेळता
आमंत्रण कॅन्सरला देता
तु च्या बेताल वागण्याने अर्धी शहरे झाली प्रदूषित
तु च्या नावे बोंबलतील श्वास घेतील जेव्हा दूषित
माझ्या एकट्याने काय होणार करंटा करू नको विचार
स्वतःपासून कर सुरुवात शहर स्वच्छ नक्की होणार
प्लॅस्टिक वरती खाऊ नको मंत्र साधा हा ठेव ध्यानात
असू दे माया या वसुंधरेवर शहाणी आजी जपून ठेव मनात

**बाबा देशपांडे**

## तू नसताना...

तू नसताना घरात, आताशा कसेसेच होते...
सवय तुझ्या चाहुलीची, मन आता काकुळते...
सैरभैर होते मन, सूने सूने वाटते...
शोधताना डाळ तांदूळ, भंबेरी माझी उडते...
खेकसू कोणावर, तूच सांग ना सखे....
धडधडते हृदयात, जेव्हा आजारी तू पडते...
दाखवत नसलो चेहऱ्यावर, पण पंढरी माझी घाबरते...
जीव होतो कावराबावरा, मन देवाकडे धावते...
अस्तित्व अर्धांगिनीचे, जगण्याची संजीवनी असते...
कोणी काहीही म्हणो, बायको ही प्रे ळच असते...
असेच झेलत राहू, एकमेकांचे रुसवे फुगवे...
चाळीस वर्षांचे सहजीवन, म्हणजे मुरलेले लोणचे...
चव त्याची जन्मभर, जिभेवर घोळू दे....
संगीतमय होते घर, जेव्हा बांगडी तुझी किणकिणते...
घरातला वावर तुझा, उदासीचे औषध असते...
तू नसताना घरी, कसेसेच वाटते...
वाटले आज अचानक लिहावेसे...

**शिरीष मुंजे**

# मुंबईची निवडणूक आणि भाषिक राजकारण

**यंदाची मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ही शहरातील विकासकामांपेक्षा मराठी अस्मितेच्या मुद्द्यावरच लढवली गेली. पालिकेत आता सर्वभाषिक नगरसेवक निवडून आले आहेत. तेव्हा त्यांनी त्यांच्या प्रभागात चोखपणे नागरी कर्तव्येच बजावणे अपेक्षित. मग, असे असेल तर राजकारणात नगरसेवक निवडीचा भाषिक निकष खरंच किती आवश्यक ठरतो?**

वेधक

**विजय कुलकर्णी**



एखाद्या लोकप्रतिनिधीची नेमकी मातृभाषा कोणती, केवळ यावरून राजकीय पक्षांनी त्यांना उमेदवारी देणे आणि मतदारांनीही त्याच चष्म्यातून मतदान करणे, ही बाब मुळात भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशासाठी किती पोषक म्हणावी, हाच खरा प्रश्न. कारण, जाती-धर्मानंतर आता 'भाषा' हा उमेदवार निवडीचा निकष प्रामुख्याने मुंबई महानगरपालिका निवडणुकीत दिसून आला. पण, मुळात एखादा नगरसेवक मराठी भाषिक आहे, म्हणून तो फक्त मराठी माणसांची तरी किती कामे इमानेइतबारे करतो, हे वेगळे सांगायला नकोच. त्यामुळे 'भाषा' हा कोणत्याही लोकप्रतिनिधीसाठी निवडीचा निकष असू शकत नाही.

यंदाच्या निवडणुकीत कधी नव्हे, तो हाच मराठी उमेदवारीचा मुद्दा प्रकर्षाने राजकारणाच्या केंद्रस्थानी आला. मराठी अस्मितेच्या मुद्द्यावरून पालिका निवडणूक लढलेल्या उबाठा गटाने आणि मनसेनेही अन्य भाषिक उमेदवारांना उमेदवारी दिली. उबाठाने लढवलेल्या एकूण १६३ जागांपैकी १४३ जागांसाठी मराठी, तर मनसेने लढवलेल्या ५२ जागांपैकी ४७ मराठी उमेदवारांना रिंगणात उतरवले. याचाच अर्थ, मराठीच्या मुद्द्यावरून लढणाऱ्या या दोन्ही पक्षांनाही- उबाठाला २०, तर मनसेला पाच अन्य भाषिकांना उमेदवारी द्यावीच लागली. मग, या दोन्ही मुंबईकेंद्रित पक्षांना त्या प्रभागांत तोडीचे मराठी उमेदवार का सापडले नाहीत? की, त्या-त्या प्रभागांची भाषिक समीकरणे बघूनच ठाकरे बंधूंनी हा निर्णय घेतला? हाच खरा प्रश्न.

दुसरीकडे भाजपने मुंबईत लढवलेल्या एकूण १३७ जागांपैकी ९३ उमेदवार मराठी होते, तर शिंदेंच्या शिवसेनेचे ९० पैकी ७२ उमेदवार मराठी होते. याचाच अर्थ असा की, सर्वपक्षीयांनी मराठी आणि अन्य भाषिक उमेदवारांना संधी दिलेली दिसते. मग, आता निकालानंतर चित्र काय ते पाहू... २०२६ च्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकूण ८० अमराठी उमेदवार नगरसेवक म्हणून निवडून आले. २०१७ साली हे प्रमाण ७२ इतके होते, ते आता ८० वर पोहोचले आहे. म्हणजेच, यंदा अमराठी नगरसेवकांचे प्रमाण हे ३५ टक्के इतके. यामध्ये भाजपचे ३८, काँग्रेसचे १८, 'एमआयएम'चे आठ, उबाठाचे सहा, शिंदेंच्या शिवसेनेचे तीन, राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन, समाजवादी पक्षाचे दोन, मनसेच्याही एका अमराठी नगरसेवकाचा समावेश आहे. पण, दुर्दैवाने यावरूनही विरोधकांनी भाजप कसा मराठीविरोधी आहे, याचाच अपप्रचार सुरू केला. परंतु, वास्तव हेच की, भाजपच्या मुंबईत निवडून आलेल्या एकूण ८९ पैकी सर्वाधिक म्हणजे ५४ नगरसेवक हे मराठीच आहेत. त्या खालोखाल १४ गुजराती, दहा उत्तर भारतीय, सहा राजस्थानी, दोन सिंधी-पंजाबी आणि तीन दक्षिण भारतीय अशी ही आकडेवारी. याचाच अर्थ, मराठी माणूस हा केवळ ठाकरे बंधूंबरोबरच उभा राहिला, हे अर्धसत्यच! सर्वसमावेशक दृष्टिकोन बाळगणाऱ्या भाजपलाही मराठी माणसाने लक्षणीय मते दिली, हे आकडेवारीवरून सिद्ध होते.

आताही मुंबईत 'बिहार भवन' उभारण्यावरून मनसेने लगोलग विरोधाचे हत्यार उपसले आहे. पण, अशी विविध राज्यांची, समाजाची भवने मुंबई आणि आसपासच्या परिसरात अगदी काँग्रेसच्या काळापासून आहेत. एवढेच काय, तर राजधानी दिल्लीतही 'महाराष्ट्र सदना'पासून ते अन्य राज्यांच्याही भव्य वास्तू आहेत. अशा एखाद्या वास्तूमुळे त्या शहराची मूळ ओळख शून्य टक्केही बदलत नाही. ते म्हणतात, 'मुंबईचा बिहार करून नका.' पण, मनोमन 'महाराष्ट्राचा तामिळनाडू व्हावा,' अशीच त्यांची इच्छा! तिथेही टोकदार भाषिक अस्मितेचे रूपांतर हळूहळू हिंदूविरोधी आणि राष्ट्रविरोधी राजकारणात कसे झाले, त्याचा आजवरचा प्रवास सर्वांसमक्ष आहेच. त्यामुळे मराठी माणसाने मराठी बाणा, अस्मिता जरूर जोपासाव्या; पण त्याचे राजकीयीकरण करणाऱ्यांच्या जाळ्यात अडकू नये.

सुदैवाने मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूक निकालांनी, येथील मराठी माणसाने ठाकरेंच्या या विभाजनवादी राजकारणाला नाकारून महायुतीच्या विकासवादी राजकारणालाच स्पष्ट कौल दिला आहे. खरंतर मुंबई ही आज नव्हे, तर वर्षानुवर्षांपासून, परंपरागतच सर्वसमावेशक. हीच सर्वसमावेशकता मुंबईचे बलस्थान ठरली. मुंबईने सगळ्या समाजांना, धर्मांना समसमान वागणूक दिली. कोट्यवधींच्या हातांना रोजगार दिला, लाखो उद्योगधंद्यांना बाजारपेठ दिली. हे वैविध्य मुंबईच्या राजकीय पटलावरदेखील कालपरत्वे उमटले. आज मुंबईचा महापौर मराठीच हवा म्हणून राजकीय भूमिका घेणारे हे विसरले की, यापूर्वी कित्येक अमराठी महापौरांनीही मुंबईची तितकीच सेवा केली.

बी. के. बोमन बेहराम, एम. डी. मेहता, एम. एस. देवरा, ए. यू. मेनन, एम. एच. बेदी, आर. आर. सिंग आणि अशा आणखीन बर्याच अमराठी व्यक्तींनी मुंबईचे महापौरपद भूषविले. पण, १९९४ पासून बदलत्या राजकीय प्रवाहानुसार मुंबईचा महापौर हा मराठी माणूसच राहिला.

महापौरपदासाठी जसे महिला, पुरुष, खुला वर्ग असे आरक्षण जारी केले जाते, तसे मुंबईच्या महापौरपदासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे 'तो मराठी भाषिकच हवा' ही अट कायमस्वरूपी रुढ झाली. असो. पण, शेवटी महापौर, नगरसेवक कोणती भाषा बोलतो, त्यापेक्षा या शहरासाठी तो किती जनसेवेचे व्रत अंगीकारतो, हाच खरा मुंबईकरांसाठी सर्वोच्च निकष!

संत

**प्रकाश एदलाबादकर**

# जैसे लोह परिसें पालटला तो लोखंड न होय !



देवासमोर नंदादीप शांतपणे तेवत होता. देवपूजा आटोपली होती. देवासमोर लावलेल्या उदबत्तीचा मंद सुगंध आणि देवाला वाहिलेल्या फुलांचा गंध यांचा मिश्र गंध पसरला होता. संत गजानन महाराजांच्या चरित्रावरील 'गजानन विजय' या पोथीचा रोज एक अध्याय मी वाचत असतो. तो ग्रंथ हातात घेतला. कपाळाला लावला. ग्रंथामधील खूण (बुकमार्क) बाजूला केली. आज पाचवा अध्याय वाचायचा होता. अनेकदा पारायणे केल्याने ग्रंथ पाठ नव्हता झाला, पण ओळखीचा झाला होता. संतश्रेष्ठ दासगणू महाराजांनी लिहिल्यानुसार त्याची प्रचीती येत होती. एखाद्याने लिहिलेल्या शब्दांनी आपल्या मनाला वेगळे वळण मिळून एका प्रकाशाच्या मार्गाकडे आपला प्रवास सुरू होणे यालाच साक्षात्कार म्हणत असावे. एक तर दासगणू महाराजांचे अत्यंत प्रवाही आणि प्रासादिक लेखन आणि त्याला निर्व्याज भक्तीचा सुगंध! हा अनुभव घ्यावा लागतो. साहित्य म्हणजे, जीवनाच्या सहित जाते ते, असे आचार्य विनोबा म्हणतात; ते समर्पकच आहे. म्हणून 'गजानन विजय' या ग्रंथाकडे केवळ एक पोथी म्हणून न बघता तो अध्यात्म आणि व्यवहार यांची सांगड घालणारा अप्रतिम ग्रंथ आहे, हेसुद्धा लक्षात घ्यायला हवे. मात्र तशी श्रद्धा आणि विश्वास मनात हवा. '**हे गजानन चरित्र भागीरथी। कथा या तोय निश्चिती। महाराष्ट्र ओव्या तयावरती। लहरी समाज विबुधहो।। वा कल्पवृक्ष हे स्वामीचरित। शाखा अध्याय तयाप्रत। पद्यरचना हीच सत्य। पालवी ह्या वृक्षाची।।**'

पाचवा अध्याय वाचायला सुरुवात केली. त्याच्या शेवटाकडे जसजसा येतो तसे दरवेळेस माझे डोळे पाझरू लागतात. कारण त्या अध्यायातील भास्कराची कथा. आजच्याच सारखे वैशाखातील रणरणते उन्ह. महाराज तहानलेले आहेत. पाण्यासाठी वावरा- शिवारातून भटकत आहेत. भास्कराने त्याच्या जवळचे पाणी द्यायचे नाकारले आहे. महाराज एका विहिरीजवळ येतात. ती विहीर गेली बारा वर्षे कोरडी आहे. पाण्याचा एक थेंबही नाही. महाराज आपल्या लीलेने तिला जलमय करतात. येथे माझ्या अल्पमतीला प्रश्न पडतो की, महाराजांजवळ एवढे सामर्थ्य होते तर ते भास्कराकडे पाणी मागायला गेलेच कशाला? परंतु संतांच्या कृतीची खरी गोम इथेच आहे. कोरड्या विहिरीला पाणी आणून महाराजांना काही चमत्कार करायचा नव्हता. प्रपंचाच्या आणि व्यवहाराच्या तापाने भास्कराच्या मनातील नष्ट झालेला भक्तीच्या ओलाव्याला पुन्हा पाझर फुटावा, हा महाराजांचा हेतू होता. जिथे ओलावा असेल तिथेच पाझर फुटतो. भास्कर जरी म्हणत असला की, माझ्या मनाची विहीर कोरडी होती, तरी भास्करच्या मनात ओलावा नव्हता, असे नाही. त्याचे स्मरण फक्त महाराजांनी करून दिले. '**माझा निश्चय हीच विहीर। कोरडी ठणठणीत साचार। होती दयाळा आजवर। थेम्ब नव्हता पाण्याचा।। ती विहीर फोडण्याला। तुम्हीच हा प्रयत्न केला। साक्षात्काराचा लाविला। सुरुंग खडक फोडावया।।**' महाराजांनी साक्षात्काराचा सुरुंग लावला. सुरुंगाला अग्नीचा स्पर्श झाला की, क्षणात त्याचा स्फोट होतो. मनातील भावनांना योग्य वळण प्राप्त व्हायलाही असा एकच क्षण पुरेसा होतो. तो यावा लागतो आणि तो आपोआप येत नसतो. महाराजांना पाणी नाकारणारा भास्कर त्याक्षणी देहबुद्धीने वागला म्हणून महाराजांनी त्याची आत्मबुद्धी जागृत करायला हे सारे घडवून आणले. देहबुद्धी ऐवजी आत्मबुद्धी प्रमाण मानली की मनात विनम्रता येते. मनातील अहंकार नष्ट होतो. यालाच संतकृपा म्हणतात. आपले मन करुणेने भरून येते आणि सर्वांठायी परमेश्वरी चैतन्याची अनुभूती येते. आपल्या शब्दांना मोल प्राप्त होते. अहंकार आणि अज्ञान यांनी विवेक आणि जाणीव आंधळे होतात. ही अंधता नष्ट होऊन पुनश्च करुणामय दृष्टी परत यावी, हाच संतांचा हेतू असतो. महाराजांनी भास्करच्या डोळ्यात असेच अंजन घातले. त्याच्या मनाच्या तळाशी असलेल्या संदेहाच्या खडकांना फोडले. अंतर्ज्ञान जागृत केले. भास्करासाठी हा आत्मानुभूतीचा क्षण होता. तो लीन होऊन बोलला... '**तेणे फुटला हा खडक। भावाचे लागले उदक। आता मळा नि:शंक। भक्तिपंथाचा लावीन मी।। वृत्तीच्या मेदिनीठायी। फळझाडे मी लावीन पाही। सन्नीतीची माझे आई। तुझ्या कृपेंकरुनी।। सत्कर्माची फुलझाडे। लावीन मी जिकडे तिकडे। हे क्षणैक बैलवाडे। यांचा संबंध आता नको।।**' ही आत्मानुभूती होणे याला साधना लागते. ही साधन भास्करने केली होती किंवा नाही हा प्रश्न निरर्थक आहे. सार्थक आहे ते त्याला उपरती होणे. ही साधना आपल्या रोजच्या कर्मातूनही होते. ही आत्मानुभूती आपले पाय जमिनीवर घट्ट रोखते. स्वतःची जाणीव पक्की होते. आपल्या विशुद्ध स्वरूपाचा गाभा ज्या क्षणी आपल्याला पूर्णतः गवसतो त्या क्षणी जाणतेपणाचा उगम होतो. जाणतेपणाच्या मुळाशी ब्रह्मजिज्ञासा असावी लागते. यासाठी संतांचे शब्दच सहायक ठरतात. डोळ्यावर झापड न लावता चौफेर दृष्टीने जग न्याहाळता आले पाहिजे. हे जाणतेपणी आले की, आपल्या आणि लोकमानसाचाही योग्य वेध घेता येतो. लोकमानस एक वेळ जाऊ दे, स्वतःचे मानस ओळखू येणे आवश्यक आहे. संत ज्ञानेश्वरांच्या रचनेतील एक ओळ येथे प्रकर्षाने आठवते, '**अरे अरे ज्ञाना झालासी पावन। तुझे तुज ध्यान कळों आले।।**' आपली आपल्याशीच ओळख होण्यासारखे सुख नाही. शेवटी परमार्थ साधना म्हणजे आहे तरी काय? तो आत्मशोधच आहे. कवी श्रीनिवास रामचंद्र बोबडे यांची चार ओळींची एक कविता आहे. '**सागर पोहत बाहुबळाने, नाव तयास मिळो न मिळो रे। स्वयेच जो तेजोनिधी तरणी, तदगृही दीप जळो न जळो रे।। जो करी कर्म अहेतू निरंतर, वेद तयास कळों न कळों रे। ओळख पटली ज्यास स्वतःची, देव तयास मिळो न मिळो रे।।**' स्वतःच्या बलिष्ठ बाहुबळावर समुद्र पोहून जाणाऱ्याला नाव मिळाली काय आणि न मिळाली काय, काही फरक पडत नाही.

(पान ६ वर)

उगवतीचे रंग

**विश्वास देशपांडे**

भ्र. ९४०३७४९९३२

# गाठी: आतल्या आणि बाहेरच्या...



परवा माझा एक मित्र दुसऱ्या एका मित्राबद्दल बोलताना म्हणाला, 'अरे, तो ना फार आतल्या गाठीचा आहे बरं का! त्याच्यापासून सावध राहा. 'तो हे बोलून तर गेला पण मी विचार करायला लागलो. खरोखर आतल्या गाठीचा म्हणजे कसा असेल? तसा हा शब्द मला नवीन नव्हता.

मी लहानपणापासून तो ऐकत आलो होतो. आतल्या गाठीचा म्हणजे आपल्या मनात काय आहे ते दुसऱ्या व्यक्तीला सहजासहजी समजू न देणारा. या अर्थाने मला हा शब्द माहिती होता. पण तो कसा आला असावा याचा विचार करता करता मला गाठी आठवल्या. पूर्वी किराणा दुकानातून वाण सामान आणताना वाणी ते सामान बहुधा कागदात बांधून द्यायचा. त्याला एक दोरा गुंडाळून त्याची गाठ मारली जायची. घरी गेल्यावर वस्तू काढताना हा दोरा सोडायचा. कधी कधी सुती दोरी किंवा सुतळीने बांधलेली एखादी वस्तू घरात यायची. त्यालाही सुतळी गच्च आवळून गाठ मारलेली असायची. ही गाठ सोडवण्याचे दोन मार्ग असायचे. एक म्हणजे हातांनी ती गाठ सोडवण्याचा प्रयत्न करणे आणि दुसरा मार्ग अतिशय सोपा. तो म्हणजे ब्लेड, सुरी किंवा कात्री यांच्या साहाय्याने ती गाठ कापून काढणे.

यातील पहिला प्रकार माझा आवडता. त्या गाठीवर शल्य कर्म करण्याआधी हाताने ती सुटते का हे पाहायला मला आवडायचे. काहींना तेवढा धीर नसायचा. ते आपले पटकन ब्लेड, सुरी इत्यादींचा वापर करून ती दोरी कुठेही कापायचे. मग अशा वेळी ती दोरी अखंड न राहता तिचे तुकडे व्हायचे आणि पुन्हा ती वापरता येईलच अशा कामाची राहायची नाही. ती पुन्हा वापरायचीच असेल तर पुन्हा तिला गाठीच माराव्या लागायच्या ही त्यातली गंमत. गाठींचेहि वेगवेगळे प्रकार. काही सहज सुटणाऱ्या आणि काही निरगाठी.

निरगाठी म्हणजे सहजासहजी न सुटणाऱ्या. गाठी या जीवनातील अडचणींचे निदर्शक आहेत असं मला वाटतं. जशा काही गाठी सहज सुटतात, तशा जीवनातील काही अडचणींवर प्रयत्नांनी सहज मात करता येते. काही गाठी या निरगाठी असतात. त्या सहज सुटत नाहीत.

जीवनातील काही अडचणी सुद्धा अशाच असतात. त्या सोडवत बसण्यात वेळ वाया घालवणे किंवा त्याबद्दल सतत कुरकुरत राहण्यापेक्षा त्यांचा एकदा स्वीकार केला की जगणं तसं सोपं होऊन जातं. अशा गोष्टी माणसाची सहनशक्ती वाढवतात, जगण्याचं बळ देतात. शरीरावर असणाऱ्या गाठी हा मात्र गाठींचा एक वेगळाच प्रकार! शरीरावर दिसणाऱ्या गाठी या लक्षात येतात. त्या लक्षात आल्या म्हणजे त्यावर काही उपाय तरी करता येतो.

अलीकडे गोळ्या औषधांनी त्या गाठी विरघळवणे किंवा ऑपरेशन करून त्या काढून टाकणे अशा गोष्टी करता येतात. पण अर्थात त्या लक्षात आल्या तर... पण शरीराच्या आत वाढणारी गाठ? ती फार धोकादायक असते. सहजासहजी लक्षात येत नाही. एखादी शारीरिक समस्या जेव्हा उग्र रूप धारण करते, तेव्हा वैद्यकीय तपासणीअंती अशी गाठ लक्षात येते. कधी कधी अशा गाठींवर उपचार करणे कठीण होते कारण रोग हाताबाहेर गेलेला असतो.

म्हणूनच वर दिसणाऱ्या गाठीपेक्षा ही आतली गाठ अतिशय घातक असते. खरं, म्हणजे आपण जेव्हा एखाद्या व्यक्तीला आतल्या गाठीचा म्हणतो, तेव्हा ती गाठ त्याच्या शरीरापेक्षा मनाशी अधिक संबंधित असते. सरळ वागणाऱ्या साध्या माणसांचे व्यक्तिमत्व पारदर्शी असते. मन निर्मळ असते. त्यात कुठे काही कचरा, घाण साठलेली नसते. स्वच्छ, नितळ पाणी पारदर्शक असते. त्याचा तळ सहज दिसतो. गढूळ पाण्याचा अंदाज येत नाही. तसंच मनाचंही असतं.

मनाचा तळ दिसत नाही. जेव्हा मनात घाण किंवा कचरा साठतो, तेव्हा गाठ निर्माण होते. ही गाठ बाहेरून दिसत नाही. जसा शरीरात किंवा शरीरावर मळ साठू देऊन चालत नसते, तसेच मनातही साठणार नाही याची दक्षता आपल्याला घेता येईल का? संत कबीर म्हणतात-

**मन मैला तन उजला, बगुला कपटी अंग। तासो तो कौवा भला, तनमन एकही रंग।।** आजकाल दिखाऊ संस्कृती वाढली आहे.

कबीर म्हणतात त्याप्रमाणे वरवर झकपक कपडे, दागिने, सुगंधी स्प्रे पण आतून मन मात्र स्वार्थ, लोभ, मोह, काम, क्रोध यासारख्या गोष्टींनी मलीन झालेलं. अशा माणसांना कबीर बगळ्याची उपमा देतात. बगळा दिसायला पांढराशुभ्र पण त्याचं लक्ष मात्र शिकारीकडे! त्यापेक्षा कावळा तरी चांगला.

आत एक आणि बाहेर एक असा प्रकार नाही. संत तुकाराम म्हणतात, 'बोले तैसा चाले, त्याची वंदीन पाऊले. अंगे झाडीन अंगण, त्याचे दासत्व करीन' अशा माणसांची तर मी सेवासुद्धा करायला तयार आहे असे तुकाराम महाराज म्हणतात.

एवढा महिमा साध्या सरळ आणि निर्मळ मनाच्या माणसांचा आहे. पण असे वागणे मुळीच सोपे नाही. त्यासाठी सद्ग्रंथ, सद्विचार आणि सज्जनांचा संग यांची कास धरावी लागेल. मनाला जाणीवपूर्वक वळण लावावे लागेल.

प्रबंधांची बीजे

**श्रीरंग हिर्लेकर**

# राजवाड्यांचे ऐश्वर्य (निर्याण शताब्दीनिमित्त)

वरील शीर्षक वाचून असा अपसमज होईल की, मी केरळमधील पद्मनाभम् मंदिराच्या राजांच्या प्राचीन ऐश्वर्याविषयी काही लिहिणार आहे. पण ती संपत्तीसुद्धा ज्यापुढे नगण्य म्हणावी अशा दुसऱ्याच एका राजवाड्याच्या वैभवाविषयी वाचले की आश्चर्याने थक्क व्हायला होईल. आधुनिक रसायनशास्त्राला अवघे ११८ मूलद्रव्ये ज्ञात असून त्यात ९० धातू आहेत. मात्र, हे राजवाडे म्हणजे विश्वनाथ काशिनाथ राजवाडे. त्यांचे धन म्हणजे तुकाराम महाराज म्हणतात तसे 'आम्हा घरी धन शब्दांचिच रत्ने' आणि धातू म्हणजे त्यांनी उत्खनन केलेले मराठी शब्दांचे ३०,००० धातू. राजवाडेंचा जीवनकाळ इसवी सन १८६४ ते १९२६ इतकाच. भाषा, समाजशास्त्र आणि इतिहासाचे ते प्रकांड पंडित होते.

भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थेची त्यांनी स्थापना केली. महाराष्ट्रीय भाषेचे 'निरुक्तसूरी' असे त्यांच्याविषयी गौरवाने बोलले जाते. मराठ्यांच्या इतिहासात बाबासाहेब पुरंदऱ्यांचा अधिकार सर्वजण जाणतात. ते मावळखोऱ्यातील कोणत्याही दगडाचे अंतरंग ज्या आपुलकी व विस्ताराने उलगडत, त्याच पद्धतीने राजवाडे असंख्य मराठी शब्दांची पाळेमुळे, गोत्र प्रवर आणि वंश तपशिलाने सांगत. आपल्या हयातीत त्यांनी ३०,००० धातूंची नोंद लहान-मोठ्या कागदी चिठ्ठ्यांवर करून ठेवली.

दुर्दैवाने त्या नोंदीचे व्यवस्थित संकलन, विभागणी, मांडणी हे काम पूर्ण होण्याआधीच त्यांचे निधन झाले. ते काम पुढे कृ. पां. कुलकर्णी यांनी अतिशय व्यवस्थितपणे आणि चिकाटीने 'राजवाडे मराठी धातुकोश' या नावाने पूर्णत्वास नेले. मोरोपंत म्हणतात तसेच झाले- 'स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी जन्मती.' हा धातुकोश प्रसिद्ध करणे सोपे काम नव्हते. त्या कामाचा आवाका इतका प्रचंड होता की, प्रस्तावनेची मोठ्या आकाराची ५२ पाने त्यासाठी खर्ची पडली. एखाद्या विद्वत्तापूर्ण प्रबंधाइतकेच कुलकर्ण्याच्या त्या संपादनाचे मोल आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीवर प्रकाश टाकण्याचे काम १६ व्या शतकातील भट्टोजी दीक्षित आणि २० व्या शतकात पुण्यातील काशिनाथशास्त्री अभ्यंकरांनी ज्या समर्थतेने केले तसेच कुलकर्णींनी राजवाडेंच्या अपूर्ण व्युत्पत्ती कोशासंबंधात केले.

**वैशिष्ट्ये :** एकलकोंडा स्वभाव, संस्कृत- प्राकृत, मराठी, देशी आणि बोली भाषांचा अभ्यास, शोधक आणि चिंतनशील वृत्ती यामुळे त्यांना धातू शोधण्याचे व्यसनच होते, असे म्हणावे लागेल. ते शब्दांचे रूप सांगण्यापूर्वी तो शब्द भाषेत रूढ होण्याचा काळ, तत्कालीन सामाजिक परिस्थिती आणि व्यवहारांचा भाषेवर पडणारा प्रभाव यांचे भान ठेवत स्वतःच्या मनाशी शब्दांचे गूढ उकलत बसत.

प्रत्येकच शब्दाचे मूळ संस्कृतात असते, असा दुराग्रह त्यांनी धरला नाही. ध्वनिपरिवर्तनामुळे उदा. क-ग, त-द, श-स, ण-न याप्रमाणे शब्द बदलतात, हे गृहीत धरून त्यांनी असंख्य शब्दांची ३०,००० मुळे शोधून काढली. तुलना करावयाची नाही, पण संस्कृत व्याकरणकार पाणिनीच्या कोशात २२०० धातू आहेत, हे लक्षात घ्यावे. धातू म्हणजे काय? अमरकोशाने धातूला शब्दयोनी म्हटले आहे. भाषा वाक्यांपासून, वाक्य शब्दांपासून, शब्द धातूपासून निर्माण होतात. धातू हेच भाषेचे मूळ आहे.



**राजवाड्यांनी वैदिक व संस्कृत वाङ्मय, इतिहास, बखरी, जुन्या कागदपत्रांची बाडे, दानपत्रे, ताम्रपट, शिलालेख, फारसी आणि मराठीतून लिहिलेले ऐतिहासिक दस्तावेज हे सर्व पालथे घातले. शब्दांना सरलार्थ, रुढार्थ, व्यंगार्थ, वाच्यार्थ, लक्षणार्थ अशा अनेक छटा असतात या दृष्टीने ते त्याच्या मुळाचा शोध घेत. काही जण एका वाच्यार्थाला प्रमाण मानून एकच व्युत्पत्ती सांगून इतर वाच्यार्थांना लक्षणार्थ मानून थांबतात. राजवाडे प्रत्येक वाच्यार्थाची स्वतंत्र व्युत्पत्ती देतात. या दृष्टीने ते शब्दकोशकार कमी आणि शब्दांचे इतिहासकार होते. या दृष्टीने विचार केल्यास ते वाच्यार्थाचे निरुक्तसुरी होते.**

धातूचा उगम भाषा अस्तित्वात येण्यापूर्वीच्या आद्य मानवाच्या सहज उद्गार आणि कृतिसूचक एकाक्षरी वर्णात आहे. याच लेखमालेत मी 'लिपी आणि मनवीशरीर संबंध' या नावाचा एक लेख लिहिला होता; त्यात तर याहीपुढे जाऊन मी कोणतीही लिपी आणि चिन्हे निर्माण होण्याकरिता मानवी शरीर, त्याचे मूळ विकार, भावभावना, संवेदना, विचार व्यक्त करताना नैसर्गिकपणे होणाऱ्या शारिरीक हालचाली आणि कृती हे सर्व मुद्दे महत्त्वाचे असून मुळाशी मानवी शरीर, विचार आणि आचार आहेत हाच मुद्दा मांडला होता.

**कृत्रिमतेचा वृथा आरोप :** राजवाडेंनी ३०,००० तर पाणिनीने २२०० ते ८००० धातू सांगितले. राजवाडेच नव्हे तर पाणिनीवरसुद्धा एक आरोप केला जातो की, त्या दोघांनी सांगितलेले बरेचसे धातू वाङ्मयात आढळत नाहीत. त्यावरून ते कृत्रिम किंवा ओढाताण करून निर्मिले असावेत. पण जसजशी संशोधनाची व्याप्ती वाढू लागली तसतसे प्रचलित भाषेतून लुप्त झालेल्या शेकडो क्रियावाचक संज्ञा, त्यामागच्या प्रथा यामुळे अविश्वासाचे हे सावट दूर होऊ लागले. राजवाड्यांनी वैदिक व संस्कृत वाङ्मय, इतिहास, बखरी, जुन्या कागदपत्रांची बाडे, दानपत्रे, ताम्रपट, शिलालेख, फारसी आणि मराठीतून लिहिलेले ऐतिहासिक दस्तावेज हे सर्व पालथे घातले. शब्दांना सरलार्थ, रुढार्थ, व्यंगार्थ, वाच्यार्थ, लक्षणार्थ अशा अनेक छटा असतात या दृष्टीने ते त्याच्या मुळाचा शोध घेत. काही जण एका वाच्यार्थाला प्रमाण मानून एकच व्युत्पत्ती सांगून इतर वाच्यार्थांना लक्षणार्थ मानून थांबतात.

राजवाडे प्रत्येक वाच्यार्थाची स्वतंत्र व्युत्पत्ती देतात. या दृष्टीने ते शब्दकोशकार कमी आणि शब्दांचे इतिहासकार होते. या दृष्टीने विचार केल्यास ते वाच्यार्थाचे निरुक्तसुरी होते. अनेकदा मूळ उदात्त अर्थाचे स्खलन होते. मराठीतील अतिशय अश्लीलअर्वाच्य ग्राम्य शिव्यांमागे वेदांतील काही उदात्त कल्पना, रुढी, प्रतीके, तंत्रपूजा आहेत हे राजवाडेंचा कोश वाचताना झालेला ज्ञानानंद माझा मलाच माहित. उदा. मराठीतील 'घोडा लावणे' या वाक्प्रयोगामागे यज्ञीय अश्व म्हणजे सूर्य किंवा पराक्रमी सम्राट हे लक्षात घेऊन अश्वमेधाचा घोडा हा पुरुषार्थ आणि सम्राज्ञी म्हणजे जिंकलेली पृथ्वी आहेत. अश्व आणि सम्राज्ञी यांच्यातील महावस्त्राखालच्या सांकेतिक विधी ते निर्देशित करतात. मैथुन म्हणजे सृष्टीचा यज्ञ, लैंगिक अवयव म्हणजे शक्ती, सृजन आणि धारणांची प्रतीके हा मूळ अर्थ हरवून मध्ययुगीन अशिक्षित समाजात वरवरचाच क्रियार्थ रुढ झाला. नैतिकतेने त्यांना अश्लील ठरवून अर्थांचा अध:पात केला. याचप्रमाणे भगिनी आणि मातृशक्तीतून व्यक्त होणारा उदात्त अर्थ हरवून हेटाळणीवाचक अनेक शिव्या निर्माण झाल्या. घोडा लावणे या शब्दांचा आजचा अर्थ दुसऱ्याला फसवून आपल्या म्हणण्याप्रमाणे करण्यास भाग पाडणे हा आहे. वेद, नक्षत्रकथा, पुराणेलोकसाहित्य यातून नवीन शब्दांची निर्मिती कशी हे अभ्यासत त्यांच्या व्युत्पत्ती राजवाडेंनी आपल्या कोशातून सयुक्तिकरीत्या मांडल्या.

**धातू शोधातील आयाम :** नुकतीच मराठी ही अभिजात भाषा असल्याचे मान्य झाले. राजवाडेंनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठ्यांतून पुढीलप्रमाणे जे २७ आयाम सांगितले त्यावरून तिचे अभिजातपण सिद्ध होते. मराठी अर्थ, संस्कृत मूळ, वैदिक वर्गपद, पाणिनीय वर्गपद, संस्कृत धातू, अभ्यास, आगम, आदेश, रूप, कर्तरी, कर्मणी व भावेचे जुने व नवे लट्, कर्तरी व कर्मणी लिंग, कर्तरी व कर्मणीचे कृदन्त, भविष्य- लोट- लिंग- लृंग, प्रयोजक, निष्ठा आणि विशेष. प्रत्येकच धातू या चाळणीतून निघतो असे नाही. याशिवाय काही धातूंच्या मागे इ, इर, उ, ऊ, ऋ अशा वर्णांचे अनुबंध, आडव्या उभ्या रेघांनी दाखविलेले अनुदात्त आणि स्वरितत्व दाखविले आहेत. काही लकार चिन्हे, संस्कृत धातूंप्रमाणे मराठीतील १० विकरण चिन्हे आणि नामधातुचा एक अशा ११ गणांचा वापर केला आहे. पाणिनीनेही असेच केले. अनुबंध म्हणजे क्रियावाचक साधी अक्षरे. गती ही एकच क्रिया घेतली तरी तिचे शारिरीक, मानसिक, आध्यात्मिक, वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, व्यंगार्थ असे अनेक प्रकार होतात. त्यांच्या वाङ्मयीन उपयोगावरून ३०० धातू तयार झाले. श्रवण, उच्चारण या दोन क्रियांमधून शब्द म्हणजे आवाजाचे व्यक्त, अव्यक्त, कुत्सित, घोर, मंत्र अशा अनेक भावांचे सूचक अनेक अर्थ आणि पुन्हा एकाच अर्थाच्या भिन्न छटा आढळतात. एकच अर्थ पण भिन्न छटा म्हणजे आपण सुरुवातीला रसायनशास्त्रातील उदाहरण दिले त्याप्रमाणे एकाच मूलद्रव्याचे अनेक आयसोटोप. राजवाडेंनी आपली सर्व टिपणे व्यवस्थितरीत्या तयार करून ठेवली होती. त्यावरून स्वतःच धातुकोश तयार करण्यास सुरुवात करणार तो त्यांचे निधन झाले. या सोबतच नामव्युत्पत्ती कोशाचेही त्यांनी काम करून ठेवले.

'संस्कृत भाषेचा उलगडा' हा प्रबंधही त्यांनी लिहिला. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य भाषांतील धातूंची तुलना या विषयावरील ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा संकल्प पूर्ण झाला नसला तरी त्यातील विचारधारा त्यांच्या प्रस्तुत कोशात अनेकदा प्रकटते. देश, प्रदेश, संस्कृतीचा प्रभाव भाषा, तिच्या शब्द, व्याकरण इत्यादींवर पडल्याशिवाय राहत नाही. भाषेचा अभ्यास करताना त्या संस्कृतीचा, त्या काळाचा, जीवनपद्धतीचा इतिहास आढळतो. ते स्वतःच म्हणत की, मी बुद्धिप्रामाण्यवादी असून इतिहासकार आहे. मराठी धातूंच्या शोधात ते वेदच नव्हे तर वेदपूर्वकालीन भाषेच्या उत्तरसीमेपर्यंत पोचले. हे काम करण्याच्या निमित्ताने भाषा, वाङ्मय, अध्यात्म, शास्त्रे आणि कला सर्वच क्षेत्रात कार्यकारणभावाने ते संगती लावीत. ज्ञानेश्वरीतील सर्व शब्दांचा व त्यांच्या धातूंचा स्वतंत्र कोश तयार करण्याचेही त्यांनी सूतोवाच आणि पद्धतही तयार करून ठेवली होती. त्यांच्या महान कार्याचा परिचय मर्यादित जागेत घेणे कठीण आहे. त्यांच्या निर्याण शताब्दीनिमित्ताने मी फक्त या विषयाला वाचा फोडली इतकेच.

## गाऊ मंगल गाणी

व्याघ्रासम हा भारत माझा
त्याची गाऊ गाणी ।
प्राणाचीही ज्योत पेटवू
गाऊ मंगल गाणी ।।
उंच हिमालय साक्षी आहे
गंगा-गोदा वाहे अमृतवाणी
गांधीजींची सोबत सारी आहे
गीते धला भारत माझा,
गाऊ यांची गाणी प्राणाचीही...१
हिंदू मुस्लिम भेद न आम्हा,
धर्म आमचा मानवता
जात धर्म ना पंथ आम्हाला,
भारत अमुची माता
मंदिर मस्जिद गीत सुखाचे,
सदैव गाती वाणी प्राणाचीही...२
गांधी, सुभाष, भगतसिंग
ही स्वातंत्र्याची गाथा
शिवरायांच्या आपण सारे
चरणी ठेऊन माथा
सावरकर, वल्लभभाई,
ध्वजाच रोवून गगनी
प्राणाचीही...३
चंद्र चांदणे, रान पाखरे,
देश असा हा सुंदर
पानोपानी या वृक्षाला
आज सुखाचा मोहर
शांती सुखाने श्रीरामाची घेऊ
पताका मनो नी प्राणाचीही...४

**विष्णू सोळंके**

## कर्तव्यपूर्ती

खरे मिळते सुख, मात्र भारत मातेच्या सेवेत । हरक्षण ऊर्मी ही, कर्तव्यपूर्ती करूया रक्षेत ।।धृ।। किती वादळ वारें, येऊ देत । भारी संकटें सोसू जीवनात ।। ठाको यम ही उभा समोरात । कर्तव्यपूर्ती करूया रक्षेत ।।१।। हिमनग गर्जती सागरात । हीमवर्षा प्रचंड पर्वतात ।। कांटे पूर्ण निबिड जंगलात । कर्तव्यपूर्ती करूया रक्षेत ।।२।। कैक आपदांच्या मार्गे चालत । दूरपर्यंत जाऊया घन तमात ।। मन कधी न होवो विचलित । कर्तव्यपूर्ती करूया रक्षेत ।।३।। इच्छा एकच आयुष्यात । सुख आनंद हा समर्पणात ।। माते तुझ्याच पावन कुशीत ।

कर्तव्यपूर्ती करूया रक्षेत ।।४।।

**रेखा भिवगडे**

# ग्रहसंकेत

**(रविवार, २५ जानेवारी ते शनिवार, ३१ जानेवारी २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २५ जानेवारी-** भानू सप्तमी, रथाधिपती सूर्याचे पूजन, मन्वादि, महर्षी नवल जयंती जळगाव, श्री दत्त नवरात्रारंभ, श्री अंबाबाई यात्रा सांगोला, श्री सिद्धेश्वर यात्रा घोसरवाड, नर्मदा जयंती, दुपारी १:१५ पर्यंत पंचक, कृष्णावेणी उत्सवारंभ नृसिंहवाडी, देव आदिनारायण उत्सव परुळे, रथसप्तमी, पर्यटन दिन, जागतिक सूर्यनमस्कार दिन, राष्ट्रीय मतदार दिन ✻ **सोमवार, २६ जानेवारी-** प्रजासत्ताक दिन, श्री वीरभद्र जत्रा हुमणाबाद, मोहिनीराज सप्तदिन उत्सव प्रारंभ नेवासा खुर्द (जि.नगर), दुर्गाष्टमी, भीष्माष्टमी, भीष्मतर्पणाने पापनाश, संगोळी रायण्णा पुण्यदिन, ब्रम्हनाथ यात्रा रांगोळी, देव मानसीश्वर जत्रा वेंगुर्ला, आर्या दुर्गा वार्षिक उत्सव वागदे ✻ **मंगळवार, २७ जानेवारी-** मध्वनवमी, दासबोध जयंती, शिवधरधळ, दत्त उत्सव माधवनगर सांगली, यल्लमा यात्रा आरग (ता. मिरज), नव दुर्गोत्सव रेडी (ता.वेंगुर्ला) ✻ **बुधवार, २८ जानेवारी-** भक्त पुंडलिक उत्सव पंढरपूर, शंकरलिग रथोत्सव संकेश्वर, श्री संतुबाईदेवी यात्रा कागवाड ना. अथणी (जि. बेळगाव), गंगा गोदावरी जन्मोत्सव, लाला लजपतराय जयंती, हनुमान जत्रा मळे (पणजी) ✻ **गुरुवार, २९ जानेवारी-** जया एकादशी, भीष्मद्वादशी, एकादशी- द्वादशी श्राद्ध, माघी वारी यात्रा पंढरपूर, मौनी महाराज पुण्यतिथी पाटगाव, कृष्णामाई उत्सव पाचवड (ता. वाई), लक्ष्मीनारायण उत्सव खटाव, संत हरिबाबा पुण्यतिथी फलटण, श्री अंबाबाई किरणोत्सव सायंकाळी प्रारंभ कोल्हापूर, वेणीराम रथोत्सव मिरज ✻ **शुक्रवार, ३० जानेवारी-** महात्मा गांधी पुण्यदिन, श्री ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज जयंती, भगवानगिरी महाराज भंडारा करंजवडे (ता. वाळवा), हुतात्मा दिन, प्रदोष, शुक्र पश्चिमदर्शन ✻ **शनिवार, ३१ जानेवारी-** विश्वकर्मा जयंती, अवतार मेहेरबाबा अमरतिथी, राऊळ महाराज पुण्यदिन पिंगुळी ता. कुडाळ, श्री महासिद्ध यात्रा भांडरकवठे

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २५, २८ ✻ **डोहाळ जेवण-** २५ (१४ नंतर), २९ (१४ नंतर) ✻ **बारसे-** २५, २८ (१७ पर्यंत), २९ (१४ नंतर) ✻ **जावळ-** २५, २६ (१० नंतर) ✻ **गृहप्रवेश-** २५, २६ (१० नंतर), २८ (९ नंतर)

### मेष :- सुसंधीचा लाभ उठवावा

कमजोर कोणीच नसतो, हा वेळेचा महिमा आहे. सर्वांची केव्हा तरी वेळ येतेच. गुरुवारी कर्मस्थानी होणारी बुध-शुक्राची युती आपणास कार्यक्षेत्रात सुसंधी देणारी ठरेल. आपणास चांगली वेळ आली आहे असे समजा व वेळेचा सुसंधीचा लाभ उठवावा. आपली रास हातपाय गाळून गप्प बसणारी नाही. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २५, २६

### वृषभः- विरोधक गप्प होतील

पैशाच्या श्रीमंती पेक्षा मनाची हीच खरी श्रीमंती आहे भाग्यात होणारी बुध शुक्राची युती भाग्योदयकारक घटना घडविणारी आहे आपल्या कलागुणांचा क्षमतेचा आत्ताच प्रत्यय आणून घ्या विरोधक गप्प होतील आर्थिक जनता करू नका परिश्रमातून प्रगती होत जाईल चांगले फळ मिळेल. शुभ ता. २६, २९

### मिथुनः- केल्याने होतिची आहे

सर्वश्रेष्ठ गुरु परमेश्वर आहे, करता करविता तोच आहे. जीवनाची वाटचाल करताना केल्याने होतिची आहे, आधी केलेचि पाहिजे, हे संत वचन नेहमी ध्यानात ठेवावे. अष्टमातील बुध- शुक्राची युती अचानक धनप्राप्ती मिळवून देणारी आहे. परमेश्वरावर सतत श्रद्धा ठेवा. चांगल्या कर्माने वाटचाल करावी, ध्येय साध्य करू शकाल. शुभ ता. २५, २६

### कर्कः- उडदा माजी काळे- गोरे

नका विसरू ऋण आईचे, स्वरूप माऊली पुण्याईचे. थोर पुरुष तू ठरून तियेचा होई उतराई... सप्तमात होणारी बुध- शुक्राची युती सुख स्वास्थ्य मिळवून देणारी आहे. माझेच खरे असे म्हणत राहू नका. वाऱ्याची दिशा समजून रहावे. अनुभवातूनच शहाणे होता येते. गुढ विद्येत प्रगती होईल. चांगले लोक भेटतील. शुभ ता. २६, २८

### सिंहः- मनासारखे घडत जाईल

कोणाच्या प्रभावात जगू नका आणि कोणाच्या अभावातही जगू नका. षष्ठातील शुभाशुभ ग्रह चांगलेच आहेत. कार्यक्षेत्रात चांगलीच फळे मिळणार आहेत. विचाराने रहावे. सर्व काही मनासारखे घडत जाईल. आर्थिक गोष्टींची चिंता करू नये. वेळीच मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. अनुकूलता वाढत जाईल. बिनधास्त रहावे. शुभ ता. २६, २८

### कन्याः- अपेक्षित प्रगती घडेल

हे जीवन आपले स्वतःचे आहे. त्यामुळे आपल्या स्वभावाप्रमाणे जगावे. राशी स्वामी बुधाची पंचमात शुक्राची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक स्थितीत मनासारखी शुभ फळे मिळतील. प्रशासन, वैद्यकीय क्षेत्रात अपेक्षित प्रगती घडेल. नव्या विचारांना चालना देता येईल. सुसंधीचा लाभ उठवावा. चिंता नको. शुभ ता. २५, २६

### तुलाः- अडचणी सुटत जातील

प्रेम बालपणी फुकट मिळतं. तरुणपणी कमवावे लागते. म्हातारपणी ते मागावं लागतं. सुखस्थ शुभाशुभ ग्रहांमुळे एक डोळ्यात हसू तर दुसर्या डोळ्यात अश्रू संभवतात. जीवनात सर्व काही आपल्या मनासारखेच घडेल. याची शक्यता व शाश्वती नसते. नव्या कामाला गती मिळेल. अडचणी सुटत जातील. चिंता नको. शुभ ता. २५,२६

### वृश्चिकः- उत्साहाने रहावे

वेळ प्रत्येकाची येते, वेळ आली की हिशोब चुकता करून घ्यावा. तृत्तीयात होणारी बुध- शुक्राची युती सुसंधी मिळवून देणारी आहे. शारीरिक समस्या वाटत असल्या तरी सर्व प्रतिकूलतेवर आपण मात करणार आहात. उत्साहाने रहावे. यश प्राप्त होत जाईल. नव्या कामाला गती मिळेल. चिंता करू नका. शुभ ता. २६, २८

### धनुः- सौख्याच्या घटना

गर्दीचा भाग होऊ नका. स्वतःचे वेगळेपण सिद्ध करून घ्यावे. धनस्थ बुध- शुक्रामुळे आर्थिक अडचणीतून मार्ग निघत जाईल. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच चांगली होत जाईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. प्रतिकूलतेवर विजय मिळवू शकाल. शुभ ता. २५, २६, २९

### मकरः- अपेक्षित ते-ते घडेल

सत्य विवस्त्र आहे म्हणून कोणीही सत्याला स्वीकारायला तयार नसते. राशीतच बुध- शुक्राची युती होत आहे. त्यामुळे आनंदी घटना घडतील. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. घाईने निर्णय घेऊ नका. योजलेली कामे मनासारखी होतील. अपेक्षित ते- ते घडत जाणार आहे. चिंता नको. शुभ ता. २५, २६

### कुंभः- द्विधा मनस्थिती

खोटं सत्तेचे कपडे घालून सत्याच्या रूपात फिरत असतो आणि लोक खोटयाला सत्य समजतात. व्ययस्थानी शुभाशुभ ग्रह आहेत. त्यामुळे थोडी द्विधा मनस्थिती राहणार आहे. शनि मंगळाच्या पापकर्मरीस सध्या आपली रास असल्याने फार मोठे धाडस करू नका. आर्थिक समस्यांशी सामना करावा लागेल. विनाकारण धावपळही करू नका. शुभ ता. २५,२६

### मीनः- दुसऱ्यांवर अवलंबून राहु नका

ज्यांच्याजवळ स्वच्छ मन, निस्वार्थी धन असते, त्यांना प्रसिद्ध होण्यासाठी पद, पैसा प्रतिष्ठेची गरज भासत नाही. लाभस्थानी बुध- शुक्राची युती होत आहे. शिवाय लाभातच रवि-मंगळ ही आहेत. चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी ठरेल. नवे सांगाती अडचणीतून आपणास सोडवतील. शुभ ता. २५, २६, २९

!! शुभ भवतु !!

---

दुर्ग जिज्ञासा

# वारुगड

प्राची पालकर




महाराष्ट्रातील सातारा जिल्हा, अप्रतिम निसर्ग सौंदर्याने नटलेला, ऐतिहासिक महत्त्व असलेला आणि समृद्ध संस्कृतीने परिपूर्ण असा परिसर आहे. या परिसरातील वारुगड हा गिरिदुर्ग सुमारे ३००० फूट उंचीचा असून सातारा जिल्ह्यातील फलटणजवळ वसला आहे. माणगंगा आणि बाणगंगा नदी जिथे उगम पावते, त्या सीताबाईच्या डोंगरात हा किल्ला आहे. वारुगडावर जायचे असल्यास प्रथम फलटण गाठावे. तेथून गडावर जाण्यास अनेक मार्ग आहेत. फलटण ते गिरवी एसटी सेवा आहे. तेथून पाच कि. मी. अंतरावर जाधववाडा हे वारुगडाच्या पायथ्याचे गाव आहे. गावातून वारुगडाच्या माचीवर जाण्यास अंदाजे दोन तास लागतात. वारुगड माची आणि बालेकिल्ला अशा दोन भागात विभागला गेला आहे. गडाच्या माचीवर घोडेवाडी नावाची वस्ती आहे. माचीवरून बालेकिल्ल्यात जायला साधारण अर्धा तास लागतो. जाधववाडा मार्गाने वारुगडावर जाता येते तसेच घोडेवाडीतूनदेखील गडावर जायला रस्ता आहे. या मार्गाने जायचे असल्यास फलटण-दहिवडी रस्त्यावरील मोंगळ फाटा गाठावा. या फाट्यावरून एक रस्ता गडाच्या माचीवरील घोडेवाडीत घेऊन जातो. मोंगळ ते घोडेवाडी हे साधारण १५ कि. मी. चे अंतर आहे. फलटण-दहिवडी रस्त्यावर बीजवाडी नावाचे गाव आहे. या गावातूनही गडाच्या माचीवरील वस्तीत म्हणजे घोडेवाडीत जाता येतं. गड चढायला सोपा असून स्वतःचे वाहन थेट घोडेवाडीत गेल्यावर वेळ आणि श्रम दोन्हीही वाचतात. वारुगडाच्या माचीवर गेल्यावर गडाचा अफाट विस्तार दिसतो. किल्ल्याची माची संपूर्ण तटबंदीने वेढलेली आहे. अजूनही बांधकाम बरेच चांगल्या परिस्थितीत आहे.

पूर्वी माचीत प्रवेशासाठी पाच दरवाजे होते, पण आता जाधववाडी मार्गाने येणारा एक दरवाजा आणि घोडेवाडी मार्गाने येणारा एक दरवाजा असे दोन दरवाजे शाबूत आहेत. माचीवर वाड्यांचे अवशेष दृष्टीस पडतात. त्यावरून गडावरचा त्याकाळी असलेला राबताही लक्षात येतो. माचीवर पाण्याच्या सोयीसाठी तलाव आणि टाकी बांधलेली आहेत. भैरोबाचे जीर्णोद्धार केलेले मंदिर माचीवर असून तेथे दर्शन घेऊन विश्रांती घेता येते. मंदिर प्रशस्त आहे त्यामुळे अडचणीच्या वेळी येथील धर्मशाळेत राहण्याची सोय होऊ शकते. संपूर्ण माचीला फेरफटका मारण्यास दोन तास लागतात इतका माचीचा घेरा आहे. माचीवरून पुढे १५ मिनिटे चढत आपला बालेकिल्ल्यात प्रवेश होतो. बालेकिल्ल्याच्या दरवाजा आणि तटबंदी बुलंद आहे. आत प्रवेश करताच समोर सदरेची इमारत आहे. येथेही पाण्याचे टाके आणि विहीर आहे. बालेकिल्ल्यातून समोरचा परिसर पाहिला की लक्षात येते की, हा किल्ला अगदी मोक्याच्या ठिकाणी वसलेला आहे. समोर सीताबाईचा डोंगर तसेच महादेव डोंगररांग दिसते. वारुगडाच्या माथ्यावर भन्नाट वाऱ्याचे सुख अनुभवता येते. येथील वाऱ्याचा उपयोग करून घेण्यासाठी या परिसरात अनेक पवनचक्क्या उभारल्या आहेत. वातावरण ढगाळ नसेल तर येथून पुरंदर आणि वज्रगड दृष्टीस पडतात. शिवाजी महाराजांनी या किल्ल्याचे मोक्याचे स्थान ओळखले आणि किल्ला बांधून घेतला. विजापूरहून होणाऱ्या हल्ल्यांना पायबंद घालण्यासाठी हा किल्ला महत्त्वाचा होता. या किल्ल्याचे किल्लेदार परभू होते. सह्याद्रीच्या पर्वतरांगेतील प्रत्येक जागेचा महाराजांना नीट अभ्यास होता. त्यांनी अत्यंत बारकाईने विचार करून स्वराज्यातील गडकोट मजबूत बांधून घेतले. स्वराज्य स्थापनेच्या काळात तसेच स्वराज्य राखताना याच किल्ल्यांचा उपयोग शत्रूला नामोहरण करण्यासाठी झाला. या दुर्गांची खंबीर साथ होती म्हणून महाराष्ट्रात इतकी मोठी स्वराज्य क्रांती घडून आली. छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातदेखील वारुगड स्वराज्यात होता; मात्र पुढे औरंगजेबाने हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. पेशवाईच्यानंतर इतर किल्ल्याप्रमाणे हाही किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला. वारुगडाला भेट देताना तुमच्याकडे अधिकचा दिवस असेल तर भैरोबाच्या मंदिराच्या बाहेरील धर्मशाळेत मुक्काम करता येतो. मात्र, मुक्काम करायचा असल्यास अमावास्या टाळून कार्यक्रम आखावा. कारण अमावास्येच्या दिवशी संपूर्ण पंचक्रोशीतील लोक मंदिरात येतात. त्या दिवशी मंदिरात भंडारा असतो आणि रात्रभर भजन चालते, त्यामुळे त्या दिवशी धर्मशाळेत जागा नसते. मुक्काम केल्यास दुसऱ्या दिवशी जवळच असलेल्या शिखर शिंगणापूरचे मंदिरात जाता येईल. मंदिराचे भव्य प्रवेशद्वार, या परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांनी बांधलेला तलाव, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांचे समाधी मंदिर नक्की पाहून घ्यावे. वारुगडापासून साधारण २५ किलोमीटर अंतरावर असलेला महिमानगड हा किल्लादेखील पाहता येतो. सीताबाईच्या डोंगरावरील सीतेच्या मंदिरात दर्शनास जाता येईल. फलटण आणि माण तालुक्याच्या सीमेवर असलेल्या सीताबाईच्या डोंगरावर सीतेच्या मंदिरात मकरसंक्रांतीचा सण उत्साहात साजरा करतात. या मंदिरात मोठ्या प्रमाणात महिला संक्रांतीच्या दिवशी सीतामाईला सौभाग्याचे वाण देण्यासाठी येतात. येथील लोकांची अशी मान्यता आहे की, गर्भारपणात सीतेचे या डोंगरावर वास्तव्य होते. त्यावेळी सीतेची तहान क्षमवण्यासाठी लक्ष्मणाने डोंगरावर बाण मारून पाणी काढले, तेव्हाच बाणगंगा आणि माणगंगा नद्यांचा उगम झाला. माणगंगा नदी माण तालुक्यातून तर बाणगंगा नदी फलटण तालुक्यातून वाहते. येथे चैत्र वद्य सप्तमीला लव-कुश जन्मोत्सव साजरा करतात तसेच ज्येष्ठ आणि आषाढ अमावास्या, नारळी पौर्णिमा, मकरसंक्रांत या दिवशीही उत्सव साजरा करतात. येथे मार्गशीर्ष वद्य द्वितीयेला सत्पुरुष बालब्रह्मचारी महाराज सारंगदास गुरू हरिनामदास महाराज यांची पुण्यतिथी साजरी केली जाते.

सत्यनारायण पूजा आणि अन्नदान परंपरा अखंडित चालावी यासाठी १२ गाव मिळून १२ महिन्यांच्या पूजा ठरवून घेतल्या जातात. ग्रामीण भागातील लोकांनी या परंपरा पूर्वापार जपल्या त्यामुळे येथील वातावरणात अनामिक शांतता आणि प्रसन्नता जाणवते. ट्रेकिंगची आवड असेल तर एका गडावरून दुसऱ्या गडावर जाणे किंवा सलग काही दिवस आसपासच्या परिसराची भटकंती करणे असे कार्यक्रम आखले जातात. संतोषगड ते वारुगड या मार्गावर ट्रेकिंग अनेक लोक करतात. सह्याद्रीतील या वाटा चालणे हे ट्रेकर्सचे आवडते काम आहे. संतोषगड ते वारुगड ही वाट सीताबाईच्या डोंगरातून येते. ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांना ही वाट नक्कीच आवडेल. मात्र, या डोंगररांगात फिरताना स्थानिक वाटाड्या जरूर सोबतीला असावा. गडावर खाण्याची काहीही सोय नसून ती आपली आपणच करावी. गडावर बारमाही पाण्याची टाकी आहेत, पण पुरेसे पिण्याचे पाणी सोबत असल्यास सोयीचे होते. गडकिल्ले फिरताना सोबत असलेल्या पाण्याचा नियोजनपूर्वक वापर अत्यंत आवश्यक आहे. ट्रेकिंग करताना सोबत असलेले पाणी कधीच पूर्ण संपवू नये. निवासाच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत पाणी पुरवावे, असा नियम आहे. ट्रेकिंगचे काही लिखित आणि काही अलिखित नियम आहेत. आपल्याला सुरक्षित तसेच सुखकारक भटकंती करायची असल्यास नियम अवश्य पाळावे. वारुगड किल्ला शिवकालीन इतिहासाचा साक्षीदार आहेच आणि या परिसराला निसर्गाचे वरदान लाभले आहे. भटकंतीची आवड असल्यास सातारा- फलटण परिसरातील वारुगडावर नक्की जाऊन या तसेच जास्तीचा वेळ असल्यास आसपासच्या निसर्गरम्य परिसराच्या भटकंतीचाही आनंद घेता येईल.

---

पान ५ वरून

# जैसे लोह परिसें पालटला तो लोखंड...

स्वातंत्र्यवीर सावरकरांना कुठे नाव मिळाली होती? तरणी म्हणजे सूर्य. सूर्याच्या घरी कधी दिवा लागतो का? तो स्वतःच तेजोनिधी आहे. आपल्या वाट्याला आलेले कर्म निर्हेतुकपणे आणि अपेक्षा न बाळगता करणे हेच जर, सर्व वेदान्तशास्त्रांचे सार असेल तर, अजाणतेपणे असे करणाऱ्याने वेद वाचले काय आणि न वाचले काय सारखेच! ज्याला स्वतःची ओळख पटली त्याला देव मिळाला काय आणि न मिळाला काय! कारण खरी देवभेट ही स्वतःला जाणून घेण्यातच असते. समर्थ म्हणतात... '**मनीं निर्मिला देव तो ओळखावा। जया पाहता मोक्ष तात्काळ जीवा।। तया निर्गुणालागि गुणी करावे। जनीं संग सोडूनि सुखी राहावे।।**' भास्करने स्वतःला ओळखले. आपल्या इतिकर्तव्यतेची त्याला जाणीव झाली. सर्वसंग सोडून त्याने आयुष्यभर श्रीमहाराजांनी सेवा केली. त्यांच्या संगतीत भास्करच्या जीवनाचे सोने झाले. हा असतो संतांच्या सहवासाचा आणि कृपेचा प्रभाव! दयाशील असणे आणि अखंड सावधान असणे हा संतसज्जनांचा स्थायीभाव असतो. तीच त्यांची योगसाधना असते. अहंकाराचा लवलेशसुद्धा त्यांच्या मनात नसतो. अशी वीतरागी माणसे आसक्तीच्या पलीकडे गेलेली असतात. संत श्री गजानन महाराज याच कोटीतील होते. विशुद्ध मनाने परमेश्वराला जवळ करणाऱ्या भक्तांचेही स्थान वेगळे असते. संतांची चरित्रे हेच सांगतात. '**जो राम रुपी मिळाला। तो परतोनि नाही आला। जैसे लोह परिसें पालटला। तो लोखंड न होय।।**' समर्थ असेच सांगतात. संतांच्या चरित्रातून हेच दिसते. परोपकाराची देह-मन-बुद्धी झिजविणे हाच धडा संतांनी स्वकर्तृत्वाने घालून दिला आहे. वऱ्हाडच्या काळ्याकरंद भूमीत उगवलेले श्री गजानन महाराज हे भक्तीचे ब्रह्मकमळ आहे. संत दासगणू महाराजांच्या 'श्रीगजानन विजया'तून या कमळाचा सुगंध आकाश भेदून गेला. त्यातील ही भास्कराची कथा म्हणजे जीवन जगण्याचा वस्तुपाठ आहे. अध्याय संपला. श्रीमहाराजांचे रूप डोळ्यासमोर अंधुकसे आले. कारण डोळे अश्रूंनी डबडबलेले होते.

---

पान ४ वरून

# औंध संस्थांनचे अधिपती श्रीमंत भवानरावांचे...

नजर स्थिर करण्यासाठी समोर सूर्य प्रतिमा किंवा एखादे सूर्याचे चित्र ठेवावे असेही ते सांगतात. मोठ्याने सूर्यनमस्काराचा मंत्र (ॐ मित्राय नमः) म्हणून तोंड मिटून कुंभक करावे.

**२.हस्तपादासन /जानुभालासन :-** कुंभक करून गुडघे न वाकवता कमरेत वाकून हाताचे तळवे आसनाच्या कडांना जमिनीवर पूर्णपणे टिकवावेत. गुडघे न वाकवता कपाळ गुडघ्यांना टेकवण्याचा प्रयत्न करावा आणि 'मला आरोग्य कार्यक्षमता व दीर्घायुष्य निश्चयाने प्राप्त होत आहे' असे मनोभावे मनात आणून पूर्ण रेचक करावे.

३. **एक पादप्रसारणासन आणि द्विपाद प्रसरनासन (अर्ध भुजंगासन):-** पूर्ण पूरक करून एक पाय मागे घ्यावा, मागे घेतलेल्या पायाचा गुडघा व बोटे जमिनीवर टेकवावे तसेच दुसऱ्या पायाचा गुडघा दोन्ही हाताच्यामध्ये उभ्या रेषेत ठेवून डोके जितके मागे जाईल तितके मागे नेऊन वर बघावे आणि कुंभक करावे.

**४. पर्वतासन/ मधुरासन/ हस्तपादासन/ चतुरंग दंडासन :-** या आसनात येण्यासाठी कुंभक ठेवून दुसरा पाय मागे घ्यावा व दोन्ही पाय गुडघ्यात ताठ ठेवून पायाचे चवडे व हाताच्या तळव्यावर संपूर्ण शरीर तोलावे.

**५. अष्टांग पनिपातासन/ अष्टांगासन :-** कुंभक ठेवून तळहात व पायाची बोटे न हलवता हात कोपरात दुमडून गुडघे जमिनीस टेकवावेत, नाक जमिनीस न टिकवता मस्तक व छाती जमिनीस टेकवावेत, जमेल तेवढे पोट आत ओढून पृष्ठभाग वर उचलून पूर्ण रेचक करावे. या आसनात दोन पावले +दोन गुडघे +दोन हात मिळून सहा अंगे आणि छाती व कपाळ मिळून अशी आठ अंगे जमिनीला टेकतात म्हणून या आसनास अष्टांगासन असे म्हणतात.

**६. सर्पसन/भुजंगासनः-** पाचव्या आसनाप्रमाणे पायांची बोटे, गुडघे व तळहात तसेच जमिनीला टेकलेल्या अवस्थेत ठेवून सावकाश पूरक करत पाठीला बाक देऊन छाती व मान वर उचलून कुंभक करत छताकडे अगर आढ्याकडे पाहावे. या आसनात पाठीचा कणा अर्धवर्तुळाकार होतो आणि शरीराचा आकार भुजंगाने फणा काढल्याप्रमाणे दिसतो म्हणून या आसनाला भुजंगासन असे म्हणतात.

**७. जानू शिरशासन/पर्वतासनः-** कुंभक करून आसन क्रमांक ४ मध्ये दाखविल्याप्रमाणे हात व पाय ताणून दंड न वाकवता टाचा जमिनीला टेकलेल्या अवस्थेत हळूहळू श्वास सोडत म्हणजेच रेचक करत पर्वताप्रमाणे शरीराचा आकार करावा.

**८. एक पादप्रसरनासन/ अर्धभुजंगासनः-** श्वास रोखून धरत (कुंभक ठेवून ) आसन क्रमांक ३ प्रमाणे शरीराची स्थिती करावी.

**९. हस्तपादासन/ जानूभालासनः-** श्वास सोडत आसन क्रमांक २ प्रमाणे शरीराची स्थिती करून रेचक करावे.

**१०. नमस्कारासनः-** पूरक करून (श्वास घेत) पुन्हा शरीर हळूहळू नमस्कार स्थितीत आणावे.

असा हा १० आसनांचा संच म्हणजे एक सूर्यनमस्कार होतो. अशा प्रकारे एक सूर्यनमस्कार पूर्ण झाल्यानंतर दुसरा मंत्र म्हणून (ॐ रवायनमः) दुसरा सूर्यनमस्कार घालावा. याप्रमाणे मंत्रोच्चारासहित २५ सूर्यनमस्कार घातले तर एक आवर्तन पूर्ण होत असल्याचे भवानीराव सांगतात. असे मंत्र चारसहित दररोज किमान १२ किंवा कमाल १०८ सूर्यनमस्कार आपण आपल्या क्षमतेनुसार करावेत. आपण सूर्यनमस्कार घातले तर नक्कीच आदर्श स्थितीमध्ये पोहोचून दररोज किमान १०८ सूर्यनमस्कार किंवा आपल्या क्षमतेनुसार १०८ पेक्षाही जास्त सूर्यनमस्कार आपण करू शकतो. मात्र, त्यासाठी सराव करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**नियम व प्रमाणः-** सूर्यनमस्काराचा अभ्यास करताना १०८ ही सूर्यनमस्काराची संख्या कशी गाठायची किंवा ते वाढविण्याचे प्रमाण कसे असावे यासाठी भवानीरावांनी काही नियम व प्रमाण सांगितले आहे. साधकांनी सूर्यनमस्कार घालायला सुरुवात केल्यानंतर वयोमान आणि शारीरिक ताण सहन करण्याच्या क्षमतेनुसार ती संख्या निश्चित होते. सात ते दहा वयोगटाच्या साधकांनी सूर्यनमस्काराला सुरुवात केल्यानंतर चार दिवसांनी एक सूर्यनमस्कार वाढवून या वयोगटाणे जास्तीत जास्त नियमित सरावाने २५ सूर्यनमस्कार करावेत. ११ ते १४ वयोगटाने चार दिवसांनी दोनची वाढ करून सरावाने पन्नास सूर्यनमस्कारापर्यंत पोहोचू शकतात. वय वर्ष १५ च्या पुढचा वयोगट चार दिवसांनी चार सूर्यनमस्कार वाढवून १०८ किंवा आपल्या शारीरिक क्षमतेनुसार सूर्यनमस्काराचा आकडा निश्चित करू शकतात. मात्र यासाठी यामध्ये नियमित सराव व सातत्य हवे असते.

**सूर्यनमस्कार सर्वांगसुंदर व्यायाम :-** सूर्यनमस्कार हा व्यायाम प्रकार सर्वांसाठी सर्वांग सुंदर आहे. आपले आरोग्य चांगले राहण्यास तसेच स्मरणशक्तीच्या विकासामध्ये सूर्यनमस्काराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. योग साधनेतील काही असणे साखळीप्रमाणे जोडून सूर्यनमस्काराची निर्मिती झाली हे शरीर स्वास्थ्यासाठी महत्त्वाची बाब मानावी लागेल. सूर्यनमस्कार ही कृती योगामध्ये उशिरा समाविष्ट झाली असली तरी योगाच्या नियमित अभ्यासाची सुरुवात सूर्यनमस्कारानेच होते. इतर व्यायाम आणि हात पाय मान पोट पाठ इत्यादी अवयवांना एकसारखा व्यायाम मिळत नाही.

**सूर्यनमस्काराचे फायदे :-** सूर्यनमस्कार समंत्र आणि शाश्वत्सवासहित केले तर त्याचे अनेक फायदे आपल्याला मिळतात असे भवानी राव सांगतात ज्यावर मानवाचे दीर्घायुष्य अवलंबून आहे ती फुफ्फुसे श्वासोत्सवासाने बळकट व दीर्घ श्वसन करणारी होतात भरपूर शुद्ध हवेने शुद्ध रक्त तयार होते व ते सर्व शरीर भर मिसळते त्यामुळे आपण मजबूत व ताजेतवाने होतो शरीर लवचिक व चपळ बनते रक्ताभिसरणाची क्रिया उत्तम चालते जीर्णपेशींचे उच्चाटन होऊन नवीन पेशींची निर्मिती चांगल्या प्रकारे होते त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते शरीराची कार्यक्षमता वाढून उत्साह कायम टिकून राहतो स्थूलता व जडत्व येत नाही सात्विक स्वभावाबरोबरच मनाची एकाग्रता व बौद्धिक पातळी उंचावते पोटाचे स्नायू बळकट होऊन पचनशक्ती सुधारते स्नायू बळकट होतात दंडपेळदार व मनगटे बळकट होतात एकूण शारीरिक स्थूलता व जडत्व नाहीसे होऊन शरीराला योग्य आकार येतो सहाजिकच व्यक्तिमत्त्वात सुधारणा दिसून येते असा हा सर्वांग सुंदर व्यायाम श्री पुरुष लहान थोर आबाद वृद्ध कोणीही करू शकतात. म्हणूनच सूर्यनमस्काराला' सर्वांग सुंदरव्यायाम' म्हटले आहे.

**श्रीमंत बाळासाहेबांचा साष्टांग सूर्यनमस्काराचा प्रचार व प्रसार :-** सतत २० वर्ष सूर्यनमस्कार व सूर्योपासना केल्यावर भवानीरावांनी सूर्यनमस्काराच्या प्रचाराला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी सूर्यनमस्काराच्या छायाचित्रांसह पुस्तक प्रसिद्ध केले. तसेच औंध संस्थानातील प्रत्येक शाळेतून सूर्यनमस्कार सक्तीचे केले. तसेच देवळात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, ज्यू इत्यादी सर्व जातीधर्माचे स्त्री - पुरुष आनंदाने सूर्यनमस्कार घालत. इतकेच काय आपल्या राजाला सूर्यनमस्काराचे वेड आहे म्हणून त्यांची मर्जी सांभाळून बढती मिळवण्यासाठी सूर्यनमस्कार घालू लागले. १९२१ साली छापलेल्या भवानीरावांच्या सूर्यनमस्काराच्या पुस्तकाचे कानडी, तामिळ, गुजराती, बंगाली, हिंदी, तेलगू, इत्यादी भाषांमध्ये भाषांतरे झाली. सूर्यनमस्कार या पद्धतीला त्यांनी सार्वत्रिक स्वरूप दिले. आपले आरोग्य नियमित व्यायामाने निरोगी राहता येते ते प्रत्येक व्यक्तीने केले पाहिजे तरच तो समाजाची व राष्ट्राची सेवा करू शकतो. या दृष्टीने भवानीरावांनी आजच्या तरुण पिढीला सूर्यनमस्काराच्या रूपाने वरदान दिले आहे. त्यांनी सूर्यनमस्कार या प्राचीन भारतीय व्यायाम प्रकाराला शास्त्रशुद्ध स्वरूप देऊन तत्कालीन समाजाला व्यायामाची गोडी लावली. पुरुषांबरोबर स्त्रियांनाही हा नमस्कार करता येतो हे त्यांनी समाजाला पटवून दिले.हिंदुस्तानात त्यांची ओळख सूर्यनमस्काराचा राजा अशी झाली. सूर्यनमस्कारामुळे व्यक्तीची रोगप्रतिबंधक शक्ती इतकी वाढते की अनेक रोगांवर व्यक्ति विजय मिळवू शकतो हेच भवानीरावांनी सिद्ध करून दाखवले. तणावमुक्त रोगमुक्त जीवन जगण्यासाठी औंधचाराजांनी सूर्यनमस्काराची दिलेली देणगी आपण अनुसरली तर आज तंत्रज्ञानाच्या युगात रोगमुक्त जीवन जगणे आपल्यासाठी सहज सुलभ होईल.

# शांतता पुरस्काराचे शस्त्र

वेधक
कौस्तुभ वीरकर



**जागतिक राजकारणात प्रतीकांचे एक स्वत:चेच महत्त्व असते. अनेक नेते प्रतीकांच्या माध्यमातून भविष्याचे संकेत देतात. त्यामुळे साहजिकच, या प्रतीकांचा एक अर्थ लावला जातो. सध्या अशीच एक घटना घडली आहे, त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न जगभरात केला जात आहे. अलीकडेच व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांनी त्यांना मिळालेला 'नोबेल शांतता पुरस्कार' अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना बहाल केला.**

शांततेचा 'नोबेल' मिळावा, यासाठी ट्रम्प यांनी नानाविध पद्धतीने जंगजंग पछाडले होते. मात्र, त्यानंतरही त्यांच्या पदरी निराशाच आली होती. त्यामुळे स्वत:चे जागतिक पुरस्काराचे पदक ट्रम्प यांना देण्याम ागचा मारिया यांचा संकेत समजून घेणे आवश्यक ठरणार आहे. मारिया यांनी ट्रम्प यांना 'नोबेल पदक' देणे ही घटना जितकी सोपी दिसते, तितकीच ती आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या खोल प्रवाहाचे संकेत देणारी आहे. या प्रकारास केवळ व्यक्तिगत कृतज्ञतेचा आविष्कार समजणे म्हणजे भोळ्या-निष्कपटतेची परिसीमा ठरावी. कारण, या कृतीतून एकच बीभत्स चित्र स्पष्ट होते, ते म्हणजे 'नोबेल' पुरस्कार प्रत्यक्षात नवीन प्रकारचे भू-राजकीय शस्त्र बनत चालला आहे. इतिहासात डोकावले असता, व्हेनेझुएलामध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मारिया यांनी विजयाचा दावा केला होता. मात्र, निकोलस मादुरो यांनी सत्ता सोडण्यास नकार दिल्याने मारिया यांनी त्यांच्याच देशात जवळपास ११ महिने अज्ञानवासात घालवले.

आयुष्यातील सर्वोच्च क्षण असलेल्या 'नोबेल' पुरस्कार सोहळ्यालादेखील त्या हजर राहिल्या नव्हत्या. त्यानंतर मारिया थेट दिसल्या त्या ट्रम्प यांच्यासहित 'व्हाईट हाऊस'मध्येच! मधल्या काळात अमेरिकेने व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरो यांना अटक केली असून, त्यामुळे सध्या व्हेनेझुएलामध्ये प्रशासकीय अस्थिरता आहे. अशा वेळी ट्रम्प यांनी व्हेनेझुएलामध्ये मादुरो यांच्या जवळच्या व्यक्तीबरोबर काम करण्यास तयार असल्याचे विधान केल्याने, व्हेनेझुएलाच्या गादीवर अमेरिकेच्या मर्जीतला मादुरो यांच्या जवळचा माणूस कोण? याची उत्सुकता वाढली होती. मात्र, ट्रम्प यांच्या विधानानंतर व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या असलेल्या मारिया यांनी अचानक प्रकट होऊन ट्रम्प यांची सर्वोच्च मनीषा असलेले 'नोबेल' पुरस्काराचे पदक त्यांना देणे, एका वेगळ्याच युतीचा संकेत देणारे ठरते. आजकाल 'रिजिम चेंज' अर्थात, सत्तांतर हा शब्दप्रयोग मोठ्या प्रमाणावर ऐकू येतो. हे सारे त्याचाच भाग असावे, असा संशय दुणावत आहे. एखाद्याच्या प्रतिमानिर्मितीसाठी 'नोबेल' पुरस्काराचा वापर केला जातो आहे का? हा संशोधनाचा विषय. ज्या देशाने स्वत:च्या देशाच्या सार्वभौमत्वाचा अपमान केला, त्याच्या समोरच त्या अपमानित देशाचा विरोधी पक्षनेता कौतुकाचे सोहळे करताना दिसतो, हे कसले प्रतीक मानावे? हा प्रकार वेगळा किंवा अचानक घडलेला नाही. याआधीही अशीच एक प्रतिमानिर्मिती करण्यात आली होती. बांगलादेशचे सध्याचे काळजीवाहू पंतप्रधान मोहम्मद युनूस हे त्याचे उदाहरण ठरावे. शांततेचा आणि सामाजिक अर्थव्यवस्थेतील नावीन्यपूर्ण कार्याचा पुरस्कार म्हणून मिळालेले 'नोबेल' त्यांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेला अवाजवी उंची देऊन गेले. त्यानंतर बांगलादेशातील सत्ता-संतुलन ढासळले, राजकीय अस्थिरता प्रचंड वाढली आणि अखेर युनूस हेच देशाचे पंतप्रधान बनले. 'नोबेल'चा आधार घेऊन एका व्यक्तीची प्रतिमा जागतिक पातळीवर इतक्या प्रखरतेने पोहोचवली की, तीच प्रतिमा देशांतर्गत राजकीय प्रभावात रूपांतरित झाली. हा प्रवास योगायोग नव्हता, तो स्पष्ट राजकीय डाव होता. व्हेनेझुएलामधील घटनाक्रम त्याच धर्तीवर पुढे जाताना दिसतो. मादुरोंच्या विरोधकांना आंतरराष्ट्रीय आधार मिळावा, यासाठी मचाडो यांनी स्वत:चा 'नोबेल' ट्रम्प यांना देणे म्हणजे राजकीय सौद्याचाच भाग म्हणावा लागेल. पुरस्काराचा उपयोग राजकीय घुसखोरीसाठी आणि वैयक्तिक प्रतिमानिर्मितीसाठी अशा खेळात ना देशाची स्थिरता टिकते, ना लोकशाहीचा आदर वाढतो. उलट, पुरस्काराचे मूल्य घसरते आणि जगभरातील लोकांचा विश्वास ढासळत जातो. आज 'नोबेल शांतता सन्माना'च्या भविष्याबाबत गंभीर प्रश्न विचारण्याची वेळ आलेली आहे.




पूर्णा नद नु कत्याच पार पडलेल्या आशियाई चित्रपट महोत्सवात भारतातील विविध राज्यांतील, वेगवेगळ्या बोलीभाषांमधील चित्रपट पाहताना पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे माजी संचालक पी. के. नायर यांचे 'Indian cinema is a complex phenomenon' हे विधान वारंवार आठवत होते. भारतीय सिनेमा नेमका कसा आहे? व्यावसायिक हिंदी सिनेमापेक्षा त्याचा आशय कशा प्रकारे वेगळा आहे? आणि या सिनेमावर कोणकोणते घटक प्रभाव टाकतात? या प्रश्नांचा विचार केला असता, नायर यांनी उल्लेख केलेली गुंतागुंत अधिक स्पष्टपणे समजते. भारतीय सिनेमाची सुरुवात 'राजा हरिश्चंद्र' या पौराणिक कथेपासून झाली. तत्कालीन समाजाच्या मनोरंजनाची संकल्पना यामागे होती. कलात्मक दृष्टीसोबतच व्यावहारिक शहाणपण असलेल्या फाळकेंनी प्रेक्षकांची मानसिकता अचूक ओळखून चित्रपट निर्मिती केली. आजही व्यावसायिक चित्रपटसृष्टी 'मागणी तसा पुरवठा' या तत्त्वावर चालताना दिसते. प्रेक्षकांना जे आवडते तेच आम्ही दाखवतो, असे म्हणणारे निर्माते-दिग्दर्शक आजही मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे भारतीय चित्रपटाच्या इतिहासाचा अभ्यास करताना प्रेक्षक हा घटक दुर्लक्षित करता येत नाही. काळानुसार प्रेक्षकांची अभिरुची बदलत गेली आणि त्याचा थेट परिणाम चित्रपटांच्या आशयावर झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजी व आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांच्या विचारांचा प्रभाव असलेले चित्रपट तयार झाले. 'अछूत कन्या', 'शेजारी' यांसारखी चित्रपटांची शीर्षकेच त्यांचा सामाजिक आशय स्पष्ट करतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या काळ्या पैशामुळे इतर व्यवसायांतील अनेक लोक चित्रपट निर्मितीकडे वळले. त्यांचा मुख्य हेतू नफा मिळवणे हाच होता. परिणामी, स्टुडिओ काळातील कलात्मक निष्ठेपेक्षा गीत-संगीत आणि भावनिक नाट्याला अधिक महत्त्व दिले जाऊ लागले. हिंदी चित्रपटसृष्टीची एक ठरावीक चौकट तयार होत असताना प्रादेशिक चित्रपट आपली स्वतंत्र शैली शोधत होते. मराठीत याच काळात कुटुंबप्रधान आणि ग्रामीण पृष्ठभूमीवर आधारित तमाशापट निर्माण झाले. दक्षिण भारतात मात्र प्रेक्षकांचे पूर्ण मनोरंजन करणारे चित्रपट मोठ्या प्रमाणात तयार झाले. १९४० ते १९५० या काळात २४१ तमिळ चित्रपट तयार झाले. मराठी चित्रपटांची संख्या केवळ ९७ होती. यावरून दक्षिण भारतात सिनेमाने किती लवकर भक्कम स्थान मिळविले, हे लक्षात येते. दक्षिण भारतात मातृभाषेतून चित्रपट निर्माण करण्याची आणि प्रेक्षकांनी त्याला प्राधान्य देण्याची परंपरा सुरुवातीपासूनच निर्माण झाली. विशेष म्हणजे दक्षिणेत सुपरहिट ठरलेला पहिला हिंदी चित्रपट राज कपूर यांचा 'बॉबी' होता. "Make your hobby to see Bobby" अशी पोस्टर्स तेव्हा तामिळनाडूमध्ये झळकत होती. प्रादेशिक चित्रपटांना मिळणारा प्रचंड प्रेक्षक पाठिंबा हेच त्यांच्या यशाचे मुख्य कारण ठरले. महाराष्ट्रात मात्र हिंदी चित्रपटसृष्टीने मुंबईत आपले बस्तान बसवल्यामुळे मराठी सिनेमाला दुय्यम स्थान मिळाले. पुणेकोल्हापूर भागातील मराठी सिनेमा ग्रामीण स्वरूपाचा राहिला, तर विदर्भात निर्मिती आणि वितरण या दोन्हींचा अभाव दिसून आला. परिणामी तिथला प्रेक्षक मराठी सिनेमापासून दूर राहिला. स्वातंत्र्यानंतर नेहरूंनी पाहिलेल्या आधुनिक भारताच्या स्वप्नांना पूरक असे चित्रपट निर्माण झाले. 'हम हिंदुस्तानी', 'मेरा जूता है जापानी' यांसारख्या गीतांतून राष्ट्रप्रेमाची रोमँटिक भावना व्यक्त झाली. मात्र, वास्तवापेक्षा पलायनवाद हा त्या काळातील सिनेमांचा स्थायीभाव ठरला. आज हे चित्रपट प्रामुख्याने त्यांच्या मधुर संगीतामुळेच लक्षात राहतात; त्यांच्या आशयावर फारशी चर्चा होत नाही. हिंदी सिनेमाने संपूर्ण देशातील प्रेक्षकांचा विचार केल्यामुळे त्यातील प्रादेशिक ओळख हळूहळू नष्ट झाली. ठरावीक गावांची नावे, सर्वसाधारण नायक-नायिकांची नावे आणि साचेबद्ध पोशाख यामुळे सुलभीकरण झाले. दक्षिणेकडील कलाकारांचा हिंदी सिनेमापासून दूर राहण्याचा आग्रह, काहींना आलेले अपयश, मराठी कलाकारांना मिळालेल्या दुय्यम भूमिका आणि पंजाबी संस्कृतीतून आलेल्या दिग्दर्शकांचे वर्चस्व यामुळे हिंदी सिनेमातील प्रादेशिकतेचा अभाव अधिक वाढला. समांतर चळवळीतील 'अंकुर', 'मिर्च मसाला' यांसारख्या चित्रपटांनी मात्र काही प्रमाणात ही ओळख पुन्हा मिळवून दिली.

१९५२ साली झालेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने अनेक भारतीय चित्रपटकारांना आशयप्रधान सिनेमा निर्माण करण्याची प्रेरणा दिली. मात्र त्याचा प्रभाव त्या काळातील मराठी सिनेमावर फारसा दिसत नाही. व्ही. शांताराम यांसारख्या दिग्गजांनी सुरुवातीला मराठीत महत्त्वाचे चित्रपट दिले; नंतर हिंदीकडे मोर्चा वळवला. १९७० नंतरच्या समांतर चळवळीने केवळ हिंदी सिनेमालाच नाही, तर प्रादेशिक सिनेमालाही स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची दिशा दिली. गेल्या काही वर्षांत हिंदीप्रमाणेच प्रादेशिक चित्रपटांत समांतर आणि व्यावसायिक यातील सीमारेषा पुसत झाल्याचे लक्षात येत आहे. चित्रपट केवळ पैसा कमावण्यासाठी करायचा नाही, पण त्यातून फक्त आपलीच कलात्मक भूक भागवायची नाही, याचं भान या तरुण चित्रपट दिग्दर्शकांना आहे, महाराष्ट्रात सरकारतर्फे ज्याप्रमाणे चित्रपट निर्मितीला आणि चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रोत्साहनपर योजना आहेत, त्या योजनांचा अभाव इतर काही राज्यांमध्ये आहे. त्यांच्या या प्रयत्नांना पाठबळ देण्यासाठी, प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी महाराष्ट्रात आयोजित केले जाणारे आशियाई, पिफ्फ, अजंता एलोरा हे महोत्सव मोलाची कामगिरी बजावत आहेत. (लेखक चित्रपट समीक्षक आहेत.)


डॉ. संतोष पाठारे

# आल्हाददायक हिरवळीच्या त्यागातून हसणारा शिशिर



साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

**ऋतुचक्रातील इतर ऋतूचे साज आपल्या अंगा खांद्यावर मिरवत डौलाने उभ्या असलेल्या सृष्टीसह वृक्षराजींना ओडके बोडके करण्यासाठी आलेला शिशिर खरं तर मला एक तत्त्ववेत्ता वाटतो. वर्षभर संपन्नता आणि समृद्धता ट्यांच दान इतर ऋतूंनी भरभरून दिल्यावर जीवनात औदासिन्य, वैफल्यता यांचेही दिवस निमुटपणे सहन केले पाहिजे हे सांगण्यासाठीच तो येतो, असे मला नेहमी वाटते. अर्थात या उदासीनतेच्या अंधारानंतर वसंताचा चैतन्य पालवी घेऊन येणारा हंगाम उगवणारच हे सुद्धा हा ऋतू आपल्याला सांगत असतो. झाडाचे मूळ अस्तित्व टिकवायचे असेल तर पानांनी आपल्या वाट्याचा शिधा खोडामध्ये साठवून स्वत:च्या आल्हाददायक हिरवळीचा त्याग करणे ही उदात्त भावना शिशिर आपल्याला शिकवत असतो.**



प्रत्येक ऋतूंचा आपला स्वत:चा असा एक चेहरा मोहरा असतो, स्वभाव असतो तसा शिशिराचा चेहरा आहेच, तो चेहरा पानगळीच विलक्षण एकाकीपण दर्शवणारा असतो. आलेले ऋतू स्वीकारणे, ऋतूमग्न होऊन जीवन जगणे ही खरे तर सजीवांची नैसर्गिक प्रवृत्ती मात्र या ऋतूंच्या स्वभावावर मानवाने मात केली तो भाग वेगळा. शिशिर येतानाच साधारण हेमंताला निरोप देत हेमंतातल्या थंडीला आणखी बोचरी करत येतो. हवेत गारठा उरल्याने अजून तरी सूर्यकिरणे हवीहवीशी वाटत असतात. हळूहळू तापत जाणारी हवा हळूहळू कानात वारं गेलेल्या वासराप्रमाणे सैरावैरा वाहण्याची सुरुवात झालेली असते. हवेतला गारवा अजूनही स्वप्नांना पांघरुणाच्या बाहेर येऊ देत नसला तरी वाळलेला पालापाचोळा कडकड आवाजासह शेकोटीत जळत असला की तिच्या भोवती बसून गप्पामध्ये भाग घेण्याचा मोह आवरता येत नाही. ढगांचा वेग डोळ्यांना जाणवेल असा झालेला असतो.

हेमंताची थंडी बरी होती अशी हाकाटी देत शिशिर बऱ्यापैकी हवेला खेळवायला सुरुवात करतो. वाऱ्याचे झोत एकत्र येऊन वाळलेल्या पानांना कधी हळूहळू चुळबूळ करायला लावतात, तर कधी प्रचंड वेगाने उंच नेतात. पानगळीत मातीमोल होण्यासाठी जमिनीकडे झेपावणाऱ्या पानांना उगाच उंचीवर नेऊन आदळून देण्याचे काम हा खोडकर वारा करत असतो. वाऱ्यावर भिरभिरणारे पाने कुण्या एखाद्या कवीला उगाच वैफल्यतेला अलंकारीत करण्यासाठी स्फूर्ती देतात. पानगळीच्या दिवसात सृष्टी उगाच उदासीनतेची वाळलेली पाने अंगावर लेवून बसलेली दिसते. भर तारुण्यात आरसपाणी सौंदर्यसह आलेले वैधव्य सहन करणाऱ्या रुपवतीचे दुःख कोणते? असा प्रश्न जर कधी मला पडला तर मला फक्त 'शिशिरातली पानगळ' हे दोनच शब्द आठवतात. कडुलिंबाची पाने, वड पिंपळ यासह सर्वच झाडे आपल्या पानांना मर्जी ना मर्जीने रजा देत असतात, नाही म्हणायला आयुष्यभर तीक्ष्ण काटे हीच ओळख असलेल्या निवडूंगाला नेमके याच ऋतूत फुले येतात. निवडुंगाचे पानेही गर्द हिरवेपण अंगावर मिरवत इतर झाडांना वेडावून दाखवत असतात.

स्वत:च्या हिरव्या पानासह आपल्या काटेरी अंगावर इतर वृक्षांचे वाळलेली पाने सुद्धा निवडुंगासारखे काटेरी झाडे जमा करून ठेवतात. निवडुंगाप्रमाणे हकनाक विरक्तीचे प्रतीक म्हणून मिरवला गेलेला चाफाही शिशिरमध्ये फुलून येतो. पांढऱ्याशुभ्र चांदीच्या अलंकाराने सजून उभे राहिलेलं चाफ्याचं झाड सुंदर की रक्तवर्णी लालजर्द फुलांना अंगावर सजवून उभा राहिलेलं रक्त चाफ्याचे झाड सुंदर हे की पिवळ्या चाफ्याला सोनचाफा म्हणून गौरविणे रास्त हे सर्व उलगडून सांगणे कठीणच...

पानगळीच्या दुःखातून सावरण्यासाठी हा ऋतू कदाचित झाडांवर फुलांची बरसात करतो ती ही अशी. लिंबाच्या पानगळल्या झाडालाही हलके हलके पांढऱ्या फुलांनी आकार घ्यावा म्हणून अंकुर फुटणे सुरू होते तेही शिशिरातच. शेतातली पिके मग ते गहू असो की हरभरा पिवळे पडायला सुरुवात झालेली असते. हवा कोरडी झाली की पहाटच्या धुक्यांनाही आकार घेण्याचा कंटाळा येऊ लागतो. पीक काढणीस तयार असते आणि आयत्या पिकावर शेतातले राघू आपला हक्क सांगण्यासाठी तयार असतात.

कधीकाळी राघू प्रमाणे खळ्यावर आपलाही हक्क आहे हे सांगण्यासाठी गावातील भूमिहीन लोकांनी गावात आलेले भटके फिरस्ते लोक गर्दीतून आपला वाटा घेऊन जात. खळ्यावर मजुरांची गर्दी असेल, प्रसंगी खळ्यावर नव्या गव्हाचे रोडगे भाजले जात आणि ह्या सृजन महोत्सवात अनेकांना सहभागी करून घेतले जात असे. अगदी कालपरवापर्यंत आपल्या शेतातील गहू बैलगाडी किंवा ट्रॅक्टर मध्ये भरून आपल्या बहिणीच्या घरी पाठवून देण्याची प्रथा अनेक भावांनी जपली होती. आज एखाद्या हार्वेस्टर येते आणि दिवसभरात सर्व पीक कापून दुसऱ्या दिवशी मार्केटमध्ये त्याचे पैशात रूपांतर केले जाते.

दहा पोते गहू वाटून देणारी कर्णाची दानशूरता पिकाचे पैशात रूपांतर झाल्यावर आपोआप नष्ट होते आणि तार्किक व्यवहारवाद सुरू होतो. लवकरच वसंतासह येणाऱ्या उन्हाळ्याची चाहूल घेत काही पक्षांचे स्थलांतर शिशिरातल्या पानगळीचा इशारा समजून सुरू होते. मात्र, अजूनही नदीकाठी आपल्याला हवे ते भक्ष्य मिळते हे जाणून बगळ्यांचे थवे नदीकाठी जमा झालेले दिसतात.

कावळेही पानगळीच्या मौसमात उघड्या झालेल्या झाडावर फार सहजतेने दिसू लागतात. आम्ही लहानपणी अनेकदा छोटे छोटे खडे या कावळ्यांकडे फेकत असू आणि क्रिकेटमध्ये फिक्सिंग न केलेल्या फिल्डरने मैदानात झेल टिपावा तसे ते कावळे चोचीमध्ये ते बारीक खडे झेलून घेत. यामध्ये किती वेळ जाईल त्याची पर्वा कावळ्यांना असायचे कारण नव्हते आणि आम्हीही ती करत नव्हतो. एकदा आमच्या शाळेत एक पक्षीमित्र आला आणि त्याने काव काव असा आवाज दिल्यावर शेकडो कावळे आमच्या शाळेच्या मैदानात काव काव करत भिरभिरू लागले ते पाहून त्या पक्षी मित्राच्या मागे आम्हालाही कावळ्याची भाषा शिकवा म्हणत आमचं मित्र मंडळ गळ घालून बसलं. त्यानंही थातूरमातूर अस आम्हाला थोडक्यात काही सांगितल तो आवाज शिकवलां. त्यानं शिकवला ती काव काव अशी आरोळी देत आम्ही मैदानात जाऊन ओरडलो, काव काव केली, मात्र एकही कावळा आमच्याकडे फिरकला नाही. विद्या देताना कोणत्याही काळात हातच राखून ठेवण्याची माणसाची वृत्ती कधी बदलेल? हे सांगणे खरंच कठीण हे आम्ही फार लहानपणी शिकलो.

अरे हो विद्येवरून आठवलं, पानगळीतल्या पिंपळाच पान वहीत किंवा पुस्तकात ठेवून या पानगळीच्या आठवणी जपण्याचे दिवस वर्तमान पिढीत दिसून येत नाहीत. मात्र, आमच्या लहानपणी प्रत्येकाच्या पुस्तकात पिंपळाच्या पानाची जाळी हमखास असायची, मोराचे एखादे पीस पुस्तकात ठेवले म्हणजे मोराने जन्म घेतला तोच कृष्णाच्या मुकुटाची आणि विद्यार्थ्यांच्या पुस्तकाची शोभा वाढवण्यासाठी असे वाटायचे.

हिरव्या रंगाच्या काड्या वाटाव्यात आणि म्हटलं तर त्याला पानही म्हणावं असं एक विद्येचे झाड अजूनही अनेक उद्यानात उभं असतं आणि आजही त्याचं एखादं पान तोडून पुस्तकात ठेवावे असे वाटते. मला लहानपणीच्या अनेक संदर्भाचा अर्थ आणि सत्य शोधण्याचा वेडं असलं तरी विद्येच्या झाडाचे खरे नाव काय आहे? ते शोधण्याच्या भानगडीत कधी पडावसे वाटले नाही. कापणीस आलेला गहू शिशिरातल्या गाण्यात रंग भरत असताना निष्पर्ण वृक्षांच्या सावल्या दिवसा जितक्या एकाकी दिसत असतात, त्यापेक्षा संध्येच्या भगव्या क्षितिजावर एखाद्या सराईत चित्रकाराने भगव्या केसरी कॅनवास वर काळ्या रंगाचा कौशल्याने वापर करून रेखाटलेल्या चित्राप्रमाणे शोभिवंत दिसतात. अंधारात गुडूप होण्या आधी सृष्टीचा वेग बऱ्यापैकी वाढलेला असतो. पक्षी घरट्याकडे, गाई गोठ्याकडे परत फिरण्याच्या वेळेस 'झाल्या तिन्ही सांजा' म्हणत घरधनीन आज वाटेवर डोळे लावून बसत नसली तरी अंधार गर्द झाला तरी पाहिजे ती चाहूल लागली नाही म्हणजे बेचैनी आजही वाढीस लागते हे निश्चित.

शिशिरातली संध्या हेमंत ऋतुसारखी उगाच अंधाराशी जवळीक करत घाईने रात्रीत रूपांतरीत होत नाही, ती क्षितिजावर भगव्या, केसरी, सोनेरी किरणाशी खेळत बऱ्यापैकी रेंगाळून राहते. शिशिरातल्या रात्रीचा अंधार बोचऱ्या थंडीचा सखा म्हणूनच मिरवत असला तर चांदण्या आपल्यला सलगीच्या दुधात भिजल्यासारख्या वाटतात. चंद्र घाईघाईने शाळेला उशीर झालेल्या विद्यार्थ्यांसारखा धावताना दिसतो.

थंडीच्या दिवसात सकाळच्या शाळेला होणारा उशीर आणि त्यामुळे झाडाला पाणी घालण्याची किंवा हात वर करून मैदानावर पळण्याची शिक्षा असे पोषक शिक्षातत्व शाळेतून हद्दपार झाले तरी आपल्या मनात रेंगाळत राहतात, अनेक आठवणीचा हा शिशिर दवांच्या थेंबासारखा नितळ आणि निर्मळ असतो हात लावताच ओघळून जाणारा! हिरवळीच्या त्यागातून हसणारा, पानाच्या अस्तित्वासह मातीमोल होण्यातल चैतन्य सांगणारा...



मुस्लिमांना सत्तेत वाटा हवा असून, तो असदुद्दीन ओवेसी आपल्याला मिळवून देतील, या आशेने त्यांच्या एआयएमआयएम या पक्षाला विविध राज्यांमध्ये पाठिंबा वाढत चालला आहे. पुढील काळात हा पक्ष अधिक कट्टर भूमिका घेईल, यात शंका नाही. त्याला रोखणे ही आता कथित सेक्युलर पक्षांची जबाबदारी आहे.

# मुस्लीम वर्चस्ववादाचा वाढता धोका!

वेधक

**राहुल बोरगांवकर**

महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या २९ महापालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक म्हणजे २५ महापालिकांमध्ये सत्ता संपादन केली. ही स्वागतार्ह बातमी असली, तरी त्याचबरोबर आणखी एक बातमी होती, जी अधिक चिंताजनक मानली पाहिजे. या २९ महापालिकांमध्ये मिळून ऑल इंडिया मजलिसे इत्तेहादुल मुसलमीन (एआयएमआयएम) या पक्षाचे तब्बल १२५ उमेदवार निवडून आले आहेत. एआयएमआयएम हा हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांचा पक्ष असून, तो देशातील मुस्लीम मतदारांमध्ये झपाट्याने लोकप्रिय होत चालला आहे. देशातील मुस्लीम मतदारांचा एकमेव पक्ष बनून मुस्लिमांना सत्तेत वाटा देणे, हे या पक्षाचे जाहीर उद्दिष्ट आहे.

गतवर्षी पार पडलेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकांमध्येही या पक्षाचे तब्बल सहा आमदार निवडून आले होते. वास्तविक, हा पक्ष प्रामुख्याने तेलंगण आणि काही प्रमाणात महाराष्ट्र या दोनच राज्यांमध्ये सक्रिय आहे. असे असतानाही बिहारमध्ये या पक्षाचे सहा आमदार कसे निवडून येतात? हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. गतवर्षी झालेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर भारत सरकारने काही खासदारांची शिष्टमंडळे विविध देशांमध्ये पाठविली आणि या संघर्षाचे कारण आणि ऑपरेशन सिंदूरची अपरिहार्यता जगाला पटवून दिली. या शिष्टमंडळांमध्ये काही विरोधी पक्षांचे खासदारही होते. त्यापैकी एका शिष्टमंडळात ओवेसी यांचाही समावेश होता.

ओवेसी यांनी या शिष्टमंडळामार्फत आणि नंतरही भारतात ऑपरेशन सिंदूरचे जोरदार समर्थन केले असून, पाकिस्तानवर कठोर टीका केली आहे. असे असले, तरी इतर काही मुद्द्यांवर ओवेसींची भूमिका ही नेहमीच वादग्रस्त राहिली. ओवेसी आजही अयोध्येतील विवादित ढाँचा पाडण्याच्या घटनेचा उल्लेख बाबरी मशिदीचे बलिदान (शहीद) असा करतात. तीन तलाक आणि वक्फ बोर्डातील सुधारणा या कायद्यांना त्यांनी कडाडून विरोध केला. लोकसभेत तर त्यांनी वक्फ बोर्डाच्या विधेयकाचा मसुदा फाडून टाकला होता. तसेच खासदारपदाची शपथ घेतल्यावर त्यांनी जय फिलिस्तीन अशी घोषणाही दिली होती. ओवेसींचा धाकटा भाऊ अकबरुद्दीन ओवेसी हा अधिक वादग्रस्त असून, त्याने काही प्रक्षोभक विधाने केलेली आहेत. देशातील सर्व पोलीस केवळ १५ मिनिटांसाठी बाजूला करा आणि मग आम्ही २० टक्के मुस्लीम भारतातील ८० टक्के हिंदूंवर कसे भारी पडतो ते दाखवून देऊ, या त्याच्या उद्गारांनी खळबळ माजविली होती. भारतातील जास्तीत-जास्त भूमी आणि सत्तापदे मुस्लिमांच्या ताब्यात आणण्याची ओवेसींची ही भूमिका लपून राहिलेली नाही. इतक्या स्पष्टपणे हे मुस्लीम नेते हिंदूविरोधी वक्तव्ये करीत असतानाही सरकार त्यांच्यावर कारवाई कशी करीत नाही, हा प्रश्नच आहे.

महाराष्ट्रात ओवेसींच्या पक्षाला गेल्या काही निवडणुकांमध्ये यश येत आहे. यंदाच्या महापालिका निवडणुकांमध्ये तब्बल १२५ नगरसेवक निवडून आणण्याची कामगिरी एआयएमआयएमने केली आहे. गेल्या काही वर्षांपासून छत्रपती संभाजीनगरमध्ये या पक्षाचे आमदार व खासदार निवडून येत आहेत. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत येथून या पक्षाचे तब्बल ३३ नगरसेवक निवडून आले असून, महापालिकेत तो प्रमुख विरोधी पक्ष बनला आहे. मालेगाव महापालिकेच्या ८४ जागांपैकी २१ जागांवर या पक्षाचे नगरसेवक निवडून आले आहेत. मुंबईतही या पक्षाचे आठ नगरसेवक निवडून आले असून, त्यापैकी सात हे गोवंडी या मुस्लीमबहुल भागातील आहेत. आजवर तेथून समाजवादी पक्षाचे नगरसेवक जिंकत असत. यावरून मुस्लीम मतदारांमध्ये आता या पक्षाची लोकप्रियता आणि स्वीकारार्हता वाढत चालली आहे.

बिहार निवडणुकीत ओवेसी यांनी जाहीर केले होते की, यापुढे मुस्लीम मतदार हे केवळ मतपेढी बनून राहणार नाहीत, तर त्यांना सत्तेत वाटाही द्यावा लागेल. अब अब्दुल सिर्फ दरी नहीं बिछाएगा हे त्यांचे वाक्य होते. त्यांच्या या विचाराची परिणती पुढे कशात होईल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. आज ओवेसींच्या पक्षाची ताकद मर्यादित असली, तरी मुस्लीम मतदारांमध्ये हा पक्ष वेगात लोकप्रिय होत आहे. ओवेसींची महत्त्वाकांक्षा त्यांच्या पक्षाला मुस्लीम मतदारांकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे देशव्यापी करीत आहे. आता यंदा होणाऱ्या प. बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ वगैरे राज्यांमध्येही हा पक्ष आपले उमेदवार उभे करणार असल्याचे ओवेसी यांनी जाहीर केले असून, त्यामुळे काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस वगैरे कथित सेक्युलर पक्षांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अलीकडेच त्यांनी केलेल्या एका विधानामुळेही वाद माजला होता. एक दिवस भारताचे पंतप्रधानपद बुरख्यातील एक महिला भूषवेल, अशी मला आशा आहे, असे ओवेसी म्हणाले होते. त्यांचे हे विधान त्यांच्या खऱ्या हेतूचे निदर्शक मानले पाहिजे. मुस्लिमांना सत्तेत वाटा हवा असून, तो ओवेसी मिळवून देतील, अशी आशा त्यांच्या मनात निर्माण झाली आहे. महाराष्ट्रासह अन्य राज्यांत या पक्षाची वाढणारी ताकद, हे अशुभ संकेत आहेत.

# EU FT करार एक नवा अध्याय - 9

**२७ जानेवारीला होणारं, EU - FT डील, हे फक्त ट्रेड डील नाही. तो एक मोठा घाव असेल. युरोपला अमेरिकन जोखडातून बाहेर पडण्याचा ची संधी असेल. त्यातच जर ग्रीनलँड वर अमेरिकेने हल्ला केला आणि ते ताब्यात घेतलं तर, नाटोच्या अस्तित्वावर तो शेवटचा घाव असेल. त्यानंतर पुढची प्रक्रिया घडवून आणण्याचं काम IRC नेते करतील. त्यातून UNO कमजोर होऊन, BRICS ला बळकटी मिळेल.**

परराष्ट्रकारण

**प्रसन्न आठवले**

भ्र. ९०४९३५३८०९



थोडसं खोलात जाऊ. काल दाओस मध्ये एण अर्थात युरोपियन युनियनच्या प्रेसिडेंट उर्सुला डेअर लियान्स यांनी केलेल्या आपल्या भाषणात दोन गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख केला. एक म्हणजे भारतासोबत २७ जानेवारी रोजी होणाऱ्या EU FT deal बाबत. त्या म्हणाल्या की आम्ही ऐतिहासिक व्यापार कराराच्या उंबरठ्यावर आहोत. काहींनी याला सर्व करारांची जननी किंवा खूप मोठा करार, (mother of all deals), म्हटलं आहे. ही २०० कोटी लोकांची बाजारपेठ निर्माण करेल. यातून होणारा व्यापार हिस्सा, जागतिक जीडीपीच्या २५% असेल. त्या पुढे जे म्हणाल्या, ते खूप महत्वाचं आहे. ज्याचा संबंध ट्रम्प यांच्या सध्याच्या विक्षिप्तपणा आणि अकल्पनीय कृत्य यांच्याशी आहे.

ट्रम्प यांच्या व्हेनेझुएला कृतीमुळे युरोप मधील देशात असलेल्या असुरक्षित पणाची छाया, त्यांच्या पुढील शब्दात जाणवते. त्यांच्याच शब्दात वाचू मग त्यावर विश्लेषण करूया. त्या म्हणाल्या की,

हे युरोपच्या स्वातंत्र्याचे क्षण आहेत (This is Europe's independence moment). आम्हाला अमेरिका, चीन आणि रशियावर अवलंबून राहता येणार नाही. युरोपने आपली सुरक्षा, अर्थव्यवस्था आणि लोकशाही स्वतंत्र करायला हवी. आता या दोन्हींचा संबंध आणि भविष्यातील जगाची जिओ पॉलिटिकल वाटचाल कशी असेल आणि त्यात भारताचा सहभाग, विकास आणि जगावर आपला प्रभाव याचे मार्ग यातून कसे पुढे जातील, हे पाहणं आवश्यक आहे. खरतर सध्या जागतिक राजकीय, आर्थिक, परिस्थिती मधे क्रांतिकारक बदल घडत आहेत. किंवा तशी परिस्थिती घडत आहे आणि काही प्रमाणात मुद्दामहून घडवली जात आहे.

२०३० पर्यंत अत्यंत वेगाने घडणाऱ्या या घटनांमध्ये भारताची खूप महत्वाची भूमिका असावी, यासाठी तीन व्यक्ती अथक प्रयत्नशील आहेत. एक मोदीजी, दुसरे अजित डोवाल आणि तिसरे एस जयशंकर. मोदीजी हे, वायुवेगाने होणारी आणि घडवली जाणारी राजकीय समीकरणे आणि भारत यांच्याबाबतच्या योग्य त्या राजकीय हालचाली यामध्ये अत्यंत सतर्क आहेत. किंबहुना पंधरा वीस वर्षानंतर भारताची जागतिक नेतृत्वाची तयारी असावी, याची पायाभरणी, मिळालेल्या प्रत्येक क्षणात मोदीजी करत आहेत. हे आज नाही तर काही वर्षांनी देशाला कळेल. पण पाश्चात्य जगत, अमेरिका, चीन यांनी ते आताच ताडलेलं आहे. त्यांच्या राजकीय बुद्धिमत्ता आणि चाणक्यनिती यांनी जगाला दिपवून टाकलं आहे. सध्या त्यांनी भारताचा जो ऑरा निर्माण केला आहे, तो अलौकिक, अवर्णनीय आणि अकल्पनीय आहे. कोणत्याही परिस्थितीत जगाला, भू राजकीय राजकारणात, भारताचा विसर पडता कामा नये, यासाठी मोदीजी दक्ष आणि प्रयत्नशील आहेत. त्यांच्या अष्टावधानी व्यक्तित्वामुळे, आज जगात भारताला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालं आहे. India Russia आणि China असो वा BRICS असो, SCO असो, G7 असो, G20 असो, अशा सर्व मंचांवर भारताचा डंका जोरात वाजवण्याचं खूप महत्वाचं काम मोदींनी गेल्या अकरा वर्षात केलं आहे. अनेकानेक देशांना भेटी देऊन, संबंध आणि भारताची प्रतिष्ठा अशा उंचीवर नेऊन ठेवली आहे की, भविष्यात येणाऱ्या कोणत्याही पंतप्रधानांना या स्टँडर्डची वागणूक मिळेल आणि भारताच्या भूमिकेची कमान अशीच उंचावत ठेवावी लागणार आहे.

उर्सुला यांनी केलेल्या पहिल्या विधानांचा आधी मतितार्थ जाणून घेऊया. संपूर्ण युरोप अर्थात एण च्या २७ देशांना संबोधित करतांना किंवा या सर्व देशांतर्फे त्यांनी सांगितलं की हा एक ऐतिहासिक करार असेल. या व्यापार कराराने एकूण २०० कोटी लोकांची बाजारपेठ उपलब्ध होईल. (भारताचे १४० कोटी आणि युरोपचे जवळपास ४५ कोटी) या व्यापाराचा, जागतिक जीडीपी च्या २५% हिस्सा या भागीदारीने व्याप्त केला असेल.

पुढे त्यांनी जे शब्द वापरले ते, जगाची पुढील दिशा आणि त्याकडे पाहण्याचा युरोपियन दृष्टिकोन स्पष्ट करतो. त्यांनी मुख्य ३ मुद्दे यात मांडले. त्याचा परिणाम आणि लाभ यावर विचार करूया.

१. अश्या प्रकारे करार करून, आपलं अस्तित्व आणि अवलंबित्व आपणच दूर करून, युरोपला खऱ्या स्वातंत्र्याकडे घेऊन जाणार आहोत. या सर्व करारांची जननी असलेला करार करून आपण खऱ्या प्रकारच्या स्वातंत्र्याकडे युरोपला घेऊन जाणार आहोत. म्हणजेच आताचं युरोपचं अवलंबित्व हे पारतंत्र्यासारखं आहे. कसं ते पुढेच त्यांनी स्पष्ट केलं.

२. आपण अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यावर अवलंबून राहता कामा नये. या वाक्यात, अमेरिका चीन या देशांची नीती आणि त्यांची जागतिक दडपशाहीची प्रतिमा, स्पष्ट होते. विशेषतः चीन आणि अमेरिका, ज्याप्रकारे जगात, त्यांच्यावर अवलंबून असलेल्या देशाला नाडतात, याची स्पष्ट कल्पना, त्यांच्यावर अवलंबून असलेल्या प्रत्येक देशाला आहे.

या दोन्ही देशांनी आपल्यावर अवलंबून असलेल्या देशाला कसं लुटलं आहे, ते जगात प्रसिद्ध आहे. रशिया हा फार कमी गरजांबाबत जगाला व्यापारात उपयोगी सहकारी असल्यामुळे, त्यावर फार अवलंबून उपयोगाचं नाही, असा रशिया संदर्भात त्यांचा म्हणण्याचा होरा असावा. त्याचप्रमाणे युरोपातील नाटो देशांनी युक्रेनला गेली ४ वर्षे मदत केली असल्यामुळे, त्या देशावर फार भिस्त ठेवून उपयोग होणार नाही. या तीन मुख्य देशांचं नाव घेऊन, त्यांनी भारतासोबतच्या कराराला ऐतिहासिक म्हटलं आहे. याचं कारण भारत हा एकमेव देश आहे, जो पूर्ण भरवशाचा आहे. You can very well depend on present Modi's Bharat. हे थोडक्यात त्यांना सांगायचं आहे. (क्रमशः)

# ममतांचे आक्रस्ताळेपणाचे राजकारण

**पश्चिम बंगाल विधानसभेच्या या वर्षी होणाऱ्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर 'ईडी'ने तृणमूल काँग्रेसच्या आयटी सेल विभागाच्या प्रमुखांच्या घरावर छापा टाकला. या प्रकरणी ममता बॅनर्जी यांनी अतिशय आक्रमकपणे प्रत्युत्तर देताना आक्रस्ताळेपणाचे राजकारण सुरू केले. त्यात भाजपाही उत्तर द्यायला पुढे आला. मात्र दोन आक्रमक पक्षांमुळे पश्चिम बंगालच्या कायदा आणि सुव्यवस्थेला आव्हान मिळत आहे.**

नि

**सौरभ भट्टाचार्य**

पश्चिम बंगालमधील राजकीय तापमान आता उच्च बिंदूवर पोचले आहे. 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणात तृणमूल काँग्रेसची राजकीय सल्लागार कंपनी 'आय-पॅक'च्या कोलकाता कार्यालयावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) टाकलेल्या छाप्याचा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आक्रस्ताळेपणाने निषेध केला. ममता यांचा दावा आहे की, तृणमूल काँग्रेसच्या आयटी सेल प्रमुखांच्या घरावर छापा टाकून, 'ईडी'चा वापर करून भाजपा आपल्या पक्षातील अंतर्गत डेटा जप्त करू पाहात होता.

प्रतीक जैन हे तृणमूल काँग्रेसच्या आयटी सेलचे प्रमुख आहेत. त्यांच्याच घरावर आणि कार्यालयावर 'ईडी'ने छापे टाकल्याने ममता खवळल्या. एखाद्या मुख्यमंत्र्याने 'ईडी'च्या छाप्याला विरोध करण्यासाठी स्वतः एखाद्या सल्लागार संस्थेच्या कार्यालयात उपस्थित राहण्याची ही पहिलीच वेळ असावी. दिल्लीतही या पक्षाच्या खासदारांनी आंदोलन केले. तपास यंत्रणा निष्पक्षपाती नसल्याचा आरोप करून असे आंदोलन करण्याचा अधिकार संबंधितांना जरूर आहे; परंतु त्यासाठी किती ताणून धरावे, यालाही काही मर्यादा असतात. त्याचे भान ममता आणि त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनाही 'ईडी'ने नोटीस बजावली होती. त्या वेळी पवार यांनी कोणताही आक्रस्ताळेपणा न करता आपण स्वतःच 'ईडी'च्या कार्यालयात येतो, काय चौकशी करायची ते करा, असे आव्हान दिले होते. राहुल गांधी, रॉबर्ट वढेरा यांची तर 'ईडी'ने किती तरी वेळा चौकशी केली. त्यांना तासन्तास बसवून ठेवले; परंतु त्यापैकी कोणीही आक्रस्ताळेपणा केला नाही. या पृष्ठभूमीवर सत्तेत असतानाही ममताच मोर्चा काढतात, याला अगतिकतेचे राजकारण म्हणावे लागेल.

यंत्रणेला आक्रस्ताळेपणाने उत्तर देणारे देशाच्या राजकारणात हाताच्या बोटावर मोजण्याइतके पक्ष आहेत. त्यात ममता यांच्या पक्षाचा समावेश होतो. तामिळनाडू, केरळ आणि पश्चिम बंगालचे सत्ताधारी त्यात अव्वल आहेत. देशभर एकामागून एक राज्ये पादाक्रांत करीत असताना भाजपपुढे ही राज्ये सर करण्याचे आव्हान आहे. तामिळनाडू आणि केरळमध्ये लगेच काही साध्य होईल, असे वाटत नसल्याने भाजपाने गेल्या १० वर्षांपासून पश्चिम बंगालचा गड पद्धतशीरपणे सर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा चालवली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा अलिकडचा तीन दिवसांचा पश्चिम बंगाल दौरा भाजपासाठी निवडणूकदृष्ट्या महत्त्वाचा होता. त्यांनी पत्रकार परिषदांद्वारे पक्षाचे मुद्दे स्पष्ट केले.

खासदार, आमदार आणि प्रमुख नेत्यांच्या बैठका घेतल्या आणि पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणेच पश्चिम बंगालमध्ये सरकार स्थापन करण्याची इच्छा व्यक्त करताना शाह यांनी पश्चिम बंगालमधील जनता भीती, भ्रष्टाचार, कुशासन आणि घुसखोरीच्या राजकारणाऐवजी विकास, वारसा आणि गरिबांच्या कल्याणावर आधारित मजबूत सरकार स्थापन करण्याबाबत दृढनिश्चयी असल्याचा दावा केला. त्याचा आधार घेत ममतादीदी ईडीवर आगपाखड करीत आहेत.

पश्चिम बंगालच्या राजकारणाचा आढावा घेतला, तर गेल्या ५० वर्षांमध्ये काँग्रेस या राज्यात सत्तेत आलेली नाही, हे दिसते. त्यापूर्वी ती सत्तेत होती; परंतु डाव्यांनी काँग्रेसची सत्ता काढून घेतली. डाव्यांच्या सत्तेला ममता यांनी सुरुंग लावला. गेल्या १५ वर्षांमध्ये काँग्रेस आणि डावे कमकुवत झाले. त्यांची जागा भाजपाने घेतली. आता तर काँग्रेस शून्यावर आहे आणि ३४ वर्षे राज्य करणारी डावी आघाडी गेल्या विधानसभा निवडणुकीत एकही जागा जिंकू शकली नाही. याउलट, भाजप ४१ टक्के मते आणि ७७ जागांसह मुख्य विरोधी पक्ष म्हणून उदयाला आला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या जागांची संख्या २०१९ च्या तुलनेत कमी झाली असली, तरी त्यांना मिळालेली ३९ टक्के मते आणि १२ जागा दर्शवतात की, राज्यात तृणमूल काँग्रेसला एक मजबूत पर्याय निर्माण झाला आहे.

ममता यांना सुरुवातीला मुस्लिम मतांचा आधार होता. पश्चिम बंगालमध्ये मुस्लिम मतदारांची संख्या २९ टक्के आहे. निव्वळ मुस्लिम मतांवर निवडून येता येणार नाही, याची जाणीव असल्याने त्या हिंदू मतांसाठी अनुनयाचे राजकारण करायला लागल्या आहेत. केवळ हिंदू मतांच्या जोरावर सत्तेत येता येणार नाही, याची भाजपलाही जाणीव आहे. त्यामुळे भाजपानेही आता व्यूहनीती बदलली आहे. या वर्षीच्या विधानसभा निवडणुकीमध्ये सरकार स्थापन करण्याचा भाजपाचा दावा केवळ अतिशयोक्ती म्हणून नाकारता येणार नाही. भाजपाने २०२१ च्या निवडणुका अशाच आत्मविश्वासाने लढल्या. ते तृणमूल काँग्रेसपेक्षा कमी पडले, ही मात्र वस्तुस्थिती आहे.



आता २०२१ च्या तुलनेत पश्चिम बंगालमधील राजकीय वातावरण लक्षणीयरीत्या बदलले आहे. शेजारील बांगलादेशमधील घटनांचा परिणाम संपूर्ण देशावर झाला आहे. सीमावर्ती राज्य असल्याने पश्चिम बंगाल प्रभावित आहे. पश्चिम बंगालमधील सुमारे २९ टक्के मुस्लिम मतदार असून भाजपाविरोधी, डाव्या विचारसरणीच्या मतदारांचा एक मोठा भाग तृणमूल काँग्रेसची ताकद आहे. मुस्लिम मतपेढीला धक्का दिला किंवा भाजपाच्या बाजूने हिंदू मतांचे व्यापक ध्रुवीकरण झाले तरच सत्ता परिवर्तन शक्य आहे. सरकारविरुद्ध आक्रमक भूमिका स्वीकारणारी तृणमूल बांगलादेशमधील हिंसाचाराबद्दल, विशेषतः हिंदूंविरुद्धच्या हिंसाचाराबद्दल आक्रमक भूमिका घेत नाही. मोठे आंदोलनही करीत नाही.

गेल्या काही वर्षांमध्ये पश्चिम बंगालच्या बाहेर पकडलेल्या घुसखोरांकडे २४ परगणा प्रदेशात वितरित केली गेलेली आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्रे सापडल्याने डाव्या आघाडीच्या आणि नंतर ममता बॅनर्जी सरकारच्या काळात बांगलादेशमधून घुसखोरी झाल्याचे सिद्ध झाले आहे. विशेष सघन आढाव्या (एसआयआर) दरम्यान अनेक घुसखोरांनी ते येथे बराच काळ राहत असल्याचा आणि त्यांच्याकडे ओळखपत्रे असल्याची कबुली दिली आहे. त्यांनी मतदान केल्याचेही कबूल केले. ममता यांनी या वस्तुस्थितीला नकार देणे आणि पहलगाममधील दहशतवादी हल्ला त्यांनी घडवून आणला का, असा सवाल करणे अनाकलनीय आहे. वस्तुतः जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाशी जोडलेली असल्याने पहलगाम हल्ला त्याचाच एक भाग होता.

अलिकडेच शाह यांनी पश्चिम बंगालभोवती अशी घेराबंदी स्थापित केली जाईल की, एकही घुसखोर आत येऊ शकणार नाही, असे म्हटले. गेल्या १० वर्षांमध्ये त्यांचे हात कुणी बांधले होते, हा प्रश्न उरतो. दोन देशांच्या सीमांवर कुंपण घालण्याचा प्रश्न येतो, तेव्हा राज्याच्या भूमिकांना काहीच अर्थ नसतो. राज्याने काहीही भूमिका घेतली, तर केंद्र सरकार सीमा सुरक्षेच्या दृष्टीने अशा उपाययोजना करू शकते; परंतु शाह यांनाही घुसखोरांना रोखण्याच्या उपाययोजनेपेक्षा ममतांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून सीमेवर कुंपण घालण्यात कसा अडथळा येत आहे, हे ठसवण्यात जास्त रस आहे. मुस्लिम मते एकत्रित करण्याच्या प्रयत्नात ममता डाव्या राजवटीत ज्याचा विरोध करीत होत्या, तीच पावले उचलताना दिसतात. गैर-मुस्लिमांवरील, विशेषतः हिंदूंवरील हिंसाचार आणि बांगलादेशमधील वाढत्या कट्टरवादामुळे हिंदू मतदारांना पुनर्विचार करण्यास भाग पाडले आहे. या पृष्ठभूमीवर मुर्शिदाबादमध्ये हुमायून कबीर यांनी बाबरी मशिदीची पायाभरणी केली. दर शुक्रवारी तेथे मोठ्या प्रमाणात होणारे मेळावे आणि मोठ्या प्रमाणात वळणारा पैशांचा ओघ यामुळे हिंदू मतदारांमध्ये पुनर्विचाराची भावना निर्माण झाली आहे. दुसरीकडे मुस्लिम मतांचे विभाजन झाल्याचा फटका ममतांनाच बसणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ममता यांनी स्वतःला धर्माभिमानी हिंदू म्हणून दाखवण्यासाठी स्टेजवरून चंडी पाठ पठन केले होते. या वेळीही त्यांच्याकडून निवडणुकीपूर्वी सिलिगुडीमध्ये दुर्गा अंगण आणि महाकाल मंदिर बांधण्याची घोषणा करण्याचे संकेत मिळाले आहेत. एकंदरीत बदललेल्या राजकीय वातावरणाची जाणीव होत असून हिंदू मते मोठ्या प्रमाणात भाजपाकडे जाऊ नयेत, म्हणून अंशतः ध्रुवीकरणाची रणनीती ममता बॅनर्जी अवलंबत असल्याचे दिसते. ममता सरकारच्या काळात समोर आलेले राज्यपुरस्कृत भ्रष्टाचाराचे प्रकरण, विरोधकांवर दडपशाही, आरजी कार मेडिकल कॉलेज ते संदेशखलीपर्यंतचे महिलांच्या शोषणाचे आरोप, मुस्लिम कट्टरवादाला प्रोत्साहन, बेरोजगारी, स्थलांतर आणि मंद विकास हे सर्व मुद्दे तृणमूल काँग्रेसच्या विरोधात जाणारे आहेत. परिणामी भाजपा यावेळी त्यांना आव्हान देण्यास सज्ज असल्याचे दिसून येते.